



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार १३ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





## ‘मनरेगा’ चे नाव बदलले
# आता ‘पूज्य बापू ग्रामीण रोजगार योजना’

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने शुक्रवारी (१२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा - MGNREGA) योजनेचे नाव बदलले असून आता ही योजना 'पूज्य बापू ग्रामीण रोजगार योजना' नावाने ओळखली जाईल. माध्यमांनी सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय मंत्रिमंडळाने या योजनेचे नाव बदलण्यास आणि कामाचे दिवस वाढवण्यास मंजुरी दिली आहे.

**१०० ऐवजी १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी -** मोदी सरकारने या योजनेचे केवळ नावच बदलले नाही, या योजनेच्या लाभातही वाढ केली आहे. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, या योजनेअंतर्गत मिळणा-या कामाच्या दिवसांची संख्या आता १०० वरून वाढवून १२५ दिवस करण्यात आली आहे. अर्थात, आता ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला एका आर्थिक वर्षात १०० ऐवजी १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी मिळणार आहे.




**योजनेत १५ कोटींहून अधिक लोक सक्रिय -** मनरेगा ही यूपीए-१ (UPA-I) सरकारच्या प्रमुख योजनांपैकी एक असून, २००५ मध्ये सुरू करण्यात आली होती. ग्रामीण भागातील कुटुंबांना उपजीविकेची सुरक्षा पुरवणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सध्या या योजनेत १५ कोटींहून अधिक लोक सक्रियपणे काम करत आहेत, यात सुमारे एक-तृतीयांश महिलांचा समावेश आहे. सुरु वातीला या योजनेचे नाव राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा असे होते, यानंतर २००९ मध्ये या योजनेचे नाव बदलून 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' असे करण्यात आले होते. आता या महत्त्वपूर्ण योजनेला 'पूज्य बापू ग्रामीण रोजगार योजना' म्हणून ओळखले जाईल आणि १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी मिळेल.



## दक्षिण आशियातील सर्वात मोठ्या उड्डाण प्रशिक्षण संस्थेत दोन विमानाचे पहिले यशस्वी लँडिंग

**अमरावती /प्रतिनिधी :** अमरावतीच्या विमानतळावर आज एका ऐतिहासिक क्षणाची नोंद झाली. एअर इंडियाच्या उड्डाण प्रशिक्षण संस्थेच्या (फ लाईट ट्रेनिंग ऑर्गेनायझेशन) विमानांचे पहिले यशस्वी लँडिंग शुक्रवारी सायंकाळी झाले. यामुळे विदर्भातील विमानोड्डाण क्षेत्रात महत्वाचे दालन खुले झाले आहे. विशेष म्हणजे अमरावतीत सुरू होणारी विमान उड्डाण प्रशिक्षण संस्था ही दक्षिण आशियातील सर्वात मोठी वैमानिक प्रशिक्षण संस्था ठरणार आहे. शुक्रवारी सायंकाळी दोन अत्याधुनिक डायमंड डीए-४२ मल्टी-इंजिन प्रशिक्षण विमाने अमरावती विमानतळावर दाखल झाली. या विमानांच्या यशस्वी आगमनाने विमानचालन क्षेत्रात महत्वपूर्ण प्रगतीची नोंद झाली. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने (एमएडीसी) विकसित केलेल्या विमानतळावर हे लँडिंग झाले. हे यश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहनामुळे साध्य झाले आहे, ज्यांच्या मार्गदर्शनामुळे संपूर्ण राज्यात विमानचालन पायाभूत सुविधांच्या वाढीला गती मिळाली आहे. प्रादेशिक विमानचालन मजबूत करण्याच्या त्यांच्या अटूट वचनबद्धतेमुळे ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाली आहे.

एमएडीसीच्या उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांचे धोरणात्मक नेतृत्व यामागे आहे. एअर इंडिया एफटीओ विमानाचे यशस्वी लँडिंग हे अमरावती विमानतळाला विदर्भात संरचित उड्डाण प्रशिक्षण आणि विमानचालन प्रगतीसाठी एक उदयोन्मुख केंद्र ➪(पान २ वर)

### जनगणनेसंदर्भात मोदी सरकारचा मोठा निर्णय
## 11718 कोटी मंजूर; शेतक-यांसाठीही खुशखबर!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने शुक्रवारी तीन महत्त्वाचे निर्णय घेतले. यांत, जनगणना २०२७, कोळसा उत्पादन आणि शेतक-यांशी संबंधित निर्णयांचा समावेश आहे. यासंदर्भात, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, जनगणना २०२७ साठी मंत्रिमंडळाने ११,७१८ कोटी रुपयांचे बजेट मंजूर केले आहेत. ही भारतातील पहिलीच डिजिटल जनगणना असणार आहे. डिजिटल डेटा सुरक्षितता लक्षात घेउन ही जनगणना दोन टप्प्यांत केली जाईल. पहिला टप्पा एप्रिल ते सप्टेंबर २०२६ दरम्यान हाउस लिस्टिंग आणि गृहनिर्माण गणनेचा असेल, तर दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये लोकसंख्या गणनेचा असेल. विशेष म्हणजे, पहिल्यांदाच हिंदी, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या मोबाइल ॲप्लिकेशनद्वारे माहिती संकलित केली जाईल. ➪(पान २ वर)



## स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या भव्य पुतळ्याचे अमित शाह, मोहन भागवत यांच्या हस्ते अनावरण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी अंदमान आणि निकोबार बेटांमधील श्री विजयपुरम येथे स्वातंर्त्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण केले. स्वातंर्त्यलढ्याच्या आठवणींना उजाळा देणारा हा कार्यक्रम एक ऐतिहासिक क्षण ठरल्याचे उपस्थितांनी म्हटले. शुक्रवारी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास दक्षिण अंदमानातील श्री विजयपुरम येथे वीर सावरकरांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि मोठ्या संख्येने लोक या कार्यक्रमाला उपस्थित होते. सरसंघचालक डॉ भागवत यांनी पुतळ्याचे शिल्पकार अनिल सुतार यांना शाल देउन सन्मानित केले. गृहमंत्री अमित शाह ➪(पान २ वर)



## ‘वर्षभर विमान भाड्यावर मर्यादा घालणे शक्य नाही’
### इंडिगो संकटादरम्यान केंद्र सरकारचे लोकसभेत स्पष्टीकरण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इंडिगोच्या मोठ्या प्रमाणात विमानांची उड्डाणे रद्द झाल्यामुळे प्रवाशांना झालेल्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने हवाई तिकीट दरांवर वर्षभर कमाल मर्यादा लागू करण्याची मागणी लोकसभेत फेटाळून लावली आहे. नागरी उड्डयन मंत्री के. राममोहन नायडू यांनी शुक्रवारी लोकसभेत या विषयावर माहिती दिली. केंद्रीय मंत्री नायडू यांनी सभागृहात सांगितले की, हवाई दरांवर वर्षभर मर्यादा घालणे हे अव्यवहार्य आहे. चढ-उतार आणि मागणीतील बदल लक्षात घेता, सरकार संपूर्ण वर्षासाठी किंमती निश्चित करू शकत नाही. सणासुदीच्या काळात किंवा जास्त मागणीच्या वेळी हवाई भाड्यामध्ये वाढ होणे स्वाभाविक असल्याचे मंत्री के. राममोहन नायडू म्हणाले. नागरी उड्डयन क्षेत्राला झपाट्याने वाढवण्यासाठी बाजाराचे डि-रेग्युलेशन ठेवणे ही प्राथमिक आणि आवश्यक अट असल्याचे सांगितले. बाजारात अधिक कंपन्या आल्यास आणि नियमनमुक्त स्पर्धा वाढल्यास मागणी आणि पुरवठ्याच्या नैसर्गिक नियमांमुळे अंतिम फायदा प्रवाशालाच होतो, असेही ते म्हणाले. एका खासगी सदस्याने सादर केलेल्या विमान भाडे नियंत्रण विधेयकावर उत्तर देताना नायडू म्हणाले की, ज्या देशांमध्ये हवाई वाहतुकीत प्रचंड वाढ झाली आहे, त्या सर्वांनी आपले बाजार नियंत्रणमुक्त ठेवले आहेत. नायडू यांनी सांगितले की, ‘जर आपल्याला या क्षेत्राची ख-या अर्थाने वाढ करायची असेल, तर बाजार नियंत्रणमुक्त ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरून अधिक कंपन्या बाजारात उतरू शकतील.’



**सरकारच्या हस्तक्षेपाचा अधिकार अबाधित** ➪(पान २ वर)


## माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन

**लातूर/प्रतिनिधी :** कांग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचं वयाच्या ९० व्या वर्षी निधन झालं आहे. लातूर येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मागील काही दिवसापासून ते आजारी होते.

शिवराज पाटील चाकूरकर आयुष्यभर काँग्रेसच्या राजकारणात सक्रिय राहिले. मागील अनेक वर्षांपासून राजकीय जीवनातून निवृत्त होते. राजकारणातील अत्यंत अभ्यासू आणि स्वच्छ प्रतिमा असलेले राजकारणी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचे आणि अनुभवी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जाणारे शिवराज पाटील (जन्म : १२ ऑक्टोबर १९३५) हे लातूर जिल्ह्यातील चाकूर येथे जन्मले. उस्मानिया विद्यापीठातून विज्ञान विषयात पदवी आणि मुंबई विद्यापीठातून कायद्याचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी १९६७-६९ या काळात लातूर नगरपालिकेमध्ये काम करत राजकारणात पाउल ठेवले.

१९८० मध्ये ते लातूर मतदारसंघातून पहिल्यांदा लोकसभेत निवडून आले आणि त्यानंतर १९९९ पर्यंत सलग सात निवडणुका जिंकत लोकसभेतील एक प्रभावी नेता म्हणून उदयास आले. इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षण राज्यमंत्री, वाणिज्य, विज्ञान-तंत्रज्ञान, अणुउर्जा, इलेक्ट्रॉनिक्स व अवकाश अशा महत्त्वाच्या विभागांची जबाबदारी त्यांनी सांभाळली. १९९१ ते १९९६ या काळात ते देशाचे १० वे लोकसभा अध्यक्ष होते. लोकसभेचे आधुनिकीकरण, संगणकीकरण, संसदेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण, नवे ग्रंथालय इमारत यांसारख्या उपक्रमांना त्यांनी गती दिली. देश-विदेशातील अनेक संसदीय परिषदांमध्ये त्यांनी भारताचे नेतृत्व केले. सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षातही त्यांनी जाहीरनामा समितीचे अध्यक्षपदासह अनेक महत्त्वाच्या जबाबदा-या सांभाळल्या. २००४ मध्ये निवडणूक हरूनही त्यांच्यावर विश्वास ठेवत केंद्रातील गृहमंत्रीपद देण्यात आले. मात्र २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षेतील त्रुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी ३० नोव्हेंबर २००८ रोजी राजीनामा दिला. २०१० ते २०१५ या काळात ते पंजाबचे राज्यपाल आणि चंदीगड केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक म्हणून कार्यरत होते. देशातील उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार सुरू करण्याचे श्रेयही त्यांना दिले जाते. वैयक्तिक आयुष्यात ते लिंगायत समाजातील असून, १९६३ मध्ये विजया पाटील यांच्याशी विवाह केला. त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहेत. सून डॉअर्चना पाटील चाकूरकर राजकारणात सक्रीय आहे..दोन नाती आहेत. शिवराज पाटील हे सत्य साई बाबांचे निष्ठावंत अनुयायी म्हणूनही परिचित आहेत. सुमारे पाच दशकांचा संसदीय आणि प्रशासकीय अनुभव, विविध मंत्रालयातील कामकाज आणि लोकसभा अध्यक्ष म्हणून केलेले योगदान यामुळे शिवराज पाटील हे भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचे आणि अभ्यासपूर्ण व्यक्तिमत्त्व मानले जातात.



## सरपंच देशमुख हत्याकांडाचा क्रुर घटनाक्रम हायकोर्टात पुन्हा समोर; पत्नी, भावास अश्रु अनावर




**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** न्यायमंदिराच्या शांत वातावरणात आज मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचा थरार आणि क्रूरता उलगडली, तेव्हा उपस्थित असलेल्या प्रत्येकाचे मन हेलावले. कोर्टात २३ व्हिडिओ क्लिप्समधून जेव्हा हत्येपूर्वी संतोष देशमुख यांच्यावर झालेली अमानुष मारहाण समोर आली, हत्येचा क्रूर घटनाक्रम पुन्हा समोर येताच देशमुख कुटुंबीयांना शोकाचा बांध आवरता आला नाही. हत्याकांडातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याच्या जामीन अर्जावर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात सुनावणी सुरू होती. न्यायमूर्तीसमोर सरकारी वकील अमरजितसिंह गिरासे हे पुरावे सादर करत होते.

**कोर्टातील साडेसहा तासांची 'वेदना', भाउ, पत्नीचा आक्रोश**

सकाळपासून सायंकाळपर्यंत कोर्टात एक-एक पुरावा समोर येत होता, पण जेव्हा सरकारी वकिलांनी लॅपटापवर मारहाणीचे २३ व्हिडिओ फूटेज न्यायमूर्तींना दाखवले, तेव्हा कोर्टातील वातावरण जड झाले. ज्या निर्घृणतेने आणि क्रूरतेने संतोष देशमुख यांना मारण्यात आले, त्या क्षणाचा पुन्हा एकदा उल्लेख होणे पत्नी अश्विनी देशमुख यांच्यासाठी असह्य होते. ➪(पान २ वर)

## पुतिन यांनी पाकच्या पंतप्रधानांना 40 मिनिटे ठेवले ताटकळत
### चिडलेले शरीफ अखेर जबरदस्तीने बैठकीत शिरले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शांतता आणि तटस्थतेच्या आंतरराष्ट्रीय मंचावर पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांना शुक्रवारी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यामुळे अपमानास्पद परिस्थितीचा सामना करावा लागला. नियोजित भेटीसाठी पुतिन यांनी शहबाज शरीफ यांना तब्बल ४० मिनिटांहून अधिक काळ वाट पाहायला लावली. या सगळ्या प्रकारामुळे शहबाज शरीफ यांची आंतरराष्ट्रीय स्तरावर खिल्ली उडवली जात आहे. बराच वेळ वाट पाहिल्यानंतर शरीफ जबरदस्तीने बैठकीत सहभागी झाले.



तुर्कमेनिस्तान येथे आयोजित करण्यात आलेल्या इंटरनॅशनल फोरम ऑन पीस अँड ट्रस्ट कार्यक्रमात ही घटना घडली. रशियन टुडेने शेअर केलेल्या एका व्हिडिओमध्ये शहबाज शरीफ त्यांचे परराष्ट्र व्यवहार मंत्री इशाक डार यांच्यासह एका खोलीत पुतिन यांची वाट पाहत असल्याचे दिसत आहे. ४० मिनिटे होउनही पुतिन न आल्याने शरीफ बेचैन झाल्याचे स्पष्टपणे दिसून आले. बराच वेळ ताटकळल्यानंतर ➪(पान २ वर)




### घुसखोरीचा कट उधळला
## संशयित दहशतवादी बीएसएफच्या ताब्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी शुक्रवारी एक मोठी कारवाई केली आहे. जम्मू-काश्मीरच्या प्रागवाल सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेपलीकडून होणारा घुसखोरीचा कट जवानांनी उधळून लावला आहे. या कारवाईवेळी सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी एका संशयित दहशतवाद्याला शस्त्रास्त्रांसह ताब्यात घेतलं आहे. संशयित दहशतवाद्याला ताब्यात घेण्यात आल्यानंतर आता त्याची कसून चौकशी सुरू करण्यात आल्याची माहिती सांगण्यात येत आहे. घुसखोरीचा हा कट जवानांनी उधळून लावल्यानंतर सीमा सुरक्षा दल आणखी अलर्ट झालं असून बीएसएफच्या जवानांनी प्रागवाल सेक्टर परिसरात मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू केल्याचं सांगण्यात आलं आहे. या ➪(पान २ वर)



### ◆ कोर्टाची टीम दरवाजावर ◆ आत आईसह दोन मुलांचे मृतदेह
## घर जप्त होण्याच्या भीतीने कुटुंबाचा सामूहिक अंत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीतील कालकाजी परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. एकाच कुटुंबातील तिघांनी आपल्या राहत्या घरात गळफास घेउन आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. दीर्घकाळापासून सुरू असलेली आर्थिक विवंचना आणि घराच्या ताब्यासंबंधी असलेल्या कोर्टाच्या कारवाईच्या भीतीतून या कुटुंबाने हे टोकाचे पाउल उचलल्याचा प्राथमिक अंदाज आहे. शुक्रवारी दुपारी २ वाजून ४७ मिनिटांनी ही घटना उघडकीस आली. कोर्टाचे अधिका-यांनी दिल्लीपोलिसांना क?लद्वारे माहिती मिळाली. कोर्टाच्या आदेशानुसार एका मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी नेमलेली टीम कालकाजी येथील घरी पोहोचली. टीमने वारंवार दरवाजा वाजवूनही आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. डुप्लिकेट चावीच्या मदतीने दरवाजा उघडण्यात आला, तेव्हा घरातील दृश्य पाहून सर्वांनाच धक्का बसला. ५२ वर्षीय अनुराधा कपूर आणि त्यांचे दोन मुलगे आशीष (वय ३२) आणि चैतन्य (वय २७) यांचे मृतदेह पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत लटकलेले आढळले. पोलिसांनी घटनास्थळाचा ताबा घेतला आणि मृतदेहांचा पंचनामा केला. प्राथमिक तपासामध्ये अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत: घटनास्थळी पोलिसांना एक सुसाइड नोट मिळाली आहे. या चिठ्ठीवरून हे कुटुंब खूप दिवसांपासून तणावामध्ये होते, हे स्पष्ट झाले. प्राथमिक तपासानुसार, हे कुटुंब दीर्घकाळापासून ➪(पान २ वर)





जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय

## पान १ व १० वरून

## 11718 कोटी मंजूर;

**जात सांगणे बंधनकारक नाही -** वैष्णव पुढे म्हणाले, 'यासंदर्भातील गॅझेट नोटिफिकेशन जारी होईल, त्यात जातीसंदर्भात माहिती देण्याची व्यवस्था असेल, मात्र जात सांगणे बंधनकारक नसेल. केवळ एकत्रित डेटाच (Aggregated Data) प्रकाशित केला जाईल. मायक्रो डेटा पब्लिक केला जाणार नाही.' दुसरा मोठा निर्णय कोळसा उत्पादनाशी संबंधित आहे. यासंदर्भात बोलताना वैष्णव म्हणाले, 'कोल सेतू' योजनेच्या माध्यमातून कोळसा उत्पादनात मोठ्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. या सुधारणांमुळे भारत कोळसा उत्पादनात आत्मनिर्भर होत आहे आणि आयातीवरील अवलंबित्व संपुष्टात येत आहे. आयात कमी झाल्याने देशाचे सुमारे ६० हजार कोटी रु पये वाचत आहेत. २०२४-२५ मध्ये १ अब्ज टन कोळसा उत्पादन झाले असून, देशातील वीज प्रकल्पांमध्ये विक्रमी कोळसा साठा तयार झाला आहे.

**तिसरा निर्णय शेतक-यांशी संबंधित -**मंत्रिमंडळाच्या बैठकीतील तिसरा निर्णय शेतक-यांशी संबंधित आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने २०२६ साठी खोब-याच्या किमान आधारभूत किमतीला (MSP) मंजुरी दिली आहे. यानुसार, दळण्यासाठीच्या अथवा कोस करण्यासाठीच्या खोब-याला १२,०२७ रु पये प्रति क्विंटल, तर गोल खोब-याला १२,५०० रु पये प्रति क्विंटल, एमएसपी असेल. या व्यवहारांसाठी नाफेड (NAFED) आणि एनसीसीएफ (NCCF) ही नोडल एजन्सी म्हणून काम करतील.

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या

यांनी त्यांच्या इंस्टाग्रामवरील पोस्टमध्ये लिहिले, 'वीर सावरकरांचे जीवन मातृभूमीवरील अपार प्रेम आणि राष्ट्रासाठी आपले जीवन अर्पण करण्याची तयारी दर्शवते. अंदमान आणि निकोबारची भूमी वीर सावरकरांसह अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, समर्पण आणि धैर्याची साक्षीदार आहे. आज या पवित्र भूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्यासमवेत मी सावरकरांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण केले आणि 'वीर सावरकर प्रेरणा उद्यान'चे उद्घाटन केले. हे उद्यान आणि पुतळा भावी पिढ्यांना सांस्कृतिक राष्ट्रवादाचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी वीर सावरकरांप्रमाणे दृढ राहण्यासाठी प्रेरणा देत राहील.'

अमित शाह आणि डॉ. मोहन भागवत यांनी वीर सावरकर प्रेरणा उद्यानाचेही उद्घाटन केले. त्यांनी सांगितले की, हे उद्यान आणि पुतळा भावी पिढ्यांना सांस्कृतिक राष्ट्रवादाचे रक्षण करण्यासाठी आणि वीर सावरकरांच्या आदर्शांचे पालन करण्यासाठी प्रेरणा देत राहील. १९११ मध्ये ब्रिटिश सरकारने वीर सावरकरांना काळ्या पाण्याची शिक्षा सुनावली होती आणि त्यांना पोर्ट ब्लेअरमधील सेल्युलर तुरुंगात ठेवले होते. आता त्याच ठिकाणाला श्री विजयपुरम म्हणून ओळखले जाते. तिथेच हा भव्य पुतळा उभारण्यात आला आहे. हे ठिकाण आजही स्वातंत्र्य चळवळीच्या अमर गाथांचे प्रतीक आहे..

## दक्षिण आशियातील सर्वात मोठ्या

म्हणून स्थापित करण्याच्या दिशेने एक परिवर्तनकारी पाउल आहे. मजबूत विमानचालन संस्था विकसित करण्यासाठी आणि विमान व्यावसायिकांसाठी संधींचा विस्तार करण्याच्या दृष्टीने ही एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना आहे, असे एमएडीसीने म्हटले आहे.

अमरावती विमानतळाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एअर इंडिया (टाटा समूह) दक्षिण आशियातील सर्वात मोठी उड्डाण प्रशिक्षण संस्थान (एफटीओ) स्थापन करीत आहे. एमएडीसीने एअर इंडियासोबत पुढील ३० वर्षांसाठी ही संस्था चालविण्याचा करार केला आहे. या प्रशिक्षण संस्थेत दरवर्षी सुमारे १८० व्यावसायिक वैमानिक (कमर्शिअल पायलट) तयार करण्याचे लक्ष्य आहे. या संस्थेत एकूण ३४ प्रशिक्षण विमानांचा ताफा राहणार आहे. या अत्याधुनिक विमानांमधून प्रशिक्षणार्थ्यांना धडे दिले जाणार आहेत. यासाठी १० एकर जागेवर पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत. त्यात अत्याधुनिक कॅम्पस, डिजिटल क्लासरूम, जागतिक दर्जाचे वसतीगृह, डिजीटाईज्ड ऑपरेशन्स सेंटर, स्वतःचा विमान देखभाल युनिट, अशा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. या प्रकल्पामुळे विमान वाहतूक क्षेत्रात आणि संलग्न उद्योगांमध्ये ३ हजारांहून अधिक नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

## 'वर्षभर विमान भाड्यावर मर्यादा

बाजाराचे नियमनमुक्त धोरण असले तरी, त्याचा अर्थ कंपन्यांना पूर्ण सूट दिली आहे असा होत नाही, असेही नायडू यांनी स्पष्ट केले. एअरक्राफ्ट ॲक्टनुसार, केंद्र सरकारला असाधारण परिस्थितीत विशेषत? कंपन्यांकडून भाड्याचा गैरवापर होण्याची शक्यता असताना, हस्तक्षेप करण्याचे पुरेसे अधिकार आहेत. या अधिकारांमध्ये प्रवाशांकडून गैरवाजवी दर आकारले जात असल्यास तिकीटाच्या दराला कमाल मर्यादा लागू करण्याचाही समावेश आहे.

**इंडिगो संकट आणि सरकारी हस्तक्षेप-** अलीकडेच डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात इंडिगोच्या हजारोंच्या संख्येने उड्डाण रद्द झाल्यामुळे हवाई भाड्यामध्ये मोठी वाढ झाली होती. या दरवाढीला सरकारने संधीसाधूपणा म्हटले होते. त्यावेळी सरकारने तातडीने हस्तक्षेप करत, अत्यधिक भाडेवाढ रोखण्यासाठी तात्पुरते भाड्याचे स्लॅब लागू केले होते. या संकटाच्या चौकशीसाठी सरकारने चार सदस्यीय समिती स्थापन केली आहे. तसेच, इंडिगोला त्यांच्या वेळापत्रकात असलेल्या विमानांच्या उड्डाणांमध्ये १० टक्के कपात करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.मंत्री नायडू यांनी एअरलाइन्स कंपन्यांना गर्दीच्या वेळी सीट क्षमता वाढवण्याचे, गर्दीच्या मार्गांवर नवीन उड्डाणे सुरू करण्याचे आणि प्रवासी सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आदेश दिल्याचेही लोकसभेत सांगितले.

## सरपंच देशमुख हत्याकांडाचा

ज्यांच्या हसण्या-खेळण्याने संसार फुलला होता, त्या पतीचे वेदनादायक क्षण आठवून त्यांना मोठा धक्का बसला.

पतीच्या क्रूर हत्येच्या क्षणांची आठवण होताच, पत्नी अश्विनी आणि बंधू धनंजय देशमुख यांना कोर्टात अश्रु आवरणे शक्य झाले नाही. गावच्या भल्यासाठी झटणा-या निरपराध भावाची आणि पतीची त्यांनी क्रूर हत्या केली,' या भावनेने त्यांनी तातडीने कोर्टहालबाहेर धाव घेतली आणि तिथे ओक्साबोक्सी रडले. त्यांचे अश्रू पाहून तेथे उपस्थित असलेल्या लोकांचेही डोळे पाणावले. आरोपी वाल्मिक कराडच्या वकिलांनी 'माझा अशिला घटनास्थळापासून शेकडो किलोमीटर दूर होता' आणि 'अटक बेकायदेशीर आहे' असा युक्तिवाद केला. यावर सरकारी वकिलांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. गिरासे यांनी सांगितले की, अव्हाडा कंपनीकडे २ कोटी रु पयांची खंडणी मागण्यात आली होती. सरपंच देशमुख यांनी कंपनी बंद होउ नये, म्हणून केवळ विनंती केली होती. याच 'विनंती'मुळे चिडून आरोपींनी त्यांचे अपहरण केले आणि निर्घृण हत्या केली. सरकारी पक्षाने सिद्ध केले की, कराड हाच या हत्येचा मुख्य सूत्रधार आहे आणि प्रत्यक्ष मारेकरी हत्येच्या वेळी आणि नंतरही कराडच्या कायम संपर्कात होते. सीडीआर रिपोर्ट, ऑडिओ रेकॉर्डिंग आणि न्यायवैद्यक अहवाल हेच सिद्ध करतात.

**पुढील सुनावणी १६ डिसेंबरला-**माझ्या निरपराध पतीला मारणारे आरोपी जामिनावर मोकळे सुटणार नाहीत ना? या भीतीने देशमुख कुटुंबीय न्यायालयाकडे आशेने पाहत आहेत. सरकारी पक्षाचा युक्तिवाद अपूर्ण राहिल्याने या भावनिक प्रकरणाची पुढील सुनावणी आता मंगळवारी, १६ डिसेंबर रोजी होणार आहे.

## पुतिन यांनी पाकच्या पंतप्रधानांना

शरीफ यांनी अचानक उठून, बाजूच्या कक्षात सुरू असलेल्या पुतिन आणि तुर्कीचे राष्ट्राध्यक्ष रेसेप तैयप एर्दोगान यांच्या बंद खोलीतील बैठकीत जबरदस्तीने प्रवेश केला. मात्र, तिथेही त्यांची पुतिन यांच्याशी सविस्तर चर्चा होउ शकली नाही आणि अवघ्या दहा मिनिटांत त्यांना तिथून बाहेर पडावे लागले.

शहबाज शरीफ यांची उडवली खिल्ली

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे आणि शहबाज शरीफ यांची नेटक-यांकडून जोरदार खिल्ली उडवली जात आहे. 'भिका-यांवर पुतिन आपला वेळ वाया घालवू इच्छित नाही,' अशी प्रतिक्रिया एका युजरने दिली. काहींनी या घटनेला आंतरराष्ट्रीय बेइज्जती म्हटले आहे. आणखी एका युजरने त्यांची तुलना लग्नात आमंत्रणाशिवाय घुसलेल्या पाहुण्याशी केली.

भारत दौ-याची चर्चा-ही घटना अशा वेळी घडली आहे, जेव्हा काही दिवसांपूर्वीच रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन दोन दिवसांच्या भारत दौ-यावर आले होते. भारतात त्यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पालम विमानतळावर प्रोटोक?ल मोडून अत्यंत उत्साहाने आणि उबदार स्वागत केले होते. पंतप्रधान मोदी आणि पुतिन एकाच गाडीतून पंतप्रधानांच्या निवासस्थानी गेले होते. या पार्श्वभूमीवर, पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांना पुतिन यांनी ताटकळत ठेवल्याच्या घटनेने भारत आणि पाकिस्तान यांच्याशी असलेल्या रशियाच्या संबंधांतील मोठा फरक समोर आला आहे. दरम्यान, शहबाज शरीफ आणि व्लादिमीर पुतिन यांची थोडक्यात भेट झाली, पण या ४० मिनिटांच्या प्रतीक्षेमुळे शरीफ यांना झालेला आंतरराष्ट्रीय अपमान चर्चेचा विषय बनला आहे.

## संशयित दहशतवादी

संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. बीएसएफच्या जवानांनी ताब्यात घेतलेल्या व्यक्तीची ओळख अब्दुल खालिक अशी झाली असून तो मूळचा राजोरु ई जिल्ह्यातील दारहल भागातील रहिवासी आहे. तसेच त्याचे जैश-ए-मोहम्मदशी संबंध असल्याचा संशय अधिका?यांना आहे. पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, अब्दुल खालिक २०२१ मध्ये पाकव्याप्त काश्मीरमध्ये गेला होता. त्याच्याकडून रायफल, एक मॅगझिन आणि १० गोळ्या तसेच एक रिकामी ड्रम मॅगझिन जप्त करण्यात आली आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, बीएसएफला दोन दिवसांपूर्वी सीमेपलीकडे काही संशयास्पद हालचाली दिसल्या होत्या. त्यानुसार बीएसएफच्या जवानांनी काटेरी तारांच्या कुंपणाजवळील दक्षता आणि गस्त वाढवली होती. आज अब्दुल खालिकने सीमा ओलांडताच सतर्क बीएसएफच्या जवानांनी त्याला पकडलं आणि पोलिसांच्या स्वाधीन केलं, पोलीस पुढील कारवाई करत आहेत.बीएसएफचे उपमहानिरीक्षक विक्रम कुंवर यांनी या महिन्याच्या सुरुवातीला पत्रकारांशी बोलताना सांगितलं होतं की, पाकिस्तानने पुन्हा एकदा सीमावर्ती असलेल्या त्यांच्या भागात ७० पेक्षा अधिक दहशतवादी लाँच पॅड सक्रिय केले आहेत. दरम्यान, त्या पार्श्वभूमीवर जवान अलर्ट असून त्याचाच एक भाग म्हणून आज सुरक्षा दलाने घुसखोरीचा कट उधळून लावला आहे.

## घर जप्त होण्याच्या भीतीने

गंभीर आर्थिक संकटातून जात होते. या आर्थिक विवंचनेमुळे ते प्रचंड तणावात होते. या कुटुंबाच्या आत्महत्येमागे सध्या ते राहत असलेल्या घराचा वाद हे देखील एक कारण आहे. याच घरावर ताबा घेण्यासाठी कोर्टाच्या आदेशानुसार टीम पोहोचली होती.

**तपास सुरू, मृतदेह एम्समध्ये-** या तिन्ही व्यक्तींनी आत्महत्या करण्यापूर्वी दरवाजा आतून बंद केला होता. पोलिसांनी तिन्ही मृतदेह ताब्यात घेतले असून ते एम्स रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. सध्या पोलिसांनी घटनेची नोंद केली असून, सुसाइड नोटमधील मजकूर आणि घराच्या वादासंबंधित कागदपत्रे तपासून या सामूहिक आत्महत्येच्या नेमक्या कारणांचा अधिक तपास सुरू केला आहे. एकाच कुटुंबातील तीन व्यक्तींनी एकत्र येउन आयुष्य संपवल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

अकरा), स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र असे या दोन्ही पुरस्काराचे स्वरूप आहे. निवड समितीतर्फे लवकरच या दोन्ही कृषी पुरस्कार विजेत्यांची घोषणा करण्यात येईल. श्रीमती विमलाबाई देशमुख (वैद्यकीय शिक्षण) अभ्यासवृत्ती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले (कृषी शिक्षण) अभ्यासवृत्ती आणि कस्तुरबा कन्या शाळेतील १० वर्गातील खेळाडू विद्यार्थिनी भक्ती गजानन चौधरी हिला क्रीडाक्षेत्रातील उल्लेखनीय प्राविण्याबद्धल 'डॉ.पंजाबराव देशमुख क्रीडारत्न पुरस्कार' देखील या सोहळ्यात प्रदान करण्यात येतील,असे त्यांनी सांगितले.

शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा जयंती उत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येत आहे.डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने दि.१८ ते २७ डिसेंबर २५ पर्यंत नि:शुल्क कृत्रिम अंगारोपण 'जयपूर फुट' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरासाठी आतापर्यंत ६०० गरजूंनी नोंदणी केली असून या शिबिराचा गरजूंनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयात दि.२५ डिसेंबरला 'आंबा परिषद २०२५' आयोजित करण्यात आली आहे.या आंबा परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्राचे कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार असून डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.आंबा लागवडीचे विदर्भ परिसरातील क्षेत्र वाढविणे, हा या परिषदेचा उद्देश आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेची पहिली शाळा श्री शिवाजी हायस्कूल मेन ब्रँच, अमरावतीचा यावर्षी शताब्दी महोत्सव असून या महोत्सवाचे उद्घाटन २२ डिसेंबरला सकाळी ११ वाजता होत आहे.या महोत्सवाला आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके, माजी आमदार प्रा.बी.टी.देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून महेश पालकर, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक, पुणे यांचे हस्ते उदघाटन होईल.या समारंभात महानगर विज्ञान प्रदर्शनीचे देखील उद्घाटन करण्यात येईल.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमाला' आयोजित करण्यात आली आहे.श्रीमती विमलाबाई देशमुख सभागृहात आयोजित या व्याख्यानमालेत २३ डिसेंबरला अर्थ विचारतज्ञ जयदीप हर्डीकर, नागपूर, दि.२४ डिसेंबरला अविनाश पाटील,संचालक, विवेकनामा फाउंडेशन,धुळे आणि दि.२५ डिसेंबरला भाषातज्ञ डॉ.दीपक पवार, मुंबई यांचे व्याख्यान होईल.डॉ.पंजाबराव देशमुख जयंती उत्सवानिमित्त चित्रकला प्रदर्शनी तसेच पुष्प प्रदर्शनीचे देखील आयोजन करण्यात आले आहे,असेही हर्षवर्धन देशमुख यांनी सांगितले.पत्रकार परिषदेला संस्थेचे उपाध्यक्ष सर्व ॲड.जे.व्ही.पाटील पूसदेकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्रा.सुभाषराव बनसोड, संस्थेचे सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य डॉ.अमोल महल्ले, श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर देशमुख, प्रसिध्दी सचिव डॉ.कुमार बोबडे उपस्थित होते.

## शहरातील विकासकामे

उड्डाणपुलाच्या बांधकामाची मर्यादा संपुष्टात आलेली आहे. यामुळे वाहतूक कोंडी वाढलेली आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी महारेलकडून उड्डाणपुलाचे पूर्णत: मजबूत पुर्नबांधणी कशी करता येईल, याबाबत मार्गदर्शन घ्यावे. अमरावती येथे माहिती तंत्रज्ञान पार्क विकसित करण्यासाठी स्थानिकांचा प्रतिसाद पाहून प्रकल्प रोजगारक्षम बनेल यादृष्टीने प्रयत्न करावेत. शहरात नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी अमृत योजने अंतर्गत प्रस्तावित जलशुध्दीकरण केंद्र, पाण्याच्या जलवाहिन्यांची कामे व पाणी टाकी बांधकाम आदी कामे तात्काळ पूर्ण करावीत.शहरातील जुन्या योजना, प्रकल्प अगोदर कार्यान्वित झाल्यानंतरच नवीन प्रकल्प प्रस्तावित करावेत. प्रकल्पांची उभारणी झाल्यानंतर त्याचे महत्व व उद्देश कायम राहावा यादृष्टीने नियोजन करावे. प्रकल्पाच्या उभारणीनंतर तेथील देखभाल व दुरुस्ती कामे मिळणाऱ्या महसूलातूनच करण्याचे नियोजन करावे. शहरातील छत्री तलाव पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यात येत आहे. येथे नागरिकांच्या सुविधेसाठी आणि पर्यटक आकर्षित करण्यासाठी येथील निर्माणाधीन कार्य तातडीने पूर्ण करावेत. यासाठी जिल्हा नियोजन समिती योजनेचा निधीची तरतूद करावी, असे निर्देश दिले.शहर स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून वाढत्या लोकसंख्येनुसार भूमिगत गटारांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. अमरावती हे विभागीय ठिकाण असूनही तेथील भूमिगत गटारे केवळ २० टक्के आहेत. स्वच्छता व आरोग्यविषयक बाबींसाठी गटार योजना तातडीने पूर्णत्वास नेण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी. तसेच नेहरू मैदान परिसरातील जुनी लाल शाळा व टाऊन हॉल बांधण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार या सर्व प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्यात येईल.शहरातील विकासकामे करताना नेहरू मैदान कायम ठेवण्यात यावे. शहरातील श्री अंबादेवी व श्री एकविरादेवी मंदीर परिसर वर्दळीचा आहे. या ठिकाणी भाविकांची गर्दी लक्षात घेता, प्रस्तावित विकासकाम पूर्ण करताना पहिले प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन रस्ते व नाले, सांडपाणी व्यवस्थापन, मंदीरालगतची दुकाने, भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा, वाहन पार्किंग व्यवस्था आदीबाबी लक्षात घेऊन प्रस्ताव सादर करावा. अमरावतीतील हनुमानगढी हे एक नव्याने विकसित होत असलेले धार्मिक आणि पर्यटनस्थळ आहे. यासंदर्भात चित्रफीत सादर करुन विविध प्रकल्पांबाबत माहिती देण्यात आली. या स्थळाच्या निर्मितीसाठी स्थानिकस्तरावर उपलब्ध बांधकाम साहित्य वापरण्याबाबत निर्देश देण्यात आले. याठिकाणी निर्माण करण्यात येणाऱ्या प्रकल्पांना टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करुन दिला जाईल. अमरावती महानगरपालिका मुख्यालय इमारतीच्या बांधकामासाठी योग्य पर्यायी जागा शोधण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच पीएम मित्रा पार्क अंतर्गत नवीन उद्योगांना आकर्षित करण्यासाठी एमआयडीसीने जमिनीचे दर कमी करावेत, असेही मुख्यमंत्री यांनी सांगितले.

## भावाने आपली किडनी

रुग्ण हा रा. चपराशीपुरा ता. जि. अमरावती येथील रहिवासी असुन मागील २ वर्षापासून डायलिसिस चालु होते मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले त्यावेळी भावाच्या पुढील भविष्याचा विचार करून भाऊ शेख नदीम शेख रहमान (४०वर्ष )यांनी आपली एक किडनी भाऊ नईम ला देण्याचा निर्णय घेतला. आपली एक किडनी नईम ला देऊन त्याला नवीन जीवन दिले. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली.सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. प्रणित काकडे ,युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ. राहुल घुले, डॉ. प्रतिक चिरडे, डॉ विशाल बाहेकर,बधिरिकरण तज्ञ- डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. दिपाली देशमुख, डॉ.रमणिका ढोमणे, डॉ अश्विनी मढावी ,डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे,डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय,डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव,समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी,महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ. पायल रोकडे ,डॉ. दिव्यांनी मुंदाने, त्याचप्रमाणे अधीसेविका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर ज्योती तायडे, सरला राऊत, नीता कांडलकर, दिपाली तायवाडे, माधुरी सोनटक्के, , विवेक तायडे, वैष्णवी निकम, कीर्ती तायडे, अक्षय पवार, मयुरी खेरडे,अनु वडे,योगिश्री पडोळे,वैशाली ढोबळे, कोमल भालेकर, कल्याणी राठोड ,विशाखा बरवान, अर्चना मढावी, वैष्णवी टाकरखेडे, अनिता गोमकाळे ,आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, श्रीधर ढेंगे,औषध विभागामधील योगेश वाडेकर, अमोल वाडेकर, पंकज बेलुरकर, आशिष तायडे,आशिष थुल, गजानन मातकर, सुनीता ठाकूर , संगीता, अविनाश राठोड, आशिष मिश्रा, रुपेश हरडे,दिपटे, पाटील,भेंडकर, गजानन चौधरी,प्रशांत थेटे, निलेश आत्राम इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते.

## भाजपा तर्फे अमरावती

प्रभाग क्रमांक- १०,११,१२,१३,१४,१७,१८, ३) सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०२५ प्रभाग क्रमांक - १९,२०,२१,२२ असे आहे. प्रत्येक प्रभागाला साधारण एक तासाचा वेळ दिलेला आहे, संख्येनुसार थोडा वेळ कमी जास्त होऊ शकतो. मुलाखत दरम्यान कोणत्याही इच्छुकांनी आपले कार्यकर्ते सोबत आणून कोणतेही शक्ती प्रदर्शन नारेबाजी असे प्रकार करू नये. याबाबत काही माहिती व विचारणा करायची असल्यास भाजपा अमरावती शहर जिल्हा महामंत्री बादल कुळकर्णी यांना संपर्क करावा तसेच इच्छुक उमेदवारांनी दिलेल्या सर्व सूचनांचे रीतसर पालन करावे असे आवाहन भाजपा अमरावती शहर तर्फे करण्यात आले आहे.

## १९२ कोटींचे एमडी

कोणता दारूवाला किती पेट्या टाकतो, कोणत्या गल्लीत मटका सुरू आहे, कोणत्या खाडीवर जुगार बसतो याबाबत तंतोतंत माहिती पण एमडीसारखा अत्यंत धोकादायक, प्रचंड नफा देणारा, जिल्हा गुन्हेगारी जगतात 'पांढरपेशा माफियांचा सोन्याचा खाण' म्हटले जाते, असा कारखाना पोलिसांच्या दृष्टीआड कसा राहिला?

दीड वर्षे हा कारखाना कार्यरत होता. रात्रंदिवस रासायनिक कामकाज, वाहतुकीची ये-जा, लाखो रुपयांच्या साहित्यांचा पुरवठाष्ठ हे सर्व सुरू असताना कारंजा पोलिस स्टेशनचा गुप्तहेर विभाग झोपेत होता का? की झोपेचा बहाणा करून खरे काहीतरी 'करणे' सुरू होते? जिल्ह्यात चर्चेचा विषय एकच या अंधत्वाची खरेदी कितीला झाली ?

**ठाणेदारांची बदली तडकाफडकी मग एसपीची कधी?**

या प्रकरणानंतर सरकारने कारंजा पोलिस ठाण्याच्या ठाणेदाराची तडकाफडकी बदली केली. पण नागरिकांचा प्रश्न स्पष्ट आहे, सामान्य ठाणेदारावर कारवाई झाली, मग जिल्ह्याचे पोलिस प्रमुख एसपी यांच्यावर कारवाई कधी ?

एसपी म्हणजे जिल्ह्याचा सर्वोच्च पोलिस अधिकारी. त्यांच्या नाकाखाली १९२ कोटींचा ड्रग्ज कारखाना चालत होता. त्यांना माहिती नव्हती ? मग ते निष्क्रिय ठरतात, माहिती होती ? मग प्रश्न आणखी गंभीर,

**दोन्ही परिस्थितीत एसपीची खुर्ची हलणार, हे आता ठामपणे बोलले जात आहे.**

**गृहराज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच सर्वांत मोठा आमली पदार्थ कारखाना मौन का?**

वर्धा म्हणजे गृहराज्यमंत्र्यांचा 'गड'. त्यांच्या जिल्ह्यातच एवढ्या मोठ्या प्रमाणावर ड्रग्ज कारखाना सुरू होता. गृहखात्याच्या देखरेखीखालील पोलिसांना एवढी मोठी गफलत कशी झाली? गृहराज्यमंत्र्यांनी स्वतः याबाबत काय भूमिका घेतली, जिल्ह्यात प्रचंड संताप आहे. नागरिक म्हणतात, दारूबाजांवर धडाधड मोहिमा काढता येतात, पण कोट्यवधींच्या ड्रग्ज कारखान्यासमोर पोलिसांचे गुडघे का थरथरतात, ?

**विरोधक मौन सर्वपक्षीय संगनमत?**

वर्ध्यात विरोधी पक्षाचा आमदार नाही, पण खासदार मात्र विरोधी पक्षाचा. विधानसभा व लोकसभा दोन्हीकडे दिवाळी अधिवेशन सुरू असून या अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करण्याची संधी विरोधकांना होती. पण विरोधकांनी कुठे बोटही हलवले नाही. नागरिक प्रश्न विचारत आहेत. जिल्ह्यात एवढा मोठा कारखाना चालत असताना विरोधकांना माहिती नव्हती, की सर्वत्र शांतता खरेच खरेदी केली गेली होती.

**वर्ध्यात अजून किती 'छुपे कारखाने'? तपास फक्त नावापुरता?**

१९२ कोटींचा कारखाना पकडला, पण जिल्ह्यात अजून किती असे कारखाने आहेत. ते कोणाच्या संरक्षणाखाली ? त्यांचे जाळे कुठून कुठपर्यंत पोहोचले आहे. किती राजकीय हात त्यात माखले आहेत, ?

**नागरिक म्हणतात,**

गृहराज्यमंत्री आणि एसपी यांनी एकत्र येऊन जिल्ह्यातील प्रत्येक संशयास्पद ठिकाणाची संपूर्ण धडक तपासणी करावी. पण तपासाची 'चलती' पाहता, प्रकरण फक्त खालच्या पातळीवर थांबवले जाणार, अशी भीती व्यक्त होत आहे.

**निष्कर्ष :**जनतेचा विश्वास डळमळला, आता ठोस कारवाईची वेळ या घोटाळ्यामुळे वर्धा पोलिस दलावरचा विश्वास हादरला आहे.दारूवाल्यांना पकडून 'कामगिरी' दाखवणारे पोलिस, पण १९२ कोटींचा कारखाना दिसत नाही ही गोष्ट जिल्ह्याची थट्टा बनली आहे.

## 'ऑपरेशन प्रहार'चा डबल

आली. त्याच्यावर कलम ११०, २२३, ३(५) BNS तसेच पर्यावरण संरक्षण कायदा ४, ५, १५ अंतर्गत गुन्हा दाखल.

तर दुसरी कारवाई ही उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या पर्यवेक्षणाखाली नागपूरी जिन येथील जनसेवा ट्रान्सपोर्ट येथे करण्यात आली.या ठिकाणी ५३९ रील्स, किंमत :५,३९,००० एवढा भलामोठा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला.ही कारवाई पो. उपनिरीक्षक रत्नदीप पळसपगार, अनिल खडेकार, विनय जाधव, रवि घिवे, संदीप गुंजाळ, शेख नदिम, प्रफुल्ल बांगर यांनी पार पाडली. या प्रकरणात मोहम्मद राजीक मोहम्मद इसाक याला अटक, तर शेख अन्सार हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे. दोन्ही आरोपींवरही सदोष मनुष्यवधाच्या प्रयत्नासह गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले.

'ऑपरेशन प्रहार'च्या या दुहेरी कारवायांनी मांजा विक्रेत्यांचे जाळे हादरले असून, अकोला शहरात 'नायलॉन मांजाला नो एंट्री' असा स्पष्ट, कठोर आणि धारदार संदेश पोलिसांनी पुन्हा एकदा देऊन टाकला आहे.

**पोलिसांचे भावनिक आवाहन-** 'प्रतिबंधित चायनिज नायलॉन मांजा विक्री, साठा किंवा वाहतूक दिसल्यास त्वरित माहिती द्या. तुमची एक सूचना एखाद्या निरपराधाचा जीव वाचवू शकते.' असे भावनिक आवाहन यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## दारूसाठी पैसे न दिल्याने

प्रेम ने याकडे दुर्लक्ष केले. शुक्रवारी दुपारी १२ वाजता सुमारास प्रेम जुणी आपल्या घरासमोर बसला होता. त्यावेळी आरोपी तिथे आले त्यांनी त्याला दारू पिण्यासाठी पैसे मागितले. त्याने नकार दिला असता आरोपींनी त्यांचे जवळील चाकू काढून त्याच्या नाकावर, चेहऱ्यावर व डोक्यावर हल्ला केला. यामध्ये तो जखमी झाला. त्याच्यावर उपचार सुरू आहे. त्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## देवदर्शनासाठी जाणाऱ्या

स्थानिकांनी या अपघाताची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मृत व्यक्तींना शवविच्छेदनासाठी रूग्णालयात पाठवले. सध्या जखमींवर कारंजा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, हा अपघात नेमका कसा घडला? याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## रस्त्यासह विजेसाठी होमगार्ड

११.३०वाजता चपरासीपुरा परिसरातून आपले लोटांगण आंदोलन केले. यावेळी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या चपरासी पुरा येथील बंगल्यापासून मोहन सिंह ठाकुर यांच्या घरापर्यंत रस्त्यावर खड्डेच खड्डे झाले आहे. रात्री येथे अंधाराचे साम्राज्य असते. बायपास ते शुक्रवार बाजार येथील हायमास लाईट बंद पडले आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या मार्गावर प्रचंड गर्दी असते. त्यामुळे नागरिकांना शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावे लागत आहे. या अडचणीवर लवकरात लवकर तोडगा काढण्यासाठी मनपा प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते, पण प्रशासनाने याची दखल नाही घेतली. यामुळे होमगार्ड राजेंद्र सिंह बघेल यांनी लोटांगण आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले. यानंतरही प्रशासन जागे नाही झाले तर यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## मनरेगा निधी गिळंकृत

अध्यक्षपद देण्यात आले. नंतर ही जबाबदारी प्रवीण देशमुख यांना दिली गेली.देशमुख व त्यांच्या टीमने प्रकरणाची मुळापासून, कागदोपत्री आणि स्थळस्तरीय तपासणी करून विस्तृत अहवाल सादर केला. यानंतर सीईओ सोमण यांनी प्रकरण गुन्हेगारी स्वरूपाचे असल्याचे ठाम मत देत आर्वी पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले.

**पोलिस कारवाई : अटक, कोठडी आणि निलंबनाचा प्रस्ताव**

या घोटाळ्यात प्रथम सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रणाली कसर हिला अटक केली गेली. नंतर तपासाच्या धाग्यांनी बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांच्याकडे वळताच त्यांनाही अटक करून तीन दिवसांची पोलिस कोठडी मिळविण्यात आली. कोठडीनंतर न्यायालयाने त्यांना जामिनावर मुक्त केले. परंतु, अधिकाऱ्यांच्या सेवेत ४८ तासांपेक्षा जास्त खंड पडल्याने, नियमाप्रमाणे निलंबन प्रस्ताव राज्य शासनाकडे रवाना करण्यात आला आहे. नागपूरमध्ये सचिव उपस्थित : तरीही निलंबनावर शिक्कामोर्तब नाहीहिवाळी अधिवेशनामुळे शासनाचे प्रमुख सचिव नागपूरमध्येच दाखल आहेत. वर्ध्यापासून केवळ ७५ किमी अंतर तरीही मरसकोल्हे यांच्या निलंबनावर अद्याप अंतिम निर्णय न आल्याने जिल्ह्यात मोठी चर्चा रंगली आहे.प्रकरण कुठेतरी तरी अडकवले जात आहे का? असा संशय उपस्थित होऊ लागला आहे.

**पोलिसांनी चौकशी समितीला पुन्हा पाचारण**

गुरुवारी पोलिसांनी केवळ अध्यक्ष देशमुख नव्हे, तर चौकशी समितीतील सर्व सदस्यांना पुन्हा बोलावून प्रकरणातील अधिक तपशील विचारले. समितीच्या तपासातील मुद्दे आणि प्रत्यक्ष कागदपत्रांची सांगड घालत तपास पुढे नेला जात असल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून मिळाली.

**चोराच्या उलट्या बोंबा**

मनरेगा निधी गिळंकृत प्रकरणातील सर्वात मोठा ट्विस्ट म्हणजे प्रकरण दाखल करण्याची तक्रार स्वतः बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांनी केली.पण त्याच प्रकरणात त्यांच्याविरोधातच पुरावे मिळताच पोलिसांनी त्यांना अटक केली. यानंतर अधिकाऱ्यांच्या संघटनेने आंदोलन पेटवले.आता मात्र आरोपीकडूनच पोलिसांवर आरोप होत आहेत, आणि या आरोपांमुळे तपासाला नवे वादंग निर्माण झाले आहे. या सर्व नाट्यमय घटनाक्रमामुळे पुढील काही दिवसांत प्रकरण कोणत्या वळणावर जाईल, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे डोळे लागले आहेत.वर्ध्यापासून केवळ ७५ किमी अंतर तरीही मरसकोल्हे यांच्या निलंबनावर अद्याप अंतिम निर्णय न आल्याने जिल्ह्यात मोठी चर्चा रंगली आहे.प्रकरण कुठेतरी तरी अडकवले जात आहे का? असा संशय उपस्थित होऊ लागला आहे.

**पोलिसांनी चौकशी समितीला पुन्हा पाचारण**

गुरुवारी पोलिसांनी केवळ अध्यक्ष देशमुख नव्हे, तर चौकशी समितीतील सर्व सदस्यांना पुन्हा बोलावून प्रकरणातील अधिक तपशील विचारले. समितीच्या तपासातील मुद्दे आणि प्रत्यक्ष कागदपत्रांची सांगड घालत तपास पुढे नेला जात असल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून मिळाली.

**चोराच्या उलट्या बोंबा-** मनरेगा निधी गिळंकृत प्रकरणातील सर्वात मोठा ट्विस्ट म्हणजे प्रकरण दाखल करण्याची तक्रार स्वतः बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांनी केली.पण त्याच प्रकरणात त्यांच्याविरोधातच पुरावे मिळताच पोलिसांनी त्यांना अटक केली. यानंतर अधिकाऱ्यांच्या संघटनेने आंदोलन पेटवले.आता मात्र आरोपीकडूनच पोलिसांवर आरोप होत आहेत, आणि या आरोपांमुळे तपासाला नवे वादंग निर्माण झाले आहे. या सर्व नाट्यमय घटनाक्रमामुळे पुढील काही दिवसांत प्रकरण कोणत्या वळणावर जाईल, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे डोळे लागले आहेत.

## पोलीस कर्मचाऱ्यावर बलात्काराचा

रोजी तो तिला शॉपिंग वर घेऊन गेला. शॉपिंग झाल्यानंतर आरोपी तिला आपल्या काँग्रेस नगर येथील रूमवर घेऊन आला, जिथे त्याने तिच्याशी बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले. १ नोव्हेंबर रोजी आरोपीने तिला पुन्हा शारीरिक संबंधासाठी म्हटले तर तिने नकार दिला. त्यानंतर आरोपीने तिला मारहाण केली. यामुळे त्रस्त झालेल्या तरुणीने आपल्याच खोलीमध्ये आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. आरोपी आणि त्याच्या मित्राने तिला रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयातून घरी आल्यावर तिने कोर्ट मॅरेजसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले. रजिस्टर ऑफिस मधून मिळालेल्या तारखेनुसार ४ डिसेंबर रोजी ती तिथे पोहचली. परंतु आरोपी गणेश जांभेकर तिथे नाही पोहोचला. त्याचा मोबाईल पण बंद होता. यानंतर ८ डिसेंबर रोजी आरोपी गणेश जांभेकर ने तिला फोन करून मी तुझ्याशी लग्न नाही करणार, जेवढे पैसे पाहिजे तेवढे घेऊन घे आणि माझ्या आयुष्यातून कायमची निघून जा नाहीतर, मी तुझे जगणे मुश्किल करून देणार, अशी धमकी दिली. यामुळे घाबरलेल्या तरुणीने फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

**जाहिर नोटीस**

[illegible]

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शनिवार, १३ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# महानगरात तिक्ष्णगत महोत्सवाचे आयोजन

**अकोला : गत २२ वर्षापासून राष्ट्रीय बालकल्याण व सामाजिक सेवेत राज्यभर सेवारत असणाऱ्या तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी अकोला च्या वतीने महानगरात आठ दिवशीय तीक्ष्णगत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये युवक, युवती व महिला पुरुष नागरिकाच्या आरोग्यासाठी वॉकेथॉन तथा विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, नृत्य तथा वकृत्व स्पर्धा समवेत राष्ट्रीय गायक आदर्श शिंदे यांच्या बहारदार गीतांचा लाईव्ह कॉन्सर्ट कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती तीक्ष्णगत मल्टीपर्पज फाउंडेशनचे अध्यक्ष तथा उत्सवाचे संयोजक डॉ. सुगत वाघमारे यांनी दिली.**


## वॉकेथॉन ,चित्रकला, क्रिकेट, नृत्य, वकृत्व स्पर्धा समवेत राष्ट्रीय गायक आदर्श शिंदे यांच्या संगीतमय गायनाची धम्माल




शासकीय विश्रामगृहात शुक्रवारी आयोजित या आठ दिवशीय महोत्सवाची माहिती देण्यात आली. यावेळी संस्थेचे एड संजय सेंगर, प्रा प्रदिप अवचार, शरद कोकाटे व कालाध्यापक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. बालकांचे भवितव्य व सामाजिक जबाबदारीचा उत्सव म्हणून आयोजित या महोत्सवाचा प्रारंभ रविवार दिनांक १४ डिसेंबर रोजी सकाळी ६-३० वाजता मुंगीलाल बाजोरिया विद्यालय प्रांगणातून वॉकेथॉन या आरोग्यदायी उपक्रमाने होणार आहे. तीक्ष्णगत फाउंडेशन समवेत राज्य बाल हक्क संरक्षण आयोग तथा पोलीस प्रशासन यांच्या सहकार्याने आयोजित या वॉकेथॉन मध्ये राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सचिव लक्ष्मण राऊत, जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे राष्ट्रीय अध्यक्ष रवी नारा, दलित चेंबरचे संस्थापक चेअरमन पद्मश्री मिलिंद कांबळे, अभिनेता अंकुश चौधरी, अभिनेता गौरव मोरे, जि. प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. याच दिनी सकाळी ८ वाजता टावर चौक परिसरातील लालबहादूर शास्त्री स्टेडियम येथे अकोला जिल्हा कलाध्यापक संघाच्या सहकार्याने रंगभरण, चित्रकला स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांसाठी होणार असून या ठिकाणी आठ दिवसीय क्रिकेट स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ही क्रिकेट स्पर्धा दिनांक १४ डिसेंबर ते २१ डिसेंबर पर्यंत नित्य सकाळी ९-३० वाजता गोरक्षण संस्था मैदान, गोरक्षण रोड येथे होणार आहे. महोत्सवात मंगळवार दिनांक १६ डिसेंबर रोजी सायं ६-३० वाजता गोरक्षण रोड येथील मैदानात राष्ट्रीय गायक आदर्श शिंदे व त्यांच्या संगीत चमूचा लाईव्ह कॉन्सर्ट कार्यक्रम सर्व अकोलेकर नागरिकांसाठी होणार आहे. शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर रोजी सायं ६ वाजता रिंग रोड परिसरातील जानोरकर मंगल कार्यालयात स्व. सुरेश भट गझल मंच पुणे यांच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य गजल कार्यक्रम होणार आहे. शनिवार दिनांक २० डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता पोलीस लॉन येथे युवक युवती व महिला पुरुषांसाठी खास भव्य नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. युवक, युवती व महिला पुरुषांच्या सुप्त गुणांना उजाळा देण्यासाठी संस्थेच्या वतीने हा आगळावेगळा उपक्रम आयोजित करण्यात आला असून यामध्ये डान्स इंडियाच्या अंतिम फेरीतील स्पर्धक व महाराष्ट्र बेस्ट डान्सर शो विजेते दीपक हुलसुरे हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. प्रत्येकाला वकृत्व कला जोपासता यावी व आपल्या बोलण्याच्या कलेला उजाळा मिळावा यासाठी संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय भव्य वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. रविवार दिनांक २१ डिसेंबर रोजी स. ९ वाजता एलआरटी महाविद्यालयाच्या सभागृहात राज्यस्तरीय मातृत्व करंडक वकृत्व स्पर्धा होणार यामध्ये विजेत्यांना भव्य पारितोषिक बहाल करण्यात येणार आहे. उत्सवाचा समारोप सुरू असलेल्या आठ दिवसीय क्रिकेट स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमाच्या अनुषंगाने होणार आहे. रविवार दिनांक २१ डिसेंबर गोरक्षण संस्थान मैदान, गोरक्षण रोड येथे क्रिकेट स्पर्धेची अंतिम लढत होऊन विजय चमुस मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिक बहाल करण्यात येणार आहे.

# जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित, पारदर्शक आणि वेळेवर एलपीजी सेवा पुरवावी- जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■



जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित, पारदर्शक आणि वेळेवर एलपीजी सेवा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. गॅस वितरण व्यवस्थेत कोणतीही त्रुटी, अनियमितता किंवा तक्रार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल. शासनाच्या सर्व सूचनांचे पूर्ण पालन करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वय साधावा. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्ह्यातील एलपीजी जोडणी, वितरण आणि तक्रार निवारण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आज महत्त्वपूर्ण जिल्हा उज्ज्वला समिती बैठक संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी राजेंद्र जाधव, बीपीसीएलचे नोडल अधिकारी क्रिष्नकुमार, एचपीसीएलचे प्रतिनिधी अथर्व पानसरे, आयओसिएलचे प्रतिनिधी सन्मान शहारे आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील गॅस पुरवठा प्रणाली अधिक दर्जेदार आणि सुरक्षित करण्यासाठी विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.

बैठकीत जिल्ह्यातील सर्व एलपीजी जोडण्यांची भौतिक पडताळणी नियमित करण्याचे निर्देश देण्यात आले. अनधिकृत, बोगस किंवा दुप्पट कनेक्शन ओळखून त्यावर कारवाई करण्याचे ठरले. पडताळणी पथकांनी अधिक काटेकोर आणि प्रत्यक्ष पाहणी करण्यावर भर देण्यात आला. ग्राहकांकडून येणाऱ्या तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी विशेष नियंत्रण कक्ष सक्रिय ठेवण्याचे आदेश देण्यात आले.

सिलेंडर वितरणातील विलंब, ओव्हररेटिंग, वजनातील तफावत अशा तक्रारी तत्काळ निकाली काढण्यासाठी एजन्सींना कडक सूचना देण्यात आल्या. एलपीजी वितरण करताना वाहतूक वाहनांची तपासणी, सिलेंडर हाताळणी, कर्मचाऱ्यांचे सुरक्षा प्रशिक्षण, अग्निशमन साधनांची उपलब्धता अशा मुद्द्यांवर चर्चा होऊन सुरक्षा मानकांचे काटेकोर पालन करण्यावर भर देण्यात आला. अपघात टाळण्यासाठी एजन्सींनी नियमितपणे सुरक्षा तपासणी करावी, असा निर्देश करण्यात आला.

**ग्राहक सुविधा अधिक प्रभावी करण्यावर भर**

- ☐ एसएमएस / मोबाईल ॲपद्वारे बुकिंग व वितरण माहिती
- ☐ डिजिटल पेमेंट सुविधा
- ☐ वरिष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी विशेष सेवा
- ☐ सुरक्षा मार्गदर्शन मोहीम

या सुविधा सर्वत्र प्रभावीतेने राबविण्याचे निर्देश देण्यात आले.

**बोगस कनेक्शनविरोधात विशेष मोहीम**

अनधिकृत स्टोव्ह विक्री, व्यावसायिक वापरासाठी घरगुती गॅसचा गैरवापर, अस्तित्वात नसलेल्या व्यक्तींच्या नावावर घेतलेले कनेक्शन यावर विशेष मोहीम राबवून तपास करण्याचे ठरविण्यात आले.

**एजन्सींचे कामकाज पारदर्शक करण्याचे आदेश :** एलपीजी एजन्सींनी वितरण नोंदी, ग्राहक यादी, स्टॉक तपशील अद्यावत ठेवणे अनिवार्य करण्यात आले. एजन्सीकडून कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क आकारल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा बैठकीत देण्यात आला.

बैठक उत्साहपूर्ण आणि चर्चाप्रधान वातावरणात संपन्न झाली. एलपीजी जोडणी व वितरण व्यवस्थेतील सुधारणा, तक्रार निवारण यंत्रणा आणि सुरक्षा मानकांचे बळकटीकरण यासंबंधी घेतलेल्या निर्णयांचा जिल्ह्यातील नागरिकांना मोठा लाभ होणार आहे, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

# मालेगावात अल्पवयीन मुलांची धूम स्टाईल पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरात अल्पवयीन मुले तथा काही मोठे युवक शाळा कॉलेज व ट्युशन एरियाच्या बाहेर धूम स्टाईलने बाईक पळवताना दिसत आहे याकडे पोलीस प्रशासनाने लक्ष देऊन वेळीच आवर घालण्याची गरज आहे. तसेच निर्भया पथकाने त्यावेळी दक्ष राहणे गरजेचे आहे. अन्यथा मोठा अपघात होऊ शकतो.

मालेगाव शहरात अनेक शाळा महाविद्यालय तसेच अनेक कोचिंग क्लासेस सुद्धा आहेत या ठिकाणी अनेक मुली मुले शिक्षण घेत आहेत मात्र त्या ठिकाणी शहरातील काही अल्पवयीन मुले दुचाकी वर डबलसीट ट्रिपल सीट बसून तसेच काही मोठे युवा सुद्धा गाडीवर बसून जोराने वाहने पळवताना दिसत आहेत. मालेगाव शहरात अनेक मुली रूम भाड्याने घेऊन शिक्षण घेत आहेत इथूनच अनेक जण वाशिम ला अप डाउन करत आहे मात्र रस्त्याने जाताना येताना अनेक जण दुचाकी वर तिचा किंवा जोरजाने वाहने पळवत आहेत. या तुम्ही स्टाईलने बाईक पळवल्यामुळे खर्च केला अपघात होता वाचले आहेत या ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.


**मंगळवारी शिवचौकातील गर्दी कधी कमी होणार ? :** शहरात मंगळवारी बाजार भरतो मात्र त्या दिवशी शिवचौकात लोक रस्त्यावर वाहनउभी करतात तसेच दुकाने सुद्धा रस्त्यावर लागतात त्यामुळे जाणार येणाऱ्या महिला तसेच पुरुषांना नाहक त्रास सहन करावा लागतो पोलीस प्रशासनाने याकडे लक्ष देऊन तो रस्ता मोकळा करावा अशी शहरातून मागणी जोर धरत आहे.

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

## दोन भाविकांचा जागीच मृत्यू; दोघे गंभीर जखमी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

यवतमाळ येथून शिर्डीला देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या कारचा समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला. ११ डिसेंबर रोजी रात्री सुमारे ९.१० वाजताच्या सुमारास धनज बुद्रुक पोलिस स्टेशनच्या हद्दीत ही दुर्घटना घडली. अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत.



प्राप्त माहितीनुसार, एमएच २९ बीसी २५६५ क्रमांकाच्या कारमधून चौघेजण शिर्डीकडे जात असताना त्यांच्या वाहनासमोर धावणाऱ्या बोलेरो पिकअपने अचानक ब्रेक मारला. भरधाव वेगातील कार अनियंत्रित होऊन पिकअपला जोरदार धडक बसली. या अपघातात कार चालक मंगेश (पूर्ण नाव मिळू शकले नाही) तसेच विक्रम अशोकराव सौरगपते (वय ४०, रा. यवतमाळ) यांचा जागीच मृत्यू झाला. तर अनुकूल मनोज यादव (वय ३५, रा. दत्त चौक, यवतमाळ) आणि मयूर दीपक डोनाडकर (वय २९, रा. दत्त चौक, यवतमाळ) गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती सर्वप्रथम रुग्णसेवक गौरव ठाकरे यांनी रुग्णसेवक गजानन करडे यांना दिली. त्यानंतर श्री गुरुमंदिर रुग्णवाहिका चालक रमेश देशमुख तसेच टोल प्लाझा कारंजा समृद्धी महामार्ग १०८ रुग्णवाहिका पायलट सोनू शिंदे, डॉ. राठोड आणि शिवनी १०८ पायलट गोपाल रोहनकर तात्काळ मदतीसाठी रवाना झाले.

तीनही रुग्णवाहिका पथकांनी तत्परतेने घटनास्थळी पोहोचून मृतदेह आणि जखमींना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी जखमींवर उपचार सुरू केले. तसेच कारंजा टोल प्लाझा अग्निशमन दल, समृद्धी महामार्ग अग्निशमन पथक आणि शिवनी टोलबाजार अग्निशमन दलानेही मदतकार्यामध्ये सक्रिय सहभाग घेतला.

# जिल्ह्यातील २४ वाळूघाटांच्या ई- लिलावाला मुदतवाढ

**अकोला :** जिल्ह्यातील अकोला बाळापुर तालुक्यातील १० वाळू घाटांच्या लिलावाला चौथी मुदतवाढ देण्यात आली आहे. यामध्ये अकोला तालुक्यातील कपिलेश्वर, एकलारा, म्हैसांग, उगवा बाळापुर तालुक्यातील निंबी, बहादूरा , सागद, नागद, डोंगरगाव मांजरी वाळूघाट समाविष्ट आहेत तर मूर्तिजापूर बाळापूर आणि तेल्हारा तालुक्यातील १४ वाळू घाटांना ई लिलावासाठी प्रथम मुदतवाढ देण्यात आली आहे. यामध्ये मुर्तीजापुर तालुक्यातील लाखपुरी २, विरवाडा, कोळसरा- १, खापरवाडा- २(खैरी), दुर्गवाडा, लोनसना, सांगवी, बपोरी, पिंगळा दापुरा, बाळापुर तालुक्यातील काजीखेड-२, हिंगणा शिकारी, मोखा, स्वरूपखेड, जानोरीमेळ तेल्हारा तालुक्यातील वांगरगांव वाळूघाटांचा समावेश आहे. घाटांच्या ई-लिलावाच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला असून, शुद्धीपत्रक निर्मगित करण्यात आले आहे. जास्तीत जास्त लिलावधारकांनी सहभाग नोंदवावा.

# गोविंद स्कूलमध्ये जागतिक दिव्यांग सप्ताहानिमित्त सत्कार सोहळा संपन्न



**कारंजा :** ३ ते ९ डिसेंबर या कालावधीत साजऱ्या करण्यात आलेल्या जागतिक दिव्यांग सप्ताहानिमित्त गोविंद महाराज उच्च प्राथमिक मराठी शाळा, कारंजा येथे विविध उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. दिव्यांग विद्यार्थ्यांबद्दल समाजात सहानुभूती, संवेदनशीलता आणि समान संधीची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

या सप्ताहात रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, पोस्टर मेकिंग, चित्रकला स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. या विशेष सत्कार कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेले मनोगत सर्वांच्या मनाला स्पर्शून गेले, तसेच त्यांच्या जिद्दीचे आणि प्रतिभेचे सर्वांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किरण चौधरी हे होते.

या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती करंजा नगरीचे तहसीलदार कुणाल झाल्टे यांनी उपस्थित राहून दिव्यांगांबद्दल सहानुभूती, संवेदनशील दृष्टिकोन आणि सर्वसमावेशक समाज निर्माण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच पंचायत समिती, कारंजाचे गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी अतुल गणवीर, आकाश चव्हाण, ज्योती कोपणार, भटकर, राहुल वरघट यांसह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. गोविंद महाराज उच्च प्राथमिक मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका कुमारी अपर्णा कदम, गोविंद न्यू इंग्लिश पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना काकडे, पर्यवेक्षिका सौ. किरण व्यास, गोविंद कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका योगिनी गुगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत दिव्यांग सप्ताहाचे महत्त्व अधोरेखित केले. शाळेचे संचालक संतोष चौधरी यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या प्रती सहानुभूतीची भावना ठेवणे किती महत्त्वाची आहे याचे महत्त्व पटवून दिले.

# पद्मविभूषण शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

## मोफत वैद्यकीय शिबीरात ४०० नागरिकांची तपासणी, रुग्णसेवेसाठी खिचडी वाटप व दर्ग्यात चादर अर्पण

■ प्रतिनिधी | अकोला ■

पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) तर्फे अकोला शहरात विविध सामाजिक व जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सुभाष रोडवरील खश्ऊ हॉलमध्ये घेण्यात आलेल्या भव्य मोफत वैद्यकीय तपासणी व उपचार शिबिरात ४०० हून अधिक नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तर शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाइकांना गरम खिचडीचे वाटप तसेच आगा शाह बावा दर्ग्यात चादर अर्पण करून शरद पवार यांच्या दीर्घायुष्यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली.



वैद्यकीय शिबिरात फिजिशियन, सर्जन, हृदयरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ आदी तज्ज्ञांनी तपासण्या केल्या. हीमोग्लोबिन, ब्लड शुगर, CBC, KFT, LFT, HIV, HbA1c अशा विविध रक्त तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात आल्या, तर गरजूंना विनामूल्य औषधे देण्यात आली. या उपक्रमाचे समन्वयक डॉ. श्रेया अग्रवाल होते. गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज आणि जिल्हा सरकारी रुग्णालयातील वैद्यकीय टीमने मोठे योगदान दिले. डॉ. प्रेमभूषण, डॉ. तापरे, डॉ. विनोद सर्वदे, डॉ. अमित, डॉ. तमया, डॉ. कांबले, डॉ. निखिल, डॉ. गौरी, डॉ. दीक्षा, डॉ. निकिता, डॉ. अररानी राऊत, डॉ. निखांत तसेच डॉ. रश्मी, डॉ. पवार, डॉ. अतहर रहमान, डॉ. महेंद्र, डॉ. तनवीर अहमद यांनी रुग्ण तपासणीत सहभाग नोंदवला.

**प्रदेश संघटक जावेद जकरिया म्हणाले :** 'या शिबिराचा उद्देश गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना मोफत आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हा होता. नागरिकांकडून मिळालेल्या उत्साही प्रतिसादामुळे उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.'

**रुग्णसेवा व धार्मिक उपक्रमही संपन्न :** शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस, महानगर अकोला यांच्या वतीने शासकीय रुग्णालयातील रुग्णांसोबत त्यांच्या नातेवाइकांना गरम खिचडी वाटप करण्यात आले. तसेच आगा शाह बावा दर्ग्यात चादर अर्पण करून विशेष प्रार्थना करण्यात आली. उपक्रमांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष व वरिष्ठ नेते श्याम अवस्थी, महानगराध्यक्ष रफीक सिद्दीकी, प्रदेश सचिव जावेद जकरिया, महानगर कार्याध्यक्ष सय्यद युसूफ अली, देवेंद्र ताले, अकोला पश्चिमचे अध्यक्ष महमूद खान पठाण, माजी नगरसेवक फरीद पहलवान, अल्पसंख्याक विभागाध्यक्ष वसीम खान, दिव्यांग सेल अध्यक्ष सालारभाई, तसेच मोहम्मद शफीक, अमन घरडे, इब्राहिमभाई, वसीम सिद्दीकी, शाहिद सिद्दीकी यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्व उपक्रमांचे आयोजन महानगराध्यक्ष रफीक सिद्दीकी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले. शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात झालेल्या या सामाजिक उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आज श्री दुर्गादेवी संस्थानचा यात्रा महोत्सव सोहळा

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला जिल्ह्यातील शिवर येथील अतिशय प्राचीन व जागृत श्री दुर्गादेवी संस्थानच्या ३४ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर आज यात्रा महोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण शिवर नगरी भक्तिमय वातावरणाने नटली आहे.

या उत्सवांतर्गत हभप कैलासचंद्र महाराज चांदुरकर यांच्या मधुर वाणीतून पार पडलेला संगीत श्रीमद् भागवत कथा प्रवचन सप्ताह भाविकांसाठी अध्यात्मिक आनंदाचा पर्वणी ठरला. सप्ताहादरम्यान महाराष्ट्रातील नामवंत हरीकिर्तनकार महाराजांनी प्रबोधनपर हरीकिर्तनांनी भक्तिमार्ग सुगंधित केला. सप्ताहाचा भव्य समारोप १३ डिसेंबर २०२५ रोजी हभप परम पूज्य गुरुवर्य सखाराम महाराज सखारापुरकर यांच्या कालयाच्या कीर्तनाने होणार असून कीर्तनाचे वेळापत्रक सकाळी ८.३० ते १०.३० असे आहे. याच दिवशी यात्रा महोत्सवानिमित्त दुपारी १ ते ३ या वेळेत महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. माऊली हरीपाठ मंडळ यांच्या नेतृत्वाखाली शिवर गावातून भव्य नगरप्रदक्षिणा काढण्यात येणार असून गावात आकर्षक सजावट, प्रकाशयोजना आणि धार्मिक ध्वनीफितींनी यात्रेचा माहोल उजळून निघाला आहे. या मिरवणुकीत अकोला जिल्ह्यातील विविध हरीपाठ मंडळे, व्यायामशाळांच्या पथका, शाळांचे विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

# विधीमंडळाच्या अधिवेशनात शिक्षणाच्या प्रश्नाला बगल

## स्वतंत्र अधिवेशन घेण्याची शिक्षण बचाव समन्वय समितीची मागणी

**वाशिम : नागपुर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात शिक्षणाच्या बाबतीत मुलभूत प्रश्नांवर चर्चा न झाल्याने तसेच शिक्षणाच्या गंभीर समस्यांकडे लोकप्रतिनिधींनी कानाडोळा केला असल्याने सरकार या प्रश्नावर गंभीर नसल्याची टिका शिक्षण बचाव समन्वय समितीचे राज्य समन्वयक रमेश बिजेकर यांनी केली आहे. या पार्श्वभूमिवर शिक्षणाच्या प्रश्नावर स्वतंत्र अधिवेशन बोलावण्याची मागणी विदर्भस्तरीय शिक्षण बचाव समन्वय समितीने दि. १० डिसेंबर रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकाद्वारे केली आहे.**

याबाबत दिलेल्या प्रसिध्दी पत्रकानुसार, सालाबादाप्रमाणे यंदाही महाराष्ट्र विधिमंडळाचे अधिवेशन दि. ८ डिसेंबर पासुन सुरु झाले आहे. नागपुर कराराप्रमाणे अधिवेशन भरविण्याची केवळ औपचारिकता पार पाडली जात आहे. खरेतर जनतेच्या रोजच्या जगण्याचे प्रश्न चर्चेत घेवून त्याची सोडवणुक व्हावी, यातुन जनतेच्या हिताची अंमलबजावणी व्हावी ही रास्त अपेक्षा असते. या कसोटीवर आतापर्यंतची अधिवेशने खरी ठरली आहेत, असे खात्रीपुर्वक सांगता येत नाही. तरीही सरकारची महत्वाची कृती म्हणून त्याकडे बघावे लागते. या अधिवेशनात सरकारच्या वतीने १८ विधेयके, ४७ तारांकित प्रश्न, ३६ अतारांकित प्रश्न व २५ लक्षवेधी प्रश्न मांडले जाणार असल्याचे आहेत.

या प्रश्नांचे वर्गिकरण केल्यास व्यवस्थेच्या लक्षणांचीच चर्चा प्रभावी असल्याचे दिसते. खुन, बलात्कार, शेतक-यांची नुकसान भरपाई, चोरी, प्रदुषण, अंमली पदार्थ अशाच प्रश्नांची चर्चा अधिक आहे. या प्रश्नांना कमी लेखण्याचे काही कारण नाही, परंतु अत्यंत महत्वाचे प्रश्न विधीमंडळाच्या पटलावर न येणे महाराष्ट्राची चिंता वाढवणारे आहे. ताराकिंत, अतारांकित व लक्षवेधी या सगळ्या प्रश्नांची एकुण संख्या १०८ आहे. एकुण १०८ प्रश्नांपैकी केवळ ४ प्रश्न शिक्षणांशी संबंधित आहेत. शिक्षणावर केवळ ३.७ टक्के प्रश्न विचारले जाणार आहेत. सत्ताधारी व विरोधी राजकीय पक्षांची शिक्षणाशी बांधिलकी किती हे यातुन स्पष्ट होते. ४ प्रश्नांपैकी एक प्रश्न मुंबई महानगर पालिकेच्या शाळांच्या खाजगीकरण करण्यासंबंधी आहे. दुसरा प्रश्न शाळेतील सुविधा संबंधी ज्यात भारत व राज्य सरकारकडुन डीजीटल योजनांची घोषणा करण्यात आली होती. त्याचीही अंमलबजावणी झाली नाही. उलट ४४३३० शाळांमध्ये वीजेचा पुरवठा नाही. या शाळांना विजपुरवठा करण्यात आला नाही, आणि वीजपुरवठा नसलेल्या शाळांच्या संख्येत ७४२ शाळांची भर पडलेली आहे. याची विचारणा करणारा हा प्रश्न आहे. तिसरा प्रश्न वैद्यकीय शिक्षणाचा आहे. वैद्यकीय शिक्षणात जास्त फी आकारण्यासंबंधी प्रश्न विधिमंडळाच्या पटलावर मांडला जाणार आहे. चौथा प्रश्न दहावीच्या भूगोलाच्या व इंग्रजी माध्यमाच्या विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकातील चुका निदर्शनात आणुन देणारा आहे. हे सर्व प्रश्न मूलभूत प्रश्न नाहीत. शिक्षण व्यवस्थेत सुधारणेचे प्रश्न आहेत.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १८ ■ शनिवार, १३ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# १९२ कोटींचे एमडी प्रकरण : वर्धा पोलिसांचा खरा चेहरा केला उघडा

## गुप्तहेर गायब, नाकेबंदी झोपेत : बीट अधिकारी गुंगेमध्ये : दीड वर्ष चालणारी ड्रग्ज फॅक्टरी दिसली कशी नाही

**-पोलीस अधिक्षक अडचणीत ; गृहराज्यमंत्र्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात!**

**वर्धा रवींद्र लाखे :** - वर्धा जिल्ह्यात १९२ कोटी रुपयांच्या अवैध एमडी (मिथाइल डायलेमिथिलएमेथॅम्फेटामाइन) कारखान्याचा पर्दाफाश झाला आणि संपूर्ण जिल्हा हादरला आहे. दीड वर्षे सुरू असलेला हा भलामोठा ड्रग्ज कारखाना पोलिसांच्या नजरेआड कसा राहिला, ?

जिल्ह्यात दारू विकणाऱ्या ठिकाणापासून छोट्या गावातील बेकायदेशीर धंद्यापर्यंत प्रत्येक हालचालीवर नजर ठेवणारे वर्धा जिल्हा पोलीस. कोणत्या गल्लीमध्ये कोणाचा अड्डा, कोणत्या चौकात कोण रात्री 'डिलिव्हरी' देतो, हे सर्व तोंडपाठ असलेल्या या यंत्रणेला मात्र तब्बल १९२ कोटींचा एमडी कारखाना दीड वर्षे दिसला कसा नाही,

यावरून नागरिकांत संताप उसळला असून, संपूर्ण जिल्हाभर एकच प्रश्न उपस्थित होते ही निष्काळजीपणा की कोणाचे तरी संरक्षण? याचे उत्तर मात्र कोणी देत नाही. पोलीस अधीक्षक आता तपासाच्या भोवऱ्यात गुरफटले असून जिल्ह्यातील पोलिस यंत्रणेवर पुन्हा एकदा अविश्वासाचे ढग दाटू लागले आहेत. गंजलेली गुप्तहेर यंत्रणा दारूबाजांच्या गल्लीपर्यंत दृष्टी, तर १९२ कोटींचा कारखाना अडचणीचा?



वर्ध्यातील पोलिस गुप्तहेरांची जागरूकता म्हणजे प्रसिद्ध विनोदच कोणता दारूवाला किती पेट्या टाकतो, कोणत्या गल्लीत मटका सुरू आहे, कोणत्या खाडीवर जुगार बसतो याबाबत तंतोतंत माहिती पण एमडीसारखा अत्यंत धोकादायक, प्रचंड नफा देणारा, जिल्हा गुन्हेगारी जगतात 'पांढरपेशा माफियांचा सोन्याचा खाण' म्हटले जाते, असा कारखाना पोलिसांच्या दृष्टीआड कसा राहिला?

दीड वर्षे हा कारखाना कार्यरत होता. रात्रंदिवस रासायनिक कामकाज, वाहतुकीची ये-जा, लाखो रुपयांच्या साहित्यांचा पुरवठाष्ठ हे सर्व सुरू असताना कारंजा पोलिस स्टेशनचा गुप्तहेर विभाग झोपेत होता का? की झोपेचा बहाणा करून खरे काहीतरी 'करणे' सुरू होते? जिल्ह्यात चर्चेचा विषय एकच या अंधत्वाची खरेदी कितीला झाली ?

**ठाणेदारांची बदली तडकाफडकी मग एसपीची कधी?**

या प्रकरणानंतर सरकारने कारंजा पोलिस ठाण्याच्या ठाणेदाराची तडकाफडकी बदली केली. पण नागरिकांचा प्रश्न स्पष्ट आहे, सामान्य ठाणेदारावर कारवाई झाली, मग जिल्ह्याचे पोलिस प्रमुख एसपी यांच्यावर कारवाई कधी ?

एसपी म्हणजे जिल्ह्याचा सर्वोच्च पोलिस अधिकारी. त्यांच्या नाकाखाली १९२ कोटींचा ड्रग्ज कारखाना चालत होता. त्यांना माहिती नव्हती ? मग ते निष्क्रिय ठरतात, माहिती होती ? मग प्रश्न आणखी गंभीर,

**दोन्ही परिस्थितीत एसपीची खुर्ची हलणार, हे आता ठामपणे बोलले जात आहे.**

**गृहराज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच सर्वांत मोठा आमली पदार्थ कारखाना मौन का?**

वर्धा म्हणजे गृहराज्यमंत्र्यांचा 'गड'. त्यांच्या जिल्ह्यातच एवढ्या मोठ्या प्रमाणावर ड्रग्ज कारखाना सुरू होता. गृहखात्याच्या देखरेखीखालील पोलिसांना एवढी मोठी गफलत कशी झाली? गृहराज्यमंत्र्यांनी स्वतः याबाबत काय भूमिका घेतली,

जिल्ह्यात प्रचंड संताप आहे. नागरिक म्हणतात, दारूबाजांवर धडाधड मोहिमा काढता येतात, पण कोट्यवधींच्या ड्रग्ज कारखान्यासमोर पोलिसांचे गुडघे का थरथरतात, ?

**विरोधक मौन सर्वपक्षीय संगनमत?**

वर्ध्यात विरोधी पक्षाचा आमदार नाही, पण खासदार मात्र विरोधी पक्षाचा. विधानसभा व लोकसभा दोन्हीकडे दिवाळी अधिवेशन सुरू असून या अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करण्याची संधी विरोधकांना होती. पण विरोधकांनी कुठे बोटही हलवले नाही. नागरिक प्रश्न विचारत आहेत. जिल्ह्यात एवढा मोठा कारखाना चालत असताना विरोधकांना माहिती नव्हती, की सर्वत्र शांतता खरेच खरेदी केली गेली होती.

**वर्ध्यात अजून किती 'छुपे कारखाने'? तपास फक्त नावापुरता?**

१९२ कोटींचा कारखाना पकडला, पण जिल्ह्यात अजून किती असे कारखाने आहेत. ते कोणाच्या संरक्षणाखाली ? त्यांचे जाळे कुठून कुठपर्यंत पोहोचले आहे. किती राजकीय हात त्यात माखले आहेत, ?

**नागरिक म्हणतात,**

गृहराज्यमंत्री आणि एसपी यांनी एकत्र येऊन जिल्ह्यातील प्रत्येक संशयास्पद ठिकाणाची संपूर्ण धडक तपासणी करावी. पण तपासाची 'चलती' पाहता, प्रकरण फक्त खालच्या पातळीवर थांबवले जाणार, अशी भीती व्यक्त होत आहे.

**निष्कर्ष :** जनतेचा विश्वास डळमळला, आता ठोस कारवाईची वेळ या घोटाळ्यामुळे वर्धा पोलिस दलावरचा विश्वास हादरला आहे.

दारूवाल्यांना पकडून 'कामगिरी' दाखवणारे पोलिस, पण १९२ कोटींचा कारखाना दिसत नाही ही गोष्ट जिल्ह्याची थट्टा बनली आहे.

# मनरेगा निधी गिळंकृत प्रकरणात नवे धक्कादायक वळण

## -जिल्हास्तरीय समिती अध्यक्षांचे बयाण नोंदविले

**- मरसकोल्हे यांच्या निलंबनावर अजूनही शिक्कामोर्तब नाही**

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी पंचायत समितीतील मनरेगा निधीचा ७० लाखांहून अधिकचा घोटाळा आता नव्या वळणावर पोहोचला आहे. 'अर्धे तुम्ही अर्धे आम्ही' या संशयास्पद सूत्रावर चाललेली कथित फसवणूक समोर आल्यानंतर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी प्रकरणाची गंभीर नोंद घेत चौकशी समिती नेमली. समितीच्या तपासानंतर गुन्हाही दाखल करण्यात आला. मात्र या सर्व घडामोडींमध्ये मुख्य आरोपी मानल्या जाणाऱ्या बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांच्या निलंबनावर अद्यापही शासनाने शिक्कामोर्तब न केल्याने संपूर्ण जिल्ह्यात चर्चांना उधाण आले आहे.

गुरुवार, ११ डिसेंबर रोजी तपास अधिकाऱ्यांनी जिल्हास्तरीय चौकशी समितीचे अध्यक्ष व कारंजा पं.स.चे गटविकास अधिकारी प्रवीण देशमुख यांचे सविस्तर बयाण नोंदविले. यावेळी काही धक्कादायक माहिती समोर आल्याचे अत्यंत खात्रीलायक सूत्रांकडून समजते.

या प्रकरणातील सुरुवातीची प्राथमिक चौकशी स्वतः बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांनी केली होती. त्यांच्या अहवालात २५ लाखांचा अपहार स्पष्टपणे नोंदला गेला. यानंतर सीईओ सोमण यांनी प्रकरण दडपण्यापेक्षा अधिक तपासासाठी जिल्हास्तरीय समिती गठित केली. प्रथम समुद्रपूरचे गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर सावसागडे यांच्याकडे समिती अध्यक्षपद देण्यात आले. नंतर ही जबाबदारी प्रवीण देशमुख यांना दिली गेली.

देशमुख व त्यांच्या टीमने प्रकरणाची मुळापासून, कागदोपत्री आणि स्थळस्तरीय तपासणी करून विस्तृत अहवाल सादर केला. यानंतर सीईओ सोमण यांनी प्रकरण गुन्हेगारी स्वरूपाचे असल्याचे ठाम मत देत आर्वी पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले.

**पोलिस कारवाई : अटक, कोठडी आणि निलंबनाचा प्रस्ताव**

या घोटाळ्यात प्रथम सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रणाली कसर हिला अटक केली गेली. नंतर तपासाच्या धाग्यांनी बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांच्याकडे वळताच त्यांनाही अटक करून तीन दिवसांची पोलिस कोठडी मिळविण्यात आली.

कोठडीनंतर न्यायालयाने त्यांना जामिनावर मुक्त केले. परंतु, अधिकाऱ्यांच्या सेवेत ४८ तासांपेक्षा जास्त खंड पडल्याने, नियमाप्रमाणे निलंबन प्रस्ताव राज्य शासनाकडे रवाना करण्यात आला आहे. नागपूरमध्ये सचिव उपस्थित : तरीही निलंबनावर शिक्कामोर्तब नाही

हिवाळी अधिवेशनामुळे शासनाचे प्रमुख सचिव नागपूरमध्येच दाखल आहेत. वर्ध्यापासून केवळ ७५ किमी अंतर तरीही मरसकोल्हे यांच्या निलंबनावर अद्याप अंतिम निर्णय न आल्याने जिल्ह्यात मोठी चर्चा रंगली आहे.

प्रकरण कुठेतरी तरी अडकवले जात आहे का? असा संशय उपस्थित होऊ लागला आहे.

**पोलिसांनी चौकशी समितीला पुन्हा पाचारण**

गुरुवारी पोलिसांनी केवळ अध्यक्ष देशमुख नव्हे, तर चौकशी समितीतील सर्व सदस्यांना पुन्हा बोलावून प्रकरणातील अधिक तपशील विचारले. समितीच्या तपासातील मुद्दे आणि प्रत्यक्ष कागदपत्रांची सांगड घालत तपास पुढे नेला जात असल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून मिळाली.

**चोराच्या उलट्या बोंबा**

मनरेगा निधी गिळंकृत प्रकरणातील सर्वात मोठा ट्विस्ट म्हणजे प्रकरण दाखल करण्याची तक्रार स्वतः बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांनी केली.

पण त्याच प्रकरणात त्यांच्याविरोधातच पुरावे मिळताच पोलिसांनी त्यांना अटक केली. यानंतर अधिकाऱ्यांच्या संघटनेने आंदोलन पेटवले.

आता मात्र आरोपीकडूनच पोलिसांवर आरोप होत आहेत, आणि या आरोपांमुळे तपासाला नवे वादंग निर्माण झाले आहे. या सर्व नाट्यमय घटनाक्रमामुळे पुढील काही दिवसांत प्रकरण कोणत्या वळणावर जाईल, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे डोळे लागले आहेत.

# बिबट्याच्या कातडीची २० कोटींमध्ये तस्करी रोकली

## -पाच आरोपी न्यायालयीन कोठडीत; दोन सूरे जप्त

**वर्धा जनमाध्यम :** नागपूर जिल्ह्यातील हिंगणा परिसरात तारेच्या कुंपणात वीज प्रवाहित करून बिबट्याची शिकार करण्यात आली आणि त्याची कातडी तब्बल २० कोटींना विक्री करण्याच्या बेतात असल्याची माहिती वनविभागाच्या तपासात उघड झाली आहे. या प्रकरणातील पाच आरोपींना शुक्रवारी न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले.



वनविभागाच्या पथकाने प्राथमिक कारवाईत शालिनी पवार, अनिस तुमडाम आणि सौरभ रंदई यांना ताब्यात घेऊन अटक केली होती. अनिस याचा जामिनासाठीचा अर्ज न्यायालयाने मंजूर केला. दरम्यान, शालिनी पवार, सौरभ रंदई, शुभम गुणवंत थोटे, स्वप्नील गुणवंत थोटे आणि नामदेव सीताराम मसराम यांची वनकोठडी शुक्रवारी संपल्याने त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून न्यायालयाने सर्व आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली. तपासातील माहितीअनुसार, 'ब्लॅक मॅजिक' किंवा अंधश्रद्धेशी संबंधित कारणांसाठी बिबट्याच्या कातडीस मोठी मागणी असल्याचा गैरसमज अद्याप ग्रामीण भागात प्रचलित आहे. त्यातूनच या कातडीची कोट्यवधी रुपयांत विक्री केली जाणार असल्याचे स्पष्ट झाले. वनकोठडीदरम्यान तपास अधिकाऱ्यांनी आरोपींसह घटनास्थळांची पाहणी केली. त्या ठिकाणी बिबट्याची शिकार कशी करण्यात आली आणि कातडी काढण्याची प्रक्रिया कशी केली गेली याचा तपशील अभ्यासला. गुन्ह्यात वापरण्यात आलेले दोन सूरे जप्त करण्यात आले आहेत, अशी माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली.

**या प्रकरणाचा पुढील तपास-** उपवनसंरक्षक हरविरसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली, हिंगणी (प्रादेशिक) वनपरिक्षेत्र अधिकारी मीनल तुरखडे, क्षेत्र सहाय्यक डी. ए. उईक आणि वनरक्षक एस. डी. दांडगे करीत आहेत.

# आज सेवाग्राम येथे अधिवक्त्यांचे प्रदेश अधिवेशन

## विधीज्ञान, समाजभान व न्यायप्रतिष्ठेवर उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींचे मार्गदर्शन

**वर्धा जनमाध्यम :** अभिवक्ता परिषद विदर्भ प्रदेशतर्फे आयोजित प्रदेश अधिवेशन आज, शनिवार १३ डिसेंबर रोजी, सेवाग्राम येथील चरखागृहात सकाळी १०.३० वाजता पार पडणार आहे. विधीज्ञान, समाजभान आणि न्यायप्रतिष्ठा या विषयांवर आधारित या अधिवेशनात उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती आणि प्रमुख विधीतज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिवेशनाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायाधीश अनिल एस. किलोर यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी मंचावर न्यायमूर्ती अनिल एल. पानसरे, संरक्षण न्यायाधीश वृशाली व्ही. जोशी, उच्च न्यायालय बार असोसिएशन नागपूरचे माजी अध्यक्ष अरुण आर. पाटील, तसेच महाराष्ट्र–गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष परिजात एस. पांडे उपस्थित राहणार आहेत.

अधिवेशनातील प्रथम सत्रात विशेष पोलिस निरीक्षक (नक्षलविरोधी मोहीम) नागपूरचे संदीप बी. पाटील यांचे व्याख्यान होईल. द्वितीय सत्रात पुण्याचे ज्येष्ठ विधीतज्ज्ञ डॉ. सुधाकर आव्हाड तर समारोपीय सत्रात चंद्रपूरचे विधिवेत्ता रवींद्र भगवत मार्गदर्शन करणार आहेत.

विधीक्षेत्रातील बदलते प्रवाह, न्यायालयीन प्रक्रिया, नवे कायदे आणि न्यायप्राप्तीची दिशा या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकण्यासाठी हे अधिवेशन विशेष ठरणार आहे. सर्व अधिवक्त्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन वर्धा जिल्हा अधिवक्ता परिषद अध्यक्ष गिरीष तकवाले यांनी केले आहे.

## मुंबई-नागपूर प्रवाशांना मोठा दिलासा

# रविवारी धावणार विशेष रेल्वे, सीट मिळवायची असेल तर धावावेच लागणार

**वर्धा जनमाध्यम :** मुंबई-नागपूर मार्गावरील प्रचंड प्रवासी ताण अखेर रेल्वे प्रशासनाच्या डोळ्यात भरला. वाढती गर्दी, तिकीटांचा तुटवडा आणि प्रवाशांचा संताप लक्षात घेऊन मध्य रेल्वेने विशेष एक फेरीच्या गाडीची घोषणा करून प्रवाशांना मोठा दिलासा दिला आहे. नागपूर-सीएसएमटी आणि परतीच्या मार्गावर धावणारी ही गाडी वर्ध्यासह विदर्भातील हजारो प्रवाशांसाठी काळीज गार करणारी सुखद बातमी ठरली आहे.



१४ डिसेंबरला नागपूरहून सुटणार १५ डिसेंबरला मुंबईत दाखल

गाडी क्रमांक ०१०१२ नागपूर–सीएसएमटी, मुंबई ही विशेष गाडी १४ डिसेंबर रोजी रात्री २२.१० वाजता नागपूरहून सुटणार असून दुसऱ्या दिवशी दुपारी १५.०५ वाजता मुंबईत धडकेल.

वर्धा, बडनेरा, अकोला, शेगाव, भुसावळ, जळगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, ठाणे आणि दादर या महत्वाच्या स्थानकांवर गाडी थांबणार असल्याने संपूर्ण विदर्भ उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांना याचा थेट फायदा होणार आहे.

परतीची गाडी १६ डिसेंबरला—सकाळी नागपूरमध्ये हजेरी

परतीचा क्रमांक ०१०११ सीएसएमटी-नागपूर असलेली ही गाडी १६ डिसेंबरला दुपारी १५.३० वाजता मुंबईहून निघून पुढील दिवशी सकाळी ०६.३० वाजता नागपूरला पोहोचणार आहे. मुंबई-विदर्भ प्रवासात तुफान गर्दी असताना ही तात्पुरती व्यवस्था प्रवाशांसाठी 'जीवनदायी' ठरणार आहे.

वातानुकूलित कोचांचा ताफा प्रवाशांचा आरामशीर प्रवास या विशेष गाडीत २० आयसीएफ कोच जोडले असून प्रवाशांच्या सोयीसाठी विशेष लक्ष देण्यात आले आहे.

१२ तृतीय वातानुकूलित
४ द्वितीय वातानुकूलित
२ प्रथम वातानुकूलित
२ गार्डकम–लगेज ब्रेक व्हॅन

अशी एकूण रचना देण्यात आली आहे. 'टीओडी' दरांवर चालविण्यात येणाऱ्या या गाडीमुळे सीट मिळवण्यासाठी तिकीट बुकिंग सुरू होताच प्रवाशांची झुंबड उडण?याची शक्यता आहे.

प्रवाशांची गर्दी वाढली रेल्वेचे अखेर भान जागे

नागपूर-मुंबई मार्गावरील दिवसभर आणि रात्रीची प्रचंड गर्दी, डबाडब्यात कोंबलेले प्रवासी, तसेच तिकीटासाठी सुरू असलेली झुंज पाहता नागरिक सातत्याने विशेष गाड्या वाढवण्याची मागणी करत होते. अखेर मध्य रेल्वेने 'जनतेचा आवाज' ऐकून विशेष ट्रेन राबवल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

मोठ्या शहरात जाणारे परीक्षा, नोकरी, व्यवसायिक कामे, वैद्यकीय उपचार आणि उत्सवी प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी ही गाडी मोठा दिलासा ठरणार आहे.

आता तिकीट काढणाऱ्या प्रवाशांनी मात्र चढाओढ करण्यास तयार राहावे कारण ही गाडी आहेच अशी, जी क्षणात फुल्ल होणार.

# २० वर्षांपासून पुलाला न्याय नाही दोन वर्षांपूर्वी भूमिपूजन काम गायब

## -संतापलेल्या विद्यार्थी ग्रामस्थांचा रस्तारोको, प्रशासनाला झटका

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** सावरडोहजवळील खडक नदीवरचा कमी उंचीचा पूल गेल्या २० वर्षांपासून ग्रामस्थांच्या डोक्याला ताप! पावसाळा आला की नदी उसळते, मार्ग बंद होतो, पाच-सहा गावांचा कारंज्याशी संपर्क तुटतो. शिक्षण ठप्प, शेतकऱ्यांची कामे अडकलेली, रुग्ण प्रवासात अडखळणारेष्ठ आणि प्रशासन मात्र ढिम्म, दोन वर्षांपूर्वी आमदार दादाराव केचे यांनी मंजुरी मिळवून भूमिपूजन पार पाडले; पण तेव्हापासून कामाला तवा देखील गरम झाला नाही. या थंड कारभाराचा जळजळीत निषेध व्यक्त करत शुक्रवारी संतप्त विद्यार्थी आणि नागरिक रस्त्यावर उतरले आणि तब्बल सव्वातास रस्तारोको करत प्रशासनाला झोपेतून उठवले.

रस्तारोकोदरम्यान रस्त्याच्या दोन्ही बाजूंना शेकडो वाहनांची लांबलचक तांडे लागली. शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख संदीप भिसे, तरुण विद्यार्थी व ग्रामस्थांनी घोषणांच्या गजरात बांधकाम विभागाला चांगलेच धारेवर धरले. दोन वर्षे झाली. भूमिपूजन झाले तरी काम कुठे आहे. असा सवाल आंदोलनकर्त्यांनी करत प्रशासनाच्या दिरंगाईचा पाणउतारा केला.

नदीला पूर येतो, रस्ता बंद होतो, विद्यार्थी अडकतात, शेतकऱ्यांचे नुकसान होते. आणि अधिकारी मात्र निवेदनांच्या फाइलला धूळ चाटवत बसलेत.

**आश्वासनानंतर आंदोलन मागे : प्रशासनावर अंतिम इशारा-** घटनास्थळी पोलीस दाखल झाले. बांधकाम विभागाशी संपर्क साधत, आंदोलनकर्त्यांच्या मागण्या कळवल्या. तणावपूर्ण चर्चेनंतर अखेर विभागाने २० तारखेपासून काम सुरू असे शब्द दिले. यावर आंदोलनकर्त्यांनी रस्तारोको मागे घेतला; मात्र अंतिम इशारा दिला.

**वचन पाळाष्ठ नाहीतर पुन्हा आंदोलन नव्हे, थेट घेरा घालू** -पुलाचे काम मंजूर भूमिपूजन झाले. पण प्रत्यक्षात कुत्रंही फिरकत नाही. शेवटी आम्हालाच रस्त्यावर उतरावे लागले.

**-स्वप्निल खवशी,** सरपंच, बेलगाव

# दहा दिवसांत पाणीपुरवठा सुरू करा; अन्यथा ग्रामपंचायतीला कुलूप

## -अंदोरीत पाणीटंचाई चरमावर; नागरिकांचा इशारा तीव्र

**देवळी जनमाध्यम :** जल जीवन मिशनअंतर्गत अंदोरी येथील पाण्याची टाकी आणि नवी विहीर पूर्ण झाल्यानंतरही तीन वर्षांपासून पाणीपुरवठा सुरू न झाल्याने गावात तीव्र पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे. पाच दिवसांनी नळाला येणारे अपुरे आणि दूषित पाणी या परिस्थितीमुळे कंटाळलेल्या ग्रामस्थांनी येत्या दहा दिवसात पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास ग्रामपंचायतीलाच कुलूप ठोकण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला. नवीन विहिरीत पुरेशा प्रमाणात पाणी असूनही सात महिन्यांपासून यंत्रणा कार्यान्वित न करणे, तसेच पंपजोडणीचे काम विलंबित ठेवणे यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. एमएसईबीचे लाईनचे काम पूर्ण असूनही पाणीपुरवठा सुरू न होणे हे प्रशासनाचे हलगर्जीपणा असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. जुन्या विहिरीमधील पाणी दूषित असल्याने पाच दिवसांनी मिळणाऱ्या पाण्यावर जगण्याची वेळ आली असून महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना विशेषतः त्रास सहन करावा लागत आहे.


## जाहीर नोटीस

माझे पक्षकार अनुराधा माधवराव चोरे , समीर माधवराव चोरे , सौ . अंजली पंकज दराने अँड सौ . वृषाली रवींद्र घाटे हे मौजा - आंजी (मोठी ), तह - ज़िल्हा - वर्धा ,ग्राम पंचायत आंजी (मोठी ) फील्ड सर्वे क्रमांक . ओल्ड ८२, ८३ अँड नव ८८, ८९ ,मधील प्लॉट क्रमांक १द ज्याचे क्षेत्रफळ २२०.२६ चौरस मीटर चे मालक आहेत सदर प्लॉटची चतुरसीम

पूर्वेस- प्लॉट क्रमांक २

पश्चिमेस- २ फूट रोड

उत्तरेस - प्लॉट क्रमांक ११

दक्षिणेस - ३० फूट रोड . दत्त विहार गृह निर्माण संस्था तरफ प्रोमोटर अरुण नामदेवराव खडसे ह्यांनी सादर मालमत्ता माधवराव नारायणराव चोरे दिनांक १२/१२/१९८९ दस्त क्रमांक ४२४२/१९८९ अन्वय विकत दिली होती. त्या नंतर माधवराव नारायणराव चोरे मृत्यू दिनांक १८/१२/२०२४ ला झाली व त्यांचे वारस म्हणून नाव अनुराधा माधवराव चोरे, समीर माधवराव चोरे , सौ . अंजली पंकज दराने अँड सौ . वृषाली रवींद्र घाटे ह्यांचे नाव नोंदणीकृत झाले ज्याचा फेरफार क्रमांक २८५४ असा आहे. माझ्या पक्षकारांनी सादर मालमत्ता विकण्याचा सौदा अनुप प्रकाश भुजाडे ह्यांच्या सोबत केलेला आहे.माझ्या पक्षकाराकडून सादर मालमत्तेची मूळ लिंक विक्रीपत्र दिनांक १२/१२/१९८९ दस्त क्रमांक ४२४२/१९८९ हरविलेले आहे. अनुप प्रकाश भुजाडे सादर मालमत्ता विकत घेण्याकरिता सादर मालमत्ता गहाण ठेविण्याकरिता इंडिया शेल्टर फिनान्स येथे कर्जासाठी अर्ज केला आहे. सर्व जनतेला सादर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल व कोणालाही सादर विक्रीपत्र मिळाल्यास तर कृपया ही सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**अॅड.आर.आर.तिवारी**
**रामनगर, वर्धा. मो.९९२२४२६१६८**

## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर N९३५५९९२ वरील माझे KRISHNA ASHOKKUMAR AGRAWAL असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड kejer} KRISHNADEVI ASHOKKUMAR AGRAWAL हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता:स्नेहल नगर ,वर्धा ४४२००१

## नावात बदल

माझे पूर्वी SHEIKH YASMEENPARVEEN MOHDMASOOM असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील YASMEEN MOHAMMAD ABID RAZA हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-** गौतम वॉर्ड हिंगणघाट, वर्धा ४४२३०१

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार अनुप प्रकाश भुजाडे हे मौजा - सिंधी मेघे तह - अँड ज़िल्हा -वर्धा ,ग्राम पंचायत सिंधी मेघे फील्ड सर्वे क्रमांक. ओल्ड ७३/१ अँड ७३/५ नव २१५/२ अँड २१६/२,मधील पूर्वेकडील पार्ट प्लॉट क्रमांक ११ ज्याचे क्षेत्रफळ ११६.१७ चौरस मीटर चे मालक आहेत सदर प्लॉटची चतुरसीम -

पूर्वेस- सौ. ज्योती बबनराव अंबरकर यांची घर

पश्चिमेस - प्लॉट क्रमांक ११ चा उर्वरित भाग

उत्तरेस - म्हाडा कॉलनी

दक्षिणेस - ९ मीटर लेआऊट रोड,

सौ. पूजा प्रमोद उज्जैनकर, सौ. रेणुका प्रमोद उज्जैनकर अँड सौ. सरिता प्रमोद उज्जैनकर ह्यांनी सादर मालमत्ता माझ्या पक्षकाराला दिनांक ३१/०५/२०२४ दस्त क्रमांक २१९६/२०२४ अन्वय विकत दिली होती. माझ्या पक्षकाराकडून सादर मालमत्तेची मूळ लिंक विक्रीपत्र दिनांक १५/०३/१९९५ न्ा् उ्दम दस्त क्रमांक १०९१/१९९५ हरविलेले आहे. पक्षकाराने सादर मालमत्ता गहाण ठेविण्याकरिता बंधन बँक येथे कर्जासाठी अर्ज केला आहे. सर्व जनतेला सादर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल व कोणालाही सादर विक्रीपत्र मिळाल्यास तर कृपया ही सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**अॅड.आर.आर.तिवारी**
**रामनगर, वर्धा. मो.९९२२४२६१६८**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
epaper www.janmadhyam.com

# महाराष्ट्र नक्षलवाद मुक्त होण्याच्या उंबरठ्यावर-मुख्यमंत्री

## नवीन पोलिस चौकी उघडलेल्या ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करा

**नागपूर/प्रतिनिधी :** केंद्र शासनाने देशातून २०२६ पर्यंत नक्षलवाद हद्दपार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. महाराष्ट्र या उद्दिष्टपूर्तीत एक पाउल पुढे असून महाराष्ट्र नक्षलवाद मुक्त होण्याच्या उंबरठ्यावर उभे आहे. राज्य शासनाने राबविलेल्या दूरदृष्टी धोरणांमुळे आणि पोलिसांच्या प्रयत्नांमुळे हे शक्य होत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातून नक्षलवाद संपूर्ण संपुष्टात आणण्यासाठी अति दुर्गम भागात पोलीस चौकी सुरू कराव्यात. सर्व पोलीस चौकीमध्ये आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती करून सर्व सुविधा देण्यात याव्यात. नक्षलवाद मुक्त झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नवीन पोलीस चौकी झालेल्या ठिकाणी विविध कल्याणकारी कार्यक्रमांचे आयोजन करावे.

अशा कार्यक्रमांमध्ये शासकीय योजनांचा लाभ गावक-यांना देण्यात यावा. येथील युवकांसाठी रोजगार उपलब्ध करून द्यावा, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून स्थानिक उत्पादनांना विक्रीसाठी बाजारपेठ निर्माण करून द्यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

राष्ट्रीय योजना व कृती आराखड्याबाबत एकसूत्री कृती यंत्रणा संरचनेनुसार राज्यस्तर गठीत समितीची आढावा बैठक विधानभवनातील मंत्री परिषद सभागृहात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बक्षीस असलेल्या नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण पोलिसांच्या प्रयत्नांमुळे शक्य झाले आहे. जहाल नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण करून नक्षल चळवळ मोडीत काढण्यासाठी पुढे आलेल्या



गडचिरोली पोलिसांना एक कोटी रुपये बक्षीस देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. नक्षल चळवळीचा बिमोड करण्यासाठी चांगले काम केलेल्या अधिका-यांना पदोन्नती देण्यात यावी. मंत्रालय स्तरावर गडचिरोली जिल्ह्यातील कुठलाही विषय आल्यास नियमानुसार त्याला प्राधान्याने पूर्णत्वास न्यावे. गडचिरोली येथे नवीन पोलीस अधीक्षक इमारतीचे काम सुरू करावे. या इमारतीसाठी निधी उपलब्धता करून देण्यात येईल. तसेच पोलीस दलात ३३ नवीन वाहनांची खरेदी प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.


बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनीषा म्हैसकर, अप्पर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार सिंग, अतिरिक्तपोलीस महासंचालक (विशेष) शीरिंग दोरजे, केंद्रीय राखीव पोलीस बलाचे अतिरिक्त महासंचालक अजय शर्मा आदीसह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. पोलीस उप महानिरीक्षक अंकित गोयल यांनी बैठकीत सादरीकरण केले.

**नक्षलवाद्यांचा आनंद साजरा केलेल्या ठिकाणी पोलीस चौकीची निर्मिती**-८ ऑक्टोबर २००९ मध्ये भामरागड तालुक्यातील लाहेरी येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात १७ पोलीस जवान शहीद झाले होते. यानंतर नक्षलवाद्यांनी आनंद उत्सव साजरा केला, नक्षल्यांनी आनंद उत्सव साजरा केलेल्या ठिकाणीच पोलिसांनी नवीन पोलीस चौकीची निर्मिती केली आहे. यामुळे या भागात नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास वाढला आहे. नक्षलवाद संपुष्टात येत असल्याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे.

**नक्षल चळवळीला विकासकामांनी उत्तर**- गडचिरोली जिल्ह्यातील ६७.३० किलोमीटर लांबीच्या धोडराज - निलगुंडा - कवंडे रस्त्याची निर्मिती करण्यात येणार, कवंडेच्या पुढे कोरमा नाला पूल आणि बेद्रे पुलाची निर्मिती करण्यात येउन पुढे बिजापूर पर्यंत रस्ता जोडणी देण्यात येणार येईल . इंद्रावती नदीवर दामरंचा ते सांड्रा मार्गावर ७५० मीटर लांबीच्या पुलाची निर्मिती करण्यात येणार आहे. गडचिरोली जिल्ह्यात उत्तम संपर्क यंत्रणेसाठी २०२२ पर्यंत गडचिरोली जिल्ह्यात २७१ मोबाईल टावर त्यामध्ये भरीव वाढ होउन २०२३ ते २५ दरम्यान ५२१ नवीन मोबाईल टावरची निर्मिती करण्यात आली आहे.

# सीबीएसईच्या पुस्तकांमध्ये शिवाजी महाराजांचा इतिहास 2500 शब्दांचा

**नागपूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीइआरटी) सीबीएसइच्या (केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ) पाठ्यक्रमांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास केवळ ६८ शब्दांमध्ये नसून तो आता २२०० ते २५०० करण्यात आला आहे. इ. ८ वीच्या पुस्तकामध्ये राईस ऑफ मराठा हा धडा २२ पानांमध्ये छत्रपतींचा इतिहास मुलांसमोर मांडला आहे. आपण एवढ्यावर न थांबता इ. १ ली ते इ. १२ वीपर्यंतच्या प्रत्येक पुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न करत आहे, असे राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.सीबीएसई. अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील इतिहासाचे लेखन अपुरे असल्याविषयीचा प्रश्न अपक्ष सत्यजित तांबे यांनी विधान परिषदेत अर्धा तास चर्चेच्या वेळी मांडला.राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने राज्य सरकारकडून अनेक योजना राबवण्यात येतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी जे आदर्श राज्यव्यवस्था निर्माण केली त्यानुसार पंतप्रधान मोदींनी देशाचा कारभार पाहण्याचा प्रयत्न करत आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य अमोल मिटकरी म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज अस्सल चरित्र साधन समिती अजूनही गठीत (स्थापन) करण्यात आली नाही. शासकीय मुद्रणालयात छत्रपतींविषयी खंड निर्माण झालेले नाहीत. धर्मवीर संभाजी महाराज यांच्यावर अवमानकारक चित्रफिती, नाटके, कथा, लेखन हे मोठ्या प्रमाणात यूट्यूब आहे ते सरकारने काढून टाकावे. राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य जयंत आसगावकर म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे विकृतीकरण पाठ्य पुस्तकांमध्ये केले जाते. ते पुन्हा दुरुस्त केले जाते. परंतु ज्याने हे विकृत किंवा चुकीचे लेखन केले त्याच्यावर सरकार कारवाई करणार का? असा प्रश्न उपस्थित केला. शिवसेना ठाकरे गटाचे सदस्य जगन्नाथ अभ्यंकर म्हणाले, एन्.सी.इ.आ.टी. च्या निकषांनुसार अभ्यासक्रमात राष्ट्रीय इतिहास ७० टक्के आणि ३० राज्यस्तरीय अभ्यासक्रम असला पाहिजे. परंतु महाराष्ट्रातील ३० टक्के इतिहास घेतला पाहिजे.





# ऑक्टोबरमधील अवकाळीच्या नुकसानीची भरपाई जानेवारीत देणार - मंत्री मकरंद जाधव

**नागपूर/प्रतिनिधी :**राज्यात खरीप व रब्बी हंगामात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसान भरपाईची रक्कम देण्यात येत आहे. ऑक्टोबर महिन्यात राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई जानेवारी महिन्यापासून देण्यात येईल, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.राज्यात सप्टेंबर ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसान भरपाई संदर्भात मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर मंत्री मकरंद पाटील बोलत होते. सदस्य सर्वश्री निलेश राणे, भास्कर जाधव, सुधीर मुनगंटीवार यांनी ही लक्षवेधी सूचना मांडली.

राज्यात विशेषत? कोकणात ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानीची मदत अद्याप सुरू नसून ती डिसेंबरनंतर वितरित केली जाईल, असे मंत्री जाधव-पाटील यांनी यावेळी सांगितले.

मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील म्हणाले, राज्यात सलग सहा महिन्यांच्या अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतक-यांसाठी राज्य शासनाने केंद्रीय मदतीशिवाय




अतिरिक्त मदत देत आहे. एनडीआरएफच्या निकषानुसार मिळणा-या नियमित मदतीबरोबरच रब्बी हंगामासाठी प्रति हेक्टर अतिरिक्त १० हजार रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.पावसामुळे जमीन खरडून वाहून गेलेल्या शेतक-यांना प्रति हेक्टर ४७,००० रूपये नियमित मदत दिली असून,

याशिवाय मनरेगा अंतर्गत प्रति हेक्टर ३ लाख रुपये देण्याचा राज्य शासनाने निर्णयही घेतला आहे, असेही त्यांनी सांगितले.ई-केवायसीमुळे मदत वितरणात होणारा विलंब टाळण्यासाठी राज्य शासनाने ?ग्रीस्टॅक फार्मर आयडी मदतीसाठी स्वीकारला असून ७५ टक्क्यांहून अधिक शेतक-यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. राज्य शासनाने अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसान भरपाईपोटी यंदा सुमारे २०,००० कोटी रुपयांची मदत दिली आहे. यापैकी १४,००० कोटी रुपये डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फरद्वारे (डीबीटी) शेतक-यांच्या खात्यात जमा झाले आहेत. खरीप हंगामात ९० लाख शेतक-यांना ७,१५६ कोटी, तर रब्बी हंगामात ८५.७८ लाख शेतक-यांना ६,८६४ कोटी रुपये वितरित करण्यात आले, अशी माहिती मंत्री जाधव-पाटील यांनी यावेळी दिली.

# कुपोषणामुळे एकाही बालकाचा मृत्यू होउ नये यासाठी शासन प्रयत्नशील - अदिती तटकरे

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात तीव्र कुपोषित बालकांची संख्या २०१९-२० मधील २४६ वरून २०२५-२६ मध्ये ९७ पर्यंत खाली आले आहे. एकाही बालकाचा कुपोषणामुळे मृत्यू होउ नये यासाठी शासन प्रयत्नशील असून महिला व बालविकास, आरोग्य, आदिवासी विकास या संबंधित विभागांची टीम तयार करण्यात येईल, असे महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधान परिषदेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात सांगितले.



सदस्य उमा खापरे यांनी कुपोषणामुळे बालकांच्या होणा-या मृत्यूसंदर्भात चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य सर्वश्री संजय खोपडे, प्रवीण दरेकर, चित्रा वाघ यांनी सहभाग घेतला.मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या, तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण २०२४ मधील ०.७९ टक्क्यांच्या तुलनेत २०२५ मध्ये ०.४१ इतके कमी झाले आहे. मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमामध्ये देखील कुपोषण मुक्तीला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

या चर्चेला उत्तर देताना राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर म्हणाल्या, स्वस्थ माता, सशक्तबालक जन्माला यावेत यासाठी शासनामार्फत विविध प्रयत्न करण्यात येतात. दुर्गम भागात विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. रुग्णालयांमध्ये चांगल्या सुविधा दिल्या जातात. स्वच्छतागृहे चांगली केली जात आहेत. सर्व प्रसूती रुग्णालयातच व्हाव्यात यासाठी समुपदेशन करण्यात येत आहे. आयसीडीएस मार्फत राज्यात ४२,६०२ गरोदर माता आणि बालकांना पोषण आहाराचा लाभ दिला जातो. तथापि, राज्यात बालकांचे मृत्यू केवळ कुपोषणामुळे होत नसून त्यासाठी विविध कारणे असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

# राज्यातील ऊमेद अभियान बंद होणार नाही - जयकुमार गोरे

**नागपूर/प्रतिनिधी :** महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बारमाही बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उमेद मॉल संकल्पना सुरू झाली असून पहिल्या टप्प्यात १० जिल्ह्यात उमेद मॉल उभारले जाईल. पुढील टप्प्यात तालुका स्तरावरही मॉल सुरू करण्याचा विचार आहे, अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.



विधानसभेत सदस्य संतोष बांगर, सुधीर मुनगंटीवार, नमिता मुंदडा , बाबासाहेब देशमुख, नानाभाउ पटोले, देवराव भोंगळे, किशोर पाटील, सत्यजित देशमुख, गोपीचंद पडळकर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे उमेद (MSRLM) अभियानातील महिला बचत गट, समुदाय संसाधन व्यक्ती आणि कंत्राटी कर्मचा-यांच्या अनेक मागण्यांवर प्रश्न उपस्थित केले.या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री श्री.गोरे म्हणाले की, राज्यातील उमेद अभियान बंद होणार नाही. सन २०२६ नंतरही ही योजना सातत्याने सुरू राहणार आहे. उमेद अभियानात कार्यरत असलेल्या समुदाय संसाधन व्यक्तींना ग्रामसखी हे पदनाम देण्याची मागणी मान्य करण्यात आली असून या संदर्भातील शासन निर्णय आजच जारी होणार असल्याचे त्यांनी सभागृहात जाहीर केले.कर्मचा-यांना गणवेश देण्याचा निर्णयही शासनाने घेतला असून गणवेशाचा प्रकार स्वत? कर्मचारी ठरवतील. कर्मचा-यांनी सुचवलेला गणवेश शासन मान्य करेल, असेही मंत्री श्री.गोरे यांनी सांगितले.देशातील कुठल्याही राज्यात उमेद संबंधित कर्मचा-यांना कायम करण्यात आलेले नाही. महाराष्ट्रातही ते शक्य नसल्याचे मंत्री श्री.गोरे यांनी सांगितले. तथापि, बिहार राज्याने लागू केलेले काही सवलतींचे मॉडेल उपयुक्त असल्यास त्याचा अभ्यास करून महाराष्ट्रात लागू करण्याचा शासन नक्की विचार करेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.यासंदर्भात, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याशी चर्चा सुरू असून पुढील १५ दिवसांत संघटनांसोबत बैठक घेण्यात येईल, असेही मंत्री श्री.गोरे यांनी सांगितले.

# प्रत्येक जिल्ह्यात हेक्टरी 23 क्विंटलप्रमाणे कापूस खरेदी होणार - जयकुमार रावल

**नागपूर/प्रतिनिधी :** अद्यावत कृषी तंत्रज्ञान व प्रणालीचा वापर करून राज्यातील अनेक शेतकरी कापसाचे उच्चतम उत्पादन घेतात. त्यानुसार राज्यात किमान हमीभाव योजनेअंतर्गत हेक्टरी कापूस खरेदी मर्यादा वाढवण्यात यावी अशी मागणी शेतक-यांकडून करण्यात येत होती. त्या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी राज्यात सर्व जिल्ह्यासाठी उच्चतम उत्पादकता नुसार हेक्टरी २३ क्विंटल उत्पादकता निश्चित करून त्याप्रमाणे कापूस खरेदी करण्यात यावी असे निर्देश काल दिले होते. त्यानुसार आता प्रत्येक खरेदी केंद्रावर हेक्टरी २३ क्विंटल प्रमाणे कापूस खरेदी होणार आहे अशी माहिती राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत निवेदन करताना दिलीशेतकरी सुधारित सिंचन पद्धती आणि आधुनिक शेती तंत्रांचा वापर करून अधिक उत्पादन घेत आहेत. मात्र, प्रत्यक्षातील जादा उत्पादन खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आणल्यावर, उत्पादकता मर्यादा कमी असल्याने अनेक शेतक-यांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे ही मर्यादा वाढविण्याची मागणी लोकप्रतिनिधी आणि शेतकरी सातत्याने करत होते.या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पणन मंत्री रावल तसेच विविध लोकप्रतिनिधींची बैठक झाली.

# हिवाळी अधिवेशनाचे सत्ताधा-यांना गांभिर्य नाही : हर्षवर्धन सपकाळ

**नागपूर/प्रतिनिधी :**नागपूरचे हिवाळी अधिवेशन अवघे एक आठवड्याचे घेउन भाजपा महायुती सरकारने विदर्भ कराराचा अनादरच केला आहे. शेतकरी, कामगार, बेरोजगार, कायदा सुव्यवस्था, भ्रष्टाचार महिला सुरक्षा यासारखे असंख्य प्रश्न असताना अधिवेशनात त्यावर चर्चा होत नाही आणि कुठे कुत्री पकडा, बिबटे सोडा यावर चर्चा होत आहे. सत्ताधारी पक्षाला अधिवेशनाचे काही गांभिर्यच राहिलेले नाही, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.



नागपूर विधान भवनात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भाजपा महायुती सरकारच्या काळात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दररोज भ्रष्टाचाराची एक एक प्रकरणे उघड होत आहेत. पैशांचा सुळसुळाट सुरु आहे. भ्रष्टाचार हेच सरकारचे ब्रिद वाक्य आहे. न खाउंगा, न खाने दुंगा, पासून झालेली सुरुवात आता मिल बाट के खायेंगे पर्यंत आली आहे. राज्यातील भ्रष्टाचारावर श्वेतपत्रिका काढून त्यावर चर्चा झाली पाहिजे पण सत्ताधारी पक्षच सभागृहाचे कामकाज सुरुळीत चालू देत नाहीत. गंभीर विषय सुरु असताना सत्ताधारी पक्षाचे सदस्य विनोद करत असतात. लोकशाहीचा कटेलोट होताना दिसत आहे. सत्ताधारी पक्षातीलच काही सदस्य भ्रष्टाचाराचे आरोप करत आहेत, सरकारने आतातरी डोळे उघडावे, असे सपकाळ म्हणाले.विरोधी पक्ष नेते पदाबद्दल बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, विरोधी पक्षनेतेपदासाठी १० टक्के सदस्यसंख्येचा दाखला दिला जात आहे, असे असेल तर वरच्या सभागृहात १० टक्के सदस्यसंख्या आहे व सरकारला प्रस्तावही दिलेला आहे. मग तेथे विरोधी पक्षनेताचा निर्णय का घेतला जात नाही? लोकशाही व्यवस्थेत काही प्रथा, परंपरा व संकेत पाळले जातात, दोन्ही सभागृहाचे प्रस्ताव आहेत पण सरकारला संविधानानुसार कामकाज करायचे नाही, हम करोसे कायदा पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कामकाज रेटत आहेत. फडणविसांनी लोकशाहीची बूज राखली पाहिजे. ते एवढा आव आणत असतात पण हा आव आणत असताना त्यांनी संकेत, नियम पाळले पाहिजेत.

# आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, नगरविकास विभागाची संयुक्त बैठक घेणार - आबिटकर

**नागपूर/प्रतिनिधी :** परिचर्या संवर्ग हा आरोग्य सेवेचा आत्मा असून परिचर्या सेवा अधिक सक्षम करण्यात येणार आहे. परिचर्या संचालनालय स्थापन करण्यासाठी आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग आणि नगरविकास विभाग यांची संयुक्त बैठक घेतली जाईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधान परिषदेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली. याबाबतची बैठक विधान परिषद सभापती यांच्या अध्यक्षतेखाली व्हावी, अशी अपेक्षा सदस्य उमा खापरे यांनी व्यक्त केली. सभापती राम शिंदे यांनी ही बैठक आपल्या अध्यक्षतेखाली घेण्याचे आरोग्य विभागाला निर्देश दिले.राज्यात परिचर्या संचालनालय स्थापन करणे या विषयी विधान परिषदेत उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेत सदस्य विक्रम काळे यांनी सहभाग घेतला.राज्यात ग्रामीण भागात सार्वजनिक आरोग्य, शहरी भागात नगरविकास आणि वैद्यकीय महाविद्यालयांच्या रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत रुग्णांना वैद्यकीय सेवा दिल्या जात आहे. त्यामुळे राज्यात परिचर्या संचालनालय स्थापन करणे याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी या विभागांची संयुक्त बैठक घेतली जाईल, असे आरोग्यमंत्री म्हणाले. आरोग्य सेवेत परिचर्या सेवेला अधिक महत्व असल्याने सार्वजनिक आरोग्य विभागाने परिचर्या संवर्गाबाबत स्वतंत्र बैठक घेतली असून या संवर्गासाठी स्वतंत्र संचालक देण्याबाबतही कार्यवाही सुरू असल्याचेही मंत्री श्री. आबिटकर यांनी सांगितले.

# राज्यातील ६० ठिकाणी 'स्वर्गीय आनंद दिघे ट्राफिक पार्क' उभारणार-परिवहन मंत्री

**नागपूर/प्रतिनिधी :** विद्यार्थी दशे पासूनच वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचा ' संस्कार ' शालेय विद्यार्थ्यांच्यावर व्हावा! तसेच वाहन धारक असलेल्या त्यांच्या पालकांच्यात रस्ता सुरक्षिततेबध्दल जनजागृती व्हावी तसेच ज्येष्ठाना विरंगुळा मिळावा या तिहेरी उद्देशाने राज्यभरातील विविध शहरांमध्ये ' स्वर्गीय आनंद दिघे ट्राफिक पार्क ' उभारण्याची योजना मोटार परिवहन विभागाने आखली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, देशात आणि प्रामुख्याने राज्यांमध्ये वाढते अपघाताचे प्रमाण लक्षात घेता वाहतुकीच्या नियमांचे पालन काटेकोरपणे करणे अत्यंत गरजेचं झाले आहे. त्यासाठी रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत ज्या शहरांमध्ये प्रादेशिक अथवा उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आहेत, त्या शहरात ।' स्वर्गीय आनंद दिघे ट्राफिक पार्क '। निर्माण करून तेथे शालेय विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना वाहतुकीच्या नियमांचे आकलन करून देणे, तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळ्याचे ठिकाण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी परिवहन विभागाच्या किमान एक एकर जागेमध्ये एक कोटी रुपये खर्च करून हे ट्राफिक पार्क उभारले जाईल. या पार्कमध्ये दुर्मिळ वनस्पती, विविध आकर्षण फुल झाडे, हिरवळीचे पट्टे असे सुंदर आरेखन असलेले 'प्रबोधन, माहिती व विरंगुळ्याचे केंद्र उभारण्यात येणार आहे. याचा लाभ शालेय विद्यार्थी - विद्यार्थिनींना त्यांच्या संस्कारक्षम वयामध्ये वाहतूक नियम प्रभावीपणे अमलात आणण्यासाठी त्यांच्या पालकांना वाहतुकीचे नियम पाळणारे जबाबदार नागरिक बनविण्यासाठी तर ज्येष्ठांना मनोरंजनाबरोबर विश्रांतीसाठी होईल ,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.विविध वाहतूक चिन्हे, प्रतिके, वेगमर्यादा पालन करण्याच्या सूचना, सुभाषितांच्या माध्यमातून या उद्यानामध्ये विद्यार्थी व त्यांच्या पालकांना वाहतुकीचे नियम पालन करण्यासंबंधिचे प्रबोधन करणे, हा याचा मुख्य हेतू आहे . तथापि, या पार्कमध्ये विविध दुर्मिळ वनस्पती आकर्षक फुलझाडे व लँडस्केपिंग च्या माध्यमातून ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्र देखील निर्माण केली जाईल. सध्या मोटार परिवहन विभागाकडे असलेल्या मोकळ्या जागेमध्ये हे ' ट्राफिक पार्क ' उभारले जाणार आहेत. जिथे मोटार परिवहन विभागाची जागा नसेल तिथे महापालिका, नगरपालिका सारख्या स्थानिक स्वराज संस्थांच्या माध्यमातून अशी जागा विकसित करण्यात येणार आहे. ।' स्वर्गीय आनंद दिघे ट्राफीक पार्क '। निर्मितीचा सर्व खर्च रस्ता सुरक्षा निधीच्या माध्यमातून मोटार परिवहन विभाग करणार आहे. तथापि भविष्यात त्याची देखभाल संबंधित महापालिका अथवा नगरपालिकेने करणे अपेक्षित आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

# 15 वा वित्त आयोग - महाराष्ट्राला 717 कोटीचा निधी

**नवी दिल्ली, १२ डिसेंबर -** केंद्र सरकारने महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक शासन संस्थांसाठी पंधराव्या वित्त आयोगांतर्गत ७१७.१७ कोटी रुपये जारी केले आहेत. ही रक्कम आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीच्या अप्रतिबंधित अनुदानांचा पहिला हप्ता आहे.राज्यातील वैध रीतीने निवडून आलेल्या आणि पात्र असलेल्या ग्रामीण स्थानिक संस्थांना हे निधी जारी करण्यात आले आहेत. यात २ जिल्हा परिषदा, १५ पंचायत समित्या आणि २६,५४४ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.भारत सरकार, पंचायती राज मंत्रालय आणि जल शक्ती मंत्रालयाच्या (पेयजल आणि स्वच्छता विभाग) माध्यमातून, राज्यांसाठी ग्रामीण स्थानिक संस्था/ पंचायती राज संस्थांना पंधराव्या वित्त आयोगाचे अनुदान जारी करण्याची शिफारस करते, जे नंतर अर्थ मंत्रालयाकडून जारी केले जातात. वितरित केलेले अनुदान एका आर्थिक वर्षात दोन हप्त्यांमध्ये शिफारस करून जारी केले जाते.अप्रतिबंधित अनुदान हे अनुदान ग्रामीण स्थानिक संस्था/ पंचायती राज संस्थांद्वारे संविधानाच्या अकराव्या अनुसूचीत समाविष्ट असलेल्या २९ विषयांतर्गत, त्यांच्या स्थान-विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी वापरले जाईल. मात्र, ते पगार आणि इतर आस्थापना खर्चासाठी वापरले जाणार नाही.प्रतिबंधित अनुदान खालील मूलभूत सेवांसाठी वापरले जाउ शकते: (अ) स्वच्छता आणि ओडीएफ स्थिती कायम राखणे, ज्यामध्ये घरगुती कचरा व्यवस्थापन आणि प्रक्रिया, आणि विशेषत? मानवी विष्ठा आणि शौच गाळ व्यवस्थापनाचा समावेश आहे.

# संसदीय लोकशाहीत पक्ष संघटनेचे योगदान देखील महत्त्वाचे- चंद्रकांत पाटील

**नागपूर/प्रतिनिधी :** संसदीय लोकशाहीत विविध पक्षांच्या संघटनेचे योगदान देखील महत्वाचे असते. विविध पक्ष आपल्या विचारधारेप्रमाणे लोककल्याणाचे विषय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवत असतात. सामान्य नागरीकांचे प्रश्न, समस्या, त्यांचे दुःख मांडण्याचे काम पक्षीय संघटना करते. लोकशाहीत पक्षीय संघटना आणि पक्षातील अंतर्गत लोकशाही देखील तितकीच महत्वाची ठरते, असे संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

विधानभवन येथे ५१ व्या संसदीय अभ्यासवर्गात संसदीय लोकशाहीत पक्ष संघटनेचे महत्व, योगदान व जबाबदारी आणि लोकशाही पुढील आव्हाने या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री.पाटील बोलत होते. यावेळी विधानमंडळाच्या सचिव मेघना तळेकर, विधानभवनचे जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने उपस्थित होते. सुरुवातीस श्रीमती तळेकर यांनी मंत्री श्री.पाटील यांचे स्वागत केले.संसदीय लोकशाहीत सर्वात खालच्या पातळीवरची आणि गावांचा कारभार पाहणारी संस्था म्हणून ग्रामपंचायत काम करते. केवळ या संस्थेच्या निवडणूका पक्ष विरहीत असतात. त्यानंतर सर्व संस्थांच्या निवडणूका विविध पक्षांच्यावतीने लढविल्या जातात. निवडणूका लढतांना पक्षांच्यावतीने आपआपली विचारधारा लोकांपुढे ठेवली जाते. पक्ष संघटनेद्वारे आपले पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यामार्फत अधिकाधिक नागरिकांपर्यत विचारधारा पोहोचवून त्याद्वारे नागरिकांचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न होत असतो, असे पुढे बोलतांनी मंत्री श्री.पाटील म्हणाले.प्रत्येक पक्षाची विचारधारा, व्हिजन वेगवेगळे असू शकते. त्या विचारधारेवर आधारीत कार्यकर्ते तयार होत असतात. मी भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता म्हणून काम करतो. आमच्या पक्ष संघटनेत प्रत्येक घराचे देखील नियोजन केले जाते. पक्ष संघटना वाढविण्यासाठी असे नियोजन फार महत्वाचे ठरतात.

# शेतक-यांना बळीराजा रस्ते योजनेचा आधार-बावनकुळे

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यातील शेतक-यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या शेत रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्वतंत्र योजना राबविण्यासह, मुंबईतील गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासातील अडथळे दूर करणारे तसेच वर्ग २ च्या जमीनी वर्ग १ करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. असे महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतले आहेत. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात चार निवेदने सादर केली. दोन्ही सभागृहातील सदस्यांनी यासाठी महसूलमंत्र्यांचे अभिनंदन केले.



ग्रामीण भागातील शेतक-यांना शेतापर्यंत पोहोचण्यासाठी बारमाही आणि मजबूत रस्ते उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महसूल विभागामार्फत 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. : शेतीतील यांत्रिकीकरण लक्षात घेउन ही योजना पूर्णपणे यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने राबविली जाईल. गाव नकाशावर दर्शविलेल्या रस्त्यांवरील अतिक्रमणे या योजनेअंतर्गत त्वरित हटविली जातील. या रस्त्यांसाठी लागणारी तातडीची मोजणी आणि पोलीस बंदोबस्त शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले आहे. तसेच, रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी लागणा-या गाळ, माती, मुरूम किंवा दगडासाठी कोणतेही स्वामित्व शुल्क (रायल्टी) आकारले जाणार नाही.खर्चासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार केले जाणार आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विधानसभा क्षेत्रस्तरावर आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. मुंबईतील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारती मोडकळीस आल्या असून, त्यांना स्वयंपुनर्विकासासाठी प्रोत्साहन देणारा निर्णय घेण्यात आला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेसाठी वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकाच्या पैकी २५८ चटईक्षेत्र उपलब्ध करून देण्याच्या अटीमुळे सोसायट्यांना योजनेचा लाभ घेता येत नव्हता. आता स्वयंपुनर्विकास करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ही २५८ एफएसआयची अट वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ (फ्री होल्ड) मध्ये सवलतीच्या दराने रूपांतर करण्याच्या योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. ही सवलत योजना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत होती.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## भीक प्रतिबंध कायदा

'भुकेल्यांला अन्न,तहानलेल्याला पाणी,उघड्यानागड्यांना वस्त्र, बेघरांना आसरा हेच पुण्यकर्म आहे,'अशी संत गाडगे महाराज यांची शिकवण, प्राचीन काळापासून भारतात भिक्षा मागणे हे आजच्यासारखे तुच्छ मानले जात नव्हते, ती धार्मिक आणि आध्यात्मिक जीवनाशी निगडित एक प्रथा म्हणून स्वीकारली गेली होती. वैदिक काळात आणि त्यानंतर बौद्ध आणि जैन धर्माच्या आचरणानुसार,तपस्वी आणि भिक्षु यांना भिक्षा देण्यासाठी गृहस्थांनी उदार भावनेने दिलेले दान म्हणजेच भिक्षा हे पुण्य मानले जात असे. जनतेच्या मनात विवलेल्या पुण्यकर्माच्या संस्कारामुळेच आजही रस्त्यातून जाताना कुणी मदतीसाठी हात पुढे केला, तर त्याला पैसे किवा वस्तुरूपात मदत करण्याची भावना असते. मात्र, याच शुद्ध भावनेचा गैरफायदा करून भिक्षेचा धंदा करणाऱ्या टोळ्या महाराष्ट्रातच नव्हे; देशातील अनेक राज्यात कार्यरत झाल्या आहेत. हा गैरप्रकार रोखण्यासाठी देशातील २२ राज्यांमध्ये भिक्षेकरी विरोधी कायदा अस्तित्वात आहे. भारतात आजही भीक मागणे हा सामाजिक गुन्हा मानला जात नाही. तथापि, बॉम्बे प्रिव्हेंशन ऑफ वेगिंग ॲक्ट, १९५९ आणि इतर राज्यांमधील तत्सम कायदे स्थानिक प्राधिकरणांना सार्वजनिक ठिकाणी भीक मागताना आढळलेल्या व्यक्तींना ताब्यात घेण्याची आणि त्यांचे पुनर्वसन करण्याची परवानगी देतात. भारतीय दंड संहितेनुसार भीक मागण्याच्या उद्देशाने अल्पवयीन मुलाचे अपहरण करणे किंवा त्यांना अपंग करणे हा गुन्हा आहे. भिक्षा मागणे म्हणजे काय आणि अल्पवयीन म्हणून कोण पात्र आहे हे देखील या कलमांनुसार परिभाषित केले आहे. भीक मागण्यासाठी मुलाला कामावर ठेवणे किंवा त्याचा वापर करणे हे बेकायदेशीर आहे. या कायद्यामुळे पोलिसांनी भीक मागायला लावणाऱ्या अनेक टोळ्यांचा पर्दाफाश केला आहे. भिक्षेकरी विरोधी कायद्यामुळेच आतापर्यंत अनाथ मुलांचे झालेले शोषण रोखता आले आणि मुलांवरील अत्याचारापासून त्यांना संरक्षण मिळाले, ही बाब नव्याने सांगण्याची गरज नाही.राज्यात 'भीक' या शब्दावरून पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्रात भीक मागण्यावर प्रतिबंध घालणारे विधेयक बुधवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत मंजूर झाले, हे विधेयक सामाजिक सुरक्षा आणि सार्वजनिक व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे, असा दावा सरकारच्यावतीने करण्यात आला असला, तरीही सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या आमदारांनी विधेयकांतील 'महारोगी' या शब्दावर आक्षेप नोंदवला. विधेयकाबाबत सदस्यांना दिलेल्या माहिती पुस्तिकेतील स्पष्टीकरण अपुरे आणि गोंधळात टाकणारे आहे, अशी तक्रार सभापती नीलम गो-हे यांच्याकडे नोंदविण्यात आली. त्यामुळे विधेयकातील त्रुटी आणि सदस्यांच्या सूचनांवर चर्चा करण्यासाठी शनिवारी सभापतींच्या दालनात याबाबत विशेष बैठक बोलावली आहे. या तांत्रिक मुद्द्यांवरील चर्चेनंतर विधेयकांचे कायद्यात रूपांतर होईल, यात शंका नाही. देशपातळीवर विचार केल्यास, भीक मागण्याला गुन्हा ठरवणारा कोणताही केंद्रीय कायदा नाही. परंतु, काही राज्यांनी भीक मागण्यावर बंदी घालणारे कायदे केले आहेत. १९५९ च्या मुंबई भीक प्रतिबंधक कायद्यामुळे पोलिसांना भिकाऱ्यांना अटक करण्याचे अधिकार दिले गेले आहेत. पहिल्या गुन्ह्यासाठी ३ वर्षांपर्यंत आणि दुसऱ्या गुन्ह्यासाठी १० वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. भीक मागणे बेकायदेशीर कृत्य म्हणून घोषित करत, नवी दिल्ली, गुजरातसह अन्य काही राज्यांनीही हाच कायदा स्वीकारला. मात्र, राजस्थानने एक अनोखा कायदा केला. भिकाऱ्यांना भीक मागण्याऐवजी त्यांचे पुनर्वसन करण्यास प्रोत्साहन देत आहे. २०१२ साली लागू करण्यात आलेल्या कायद्याद्वारे भिकाऱ्यांना शिक्षा करून तुरुंगात टाकण्याऐवजी त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा राजस्थान सरकारचा उद्देश होता. तो किती सफल झाला हा वेगळा विषय ठरतो. राज्याला भिकारीमुक्त करण्यासाठी भिकाऱ्यांना अटक करण्याची मोहीम अनेक वर्षे राबवली जाते. 'महाराष्ट्र भिकारी प्रतिबंधक कायदा, १९६०' अंतर्गत भिकाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई केली जाते. या अटक कारवाईत ८० टक्के भिकारी त्यांच्या असहाय्यतेमुळे नव्हे तर व्यवसाय म्हणून भिक्षा मागत आहेत, अशी धक्कादायक बाब पुढे आली आहे. मुंबईसारख्या शहरात भिकाऱ्यांच्या अनेक टोळ्या सक्रिय आहेत, हे पोलिसांनी केलेल्या विविध छाप्यांमध्ये उघड झाले आहे. महिला आणि मुलांचा वापर भीक मागण्यासाठी केला जातो. लहान मुले आणि महिलांच्या मानवी तस्करीसह अनेक सेक्स रॅकेट भीक मागण्याच्या धंद्यात आहेत. त्यामुळे या व्यवसायाला गुन्हेगारी पार्श्वभूमीची किनार आहे. म्हणूनच या समस्येचे गंभीर स्वरूप लक्षात घेऊन राज्य सरकारकडून हा कायदा कठोर केला जात असेल, तर त्याचे स्वागतच करायला हवे. दुसऱ्या बाजूने विचार केला, तर भिक्षा मागणे ही एक सामाजिक आणि आर्थिक समस्या आहे; जी समाजात खोलवर रुजलेली आहे. धर्माच्या परिघावर असलेले अनेक समाजघटकांची उपजीविका ही भिक्षेवर आधारित आहे. त्यात पोतराज, डोंबारी, देवदेवतांच्या नावाने घरोघरी भिक्षा मागणारे सुद्धा आलेच. त्यात या कायद्यामुळे अडचण होणार नाही ना? ही बाबही तपासून पाहावी लागणार आहे. मुंबईसारख्या शहरात ग्रामीण भागातून मुली, स्त्रिया रेल्वे स्थानक परिसरात पोट भरण्यासाठी भीक मागताना दिसतात. त्यामुळे, रोजगाराचा अभाव, शिक्षण, गरिबी आणि इतर विविध कारणे त्यात लपलेली आहेत. याचाही विचार करण्याची गरज आहे. 'भिक्षेकरी कायदा' नावाने विधिमंडळात मंजूर झालेला एक जुना कायदा आहे, जो महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ म्हणून ओळखला जातो; या कायद्यामुळे भीक मागणे हा गुन्हा ठरतो आणि भिकाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाला अधिकार मिळतात. त्यांना ताब्यात घेणे, प्रशिक्षण देणे व रोजगार देणे यांसारख्या तरतुदींचा समावेश त्यात आहे. हा देशातील पहिला भिक्षा प्रतिबंधक कायदा असून भिकारी आणि भिक्षा देणारे दोघेही यात गुन्हेगार ठरतात. राज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या सुधारित कायद्यामुळे भीक मागण्याच्या नावाखाली टोळ्या चालविणाऱ्यांना लगाम बसला आणि देशाचे उभे राहणारे 'दरिद्री' हे चित्रे रोखले गेले तरी खूप झाले.

# विदर्भ राज्य 'अभी नही तो कभी नही'

**पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे विदर्भातील नियोजित १३१ धरणे पूर्णत्वास गेली असती तर १४ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आली असती. सिंचन क्षमता १७ वरून ७०% पर्यंत जाऊन विदर्भ 'सुजलाम'झाला असता.**

छत्तीसगड, तेलंगणा व उत्तराखंड या छोट्या राज्यांची निर्मिती झाली तेंव्हाच त्यांच्यापेक्षा जास्त लोकसंख्या,साधन साहित्याची विपुलता, जास्त उत्पादन व शिलकीचे अंदाजपत्रक असू शकणारे व आपल्या १३७ वर्षांपुर्वीच्या मागणीचा इतिहास असलेले विदर्भ राज्य मात्र निर्माण करण्यात आले नाही.यास प्रमुख कारणे म्हणजे सत्तेतील प्रमुख राजकीय पक्ष कॉंग्रेस व भाजपा यांची अनास्था.त्या प्रश्नाबाबतची बेईमानी. दुसरे कारण म्हणजे वैदर्भीय जनतेचा क्षोभ व असंतोष याची जाहीर प्रदर्शनातील कमी हे होय.

**'आता नाही तर कधीच नाही'**

भाजपा शासनाचे नागपुरचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीच्या जाहीर प्रचारसभेत भाजपा सत्तेवर आल्यानंतर तीन महिन्यात स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण करेल, असे आश्वासन दिले असतांना आता तोंडाला पाने पुसली.तसेच केंद्रातील मातब्बर भाजप नेते नितीन गडकरी यांनी सुद्धा 'सत्तेवर आलो तर विदर्भ राज्य अवश्य देऊ' असे आश्वासन दिलेले होते.पण काहीच झाले नाही. त्या आश्वासनाची आठवण देणारे श्री चौबे यांच्या ५०० पत्रांना त्यांनी एकही उत्तर दिले नाही.ही 'गरज सरो नि वैद्य मरो'अशी राजकीय भूमिका सर्व नेत्यांचीच दिसते.

**स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी सव्वाशे वर्षांपूर्वीची**

सर्वप्रथम ब्रिटिश काळात सी.पी.अँड बेरार (मध्यप्रदेश व वऱ्हाड)चे चीफ कमिश्नर अलेक्झांडर मॅकेन्झी यांनी ते इ.स.१८८८ मध्ये भारताचे ब्रिटीश गव्हर्नर लॉर्ड डफरीन यांच्याकडे स्वतंत्र विदर्भ राज्याची शिफारस केली होती.त्यानंतर कॉंग्रेसने १८९१ च्या अधिवेशनामध्ये ठराव प्रथम पारीत केला होता. त्यानंतरच्या तब्बल ५ विविध अधिवेशनामध्ये पुन्हा हा ठराव पारित करण्यात आला.भाजपने सुद्धा भुवनेश्वर (१९९०)अधिवेशनामध्ये स्वतंत्र विदर्भ राज्याचा ठराव मंजूर केला.एवढेच नव्हे तर भाजपच्या जाहीरनाम्यातच स्वतंत्र विदर्भाची मागणी करण्यात आलेली आहे. तरीही सध्या कोणीही सत्ताधारी नेता त्यावर बोलायला तयार नाही.ब्रिटिश काळात मध्य प्रदेशची राजधानी नागपूर ही होती. त्या नागपूर येथील म.प्र.विधानसभेत कॉंग्रेसी राज्यकर्त्यांनी १९३१ मध्ये स्वतंत्र विदर्भाचा ठराव मंजूर केला होता.

**विदर्भ भूमी सुजलाम् सुफलाम्**

राज्यातील एकट्या विदर्भात कोळसा व खनिजांचे सर्वाधिक साठे आहेत.सात मोठ्या बारमाही वाहणाऱ्या नद्या, सुपीक जमीन,प्रचंड वनसंपत्ती व अभयारण्ये कापूस, सोयाबीन,संत्रा,तांदूळ यांचे भरपूर उत्पादन व कापसाची आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, प्रचंड वीज निर्मिती क्षमता तसेच संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रबोधनाचा समृद्ध वारसा,डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या सामाजिक व शैक्षणिक प्रसाराचे कार्य अशी पार्श्वभूमी लाभलेली आहे.

विदर्भाच्या भूमीतच रिद्धपूर, रामटेक,एलीचपूर,कौंडण्यपूर ही ऐतिहासिक ठिकाणे, गाविलगड व इतर किल्ले, पुरातन मंदिरे असून नागपूर हे मध्य भारतातील म.प्र. राजधानीचे शहर होते. आजही तेथे विधानसभा ,राजधानीस आवश्यक ईमारती, दीक्षाभूमी असून ती महाराष्ट्राची उपराजधानी करण्यात आलेली आहे.तरी सुद्धा केवळ मराठी भाषिक ह्या निकषावर १ मे १९६० रोजी विदर्भ प्रदेशास मध्यप्रदेशातून काढून (विदर्भाची परवानगी न घेता) संयुक्त महाराष्ट्रात विलीन करण्यात आले. हे विलीनीकरण करतांना ऐतिहासिक नागपूर करार व अकोला करार विदर्भासोबत करण्यात आला. परंतु त्याही वेळी विदर्भाचे विलीनीकरण करण्यास सामान्य लोकांचा विरोधच होता. २८ मार्च १९६० च्या आंदोलनामध्ये नागपुरला रघुनाथ ढोले हा विदर्भवादी शहीद झाला होता. तसेच वीस पोलीस जखमी झाले होते. त्यानंतर सुद्धा वेळोवेळी विदर्भात ठिकठिकाणी स्वतंत्र विदर्भाच्या मागणीची आंदोलने करण्यात आली.

स्वतंत्र विदर्भ राज्य व्हावे ह्या मागणीसाठी नाग विदर्भ आंदोलन समिती, विदर्भ मुक्ती मोर्चा,बळीराजा विदर्भ,जय विदर्भ पार्टी अशा अनेक संघटनांनी आपला आक्रोश व्यक्त केला. स्वतंत्र विदर्भाच्या आंदोलनाचे पुरस्कर्ते स्व. बापूजी अणे, ब्रिजलाल बियाणी,मंचरशा आवारी, बाबू हरिदास, बनवारीलाल पुरोहित, राजे विश्वेश्वरराव,भाऊसाहेब मुखरे, मद्दे खान, नंतरच्या काळात जांबुवंतराव धोटे, नानाभाऊ एंबडवार, राम हेडाऊ, सुरेंद्र भुयार, टी.जी. देशमुख ही मंडळी आघाडीवर होती. आता स्व. राम नवले, माजी आमदार वामनराव चटप, प्रा. श्रीनिवास खांदेवाले, ॲड. श्रीहरी अणे व संपादक प्रकाश पोहरे ह्या मंडळींनी विदर्भावरील अन्यायाच्या विरोधात शंख फुंकले आहे.

१९६१ नंतर महाराष्ट्रात सामील होऊन विदर्भाचे मागासलेपण वाढतच गेले. व विकासाचा प्रचंड अनुशेष विदर्भात निर्माण झाला.हे शासनाने नेमलेल्या बहूतेक आयोगांने मान्य केलेआहे. काहींनी तर स्वतंत्र विदर्भ राज्य करण्याची पुष्टीही जोडली. सांप्रतच्या राज्यकर्त्यांनीही स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीकडे सरासर दुर्लक्ष केले. विकासाचा निधी च्या वाटपामध्ये सुद्धा विदर्भावर सतत अन्याय केला.त्यामुळे विदर्भ मागे-मागे पडत गेला.मग माघारलेपणाच्या अभ्यासासाठी शासनाने दार कमिशन(१९४८), व्हइ कमिटी,जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, पट्टाभी सीतारामय्या अहवाल, राज्य पुनर्रचना आयोग १९५३ (अध्यक्ष-फाजल अली),केळकर समिती,पी ए संगमा समिती (१९८७) हे नेमण्यात आलेत. बहुतेक आयोगांनी स्वतंत्र विदर्भ राज्य हेआर्थिक सक्षम ठरू शकते. हे सुचविले.



सिंचन,कृषी,आरोग्य, दळणवळण इ. बाबतीत लोकसंख्येच्या प्रमाणात अपुऱ्या आर्थिक तरतुदींद्वारे विदर्भावर अन्याय करणे चालूच राहिले. उदया् पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे विदर्भातील नियोजित १३१ धरणे पूर्णत्वास गेली असती तर १४ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आली असती व सिंचन क्षमता १७ वरून ७०% पर्यंत वाढली असती आणि विदर्भ 'सुजलाम'ङ झाला असता.

**विदर्भाचे माघारलेपण**

विदर्भात प्रचंड उत्पादनक्षमता असून उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ विकासाच्या बाबतीत आतापर्यंत महाराष्ट्रात खूप माघारला. विदर्भातील अनुशेषावर नेतेमंडळींनी सरळ दुर्लक्ष केले. किंबहुना पश्चिम विदर्भातील सत्ताधिशांनी विदर्भ विकासाकडे डोळे झाक केली. येथे बहुसंख्य शेतकरी कोरडवाहू शेती उत्पादन करणारे असून यांच्या धान्याला उत्पादन खर्चावर आधारित किंमत मिळालेली नाही. किमान आधारभूत किंमत(msp) सुद्धा अनेकदा मिळत नाही. विदर्भातील शेती मोठी असल्याने शेतकऱ्यांकडे पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत शेती क्षेत्र जास्त आहे. त्यामुळे त्या निकषांवर कर्जमाफी वगैरेचे लाभ मिळत नाही.सोयी सवलतींचा लाभ प्रत्यक्षात फार कमी शेतकऱ्यांना मिळतो. येथील मुख्य पीक कापूस व संत्रा.त्यावर याभागात प्रक्रिया उद्योग नाही.

विदर्भातील युवकांमध्ये प्रचंड बेरोजगारीची गंभीर समस्या आहे. नागपूर करारानुसार मात्र २३ टक्के नोकऱ्या विदर्भातील युवकांना द्यायला पाहिजे होत्या.परंतु केवळ आठ टक्के युवकांना नोकऱ्या मिळू शकल्या. इकडच्या सक्षम सुशिक्षित युवकांना नोकरी खातीर पुणे, मुंबईस जावे लागते.त्यांच्या नोकरीचा आर्थिक लाभ उर्वरित कुटुंबांना मिळत नाही. गावे ओसाड पडत आहेत. स्पर्धा परीक्षांच्या पेपरमध्ये विदर्भावरील प्रश्न अत्यल्प असतात.

**उद्योग-धंदे**

आज महाराष्ट्रात मुंबई-पुणे- नाशिक-अलिबाग- पनवेल येथे सर्वाधिक उद्योग केंद्रीत झाले आहेत.विदर्भात मात्र उद्योगधंदे तुरळक आहेत.

रेल्वे-ब्रिटिशकाळा नंतर येथे नवीन रेल्वे लाईन्स निर्माणच झाल्या नाहीत.अपवाद फक्त निर्माणाधीन नागपूर-नांदेड रेल्वे लाईनचा.

**विदर्भाचे माघारलेपण**

विदर्भाच्या११जिल्ह्यात मिळून सिंचन प्रकल्प- १०१(२०२),कारखाने रद्द हे २,३१६(१५,३४७), कृषीपंप- ८,९८७१५ (२३,५३,१९२), विजेचा वापर १३.२४ (४५.१३)आणि ओसाड गावे २३००,(१३०) . (टीप;- कंसातील आकडे उत्तर व पश्चिम महाराष्ट्रातील फक्त१० जिल्ह्यांतील असून कंसाबाहेरील आकडे विदर्भाच्या सर्व ११ जिल्ह्यांतील मिळून आहेत.)

**असमतोलाचा परिणाम म्हणजे शेतकरी आत्महत्या!**

शेतकरी आर्थिक कुचंबनेमुळे ताण असह्य झाला की निरूपाय म्हणून आत्महत्या करतात, असे आढळते. विदर्भात आतापर्यंत सुमारे ४० हजारावर शेतकरी आत्महत्या झाल्यात.दुर्दैवाने जगात विदर्भ हा आत्महत्याग्रस्त प्रदेश म्हणून कुप्रसिद्ध झाला. केवळ ह्या २००१पासून २०२४ पर्यंत पाहिले तरी फक्त पश्चीम विदर्भाच्या पाचच जिल्ह्यात २०,२१९ आत्महत्या झाल्याची नोंद एका निष्पक्ष सर्वेनुसार नुकतीच जाहीर झाली आहे.

**स्वतंत्र विदर्भ राज्य झाल्यास काय फायदा?**

हे खरे आहे की, देशात मराठी भाषिकांची दोन राज्ये होतील. खरेतर ही प्रगतीची व आनंदाची बाब असावी. हिंदी भाषिकांची नाहीत का अनेक राज्ये ? याचा फायदा असा होईल की विदर्भ राज्यास केंद्राच्या निकषानुसार स्वतंत्रपणे निधी मिळत जाईल.तो सध्याच्या खर्चीत निधी पेक्षा जास्तच राहील.

**निवड मंडळ**

एमपीएससी ऐवजी व्हीपीएससी निवड करेल,परीक्षा घेईल.प्रश्नपत्रिकेत विदर्भातील माहितीवर अनेक प्रश्न असतील. बहुतेक विदर्भातील पात्र युवकांची निवड होईल. त्यांना नोकरीसाठी विदर्भाबाहेर जाण्याची वेळ येणार नाही. त्यांचे स्थलांतरण थांबले तर येथील बहुसंख्य कुटुंबांना दिलासा मिळेल.नवे उद्योग उभे होतील.

आज महाराष्ट्रात सर्वाधिक उद्योग मुंबई, पुणे, नाशिक, पनवेल अलिबाग येथेच केंद्रित झाले आहेत. आणि विदर्भातील उद्योगांची संख्या खूप तुटपुंजी आहे.उद्या येथे पुरेशी सिंचन सुविधा व औद्योगीकरणाच्या सोयीं उपलब्ध झाल्यावर विदर्भातच भरपूर उद्योग निर्माण होतील व त्यामुळे युवकांसाठी अनेक रोजगाराच्या संधी येथेच निर्माण होतील.त्यातील बहुतेक रोजगार स्थानिक युवकांना मिळतील.

उच्च तंत्रज्ञान, व्यवस्थापन क्षेत्रातील तरुणांना सुद्धा विदर्भात रोजगार उपलब्ध होतील. युवकांची बेरोजगारी मिटेल.युवकांचे स्थलांतरण (ब्रेनड्रेन)थांबेल.येथे पूर्ण वेळ, पूर्ण दाबाची वीज मिळेल,दिलासा देणारी बाब म्हणजे ग्राहकांची वीजबीले अर्ध्यावरच येतील.त्यामुळे नवनवीन उद्योगांनाही चालना मिळेल.तुलनेने राजधानी (नागपूर) जवळच असल्याने गरजू व ग्रामीण लोकांना सहज जाऊन कामे करता येईल. विदर्भात वने, खनिजे,तसेच ,कापूस,तूर,सोयाबीन व धान उत्पादन भरपूर असल्याने त्यावर आधारित ङउद्योग विदर्भातच निर्माण होतील.

रेल्वे-पुरेसा निधी आल्याने प्रलंबीत खामगाव- जालना,व अमरावती-कारंजा-वाशिम ह्या नवीन रेल्वे लाईन्स होऊ शकतील.

विदर्भाचे कमी झालेले ४ आमदार व १ खासदार पूर्ववत परत मिळतील.चंद्रपूर सीमेवरील १४ गावे परत महाराष्ट्रात राखण्यासाठी जोरकस प्रयत्न होतील.विदर्भाचा निधी हा विदर्भातच खर्च होईल. त्यामुळे येथील लोकांची प्रगती होऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल.सर्वात महत्त्वाचे असे की, एकूनच विदर्भाची दैन्यावस्था दूर झाल्याने ह्यापुढे येथल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील.

**..तरी विदर्भ शांत का?**

विदर्भ हा मुळातच समजदार व सोशिक आहे. उर्वरीत महाराष्ट्र हा आपला मोठा भाऊ. म्हणून तो कधीतरी आपली व्यथा समजून घेईल,हे मानून त्याने असंतोषाचा ऊद्रेक होऊ दिला नाही.दुसरे असे की, जांबुवंतराव धोटे व मंडळी कृषी विद्यापीठाच्या सारखेच स्वतंत्र विदर्भ राज्य मिळवून आणतील, हा आशावाद लोकांनी जोपासला होता.(७०-८० चे दशक)तिसरे शरद जोशी शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारीत भाव मिळवून देतील.मग शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर होईल. बळीराजाचे 'सुफलाम' राज्य येईल असा विश्वास ठेवून शरद जोशीं मागे ८०-९०च्या दशकात येथला शेतकरी पूर्ण शक्तिनिशी आंदोलनात उतरला होता.परंतु दुर्दैवाने ह्या दोन्ही आंदोलनाची जहाज अगदी अंतीम टप्प्यात खडकावर फुटलीत विदर्भ राज्य हे स्वप्नच राहिले.अजूनही वेळ गेली नाही.

**'बस, कुछ देर की खामोशी,**
**फिर शोर आयेगा।**
**तुम्हारा तो सिर्फ वक्त आया है।**
**हमारा तो दौर आयेगा।'**

आता एकवार पुन्हा विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या लढ्यात सामील होऊन शेतकरी, कामगार, युवक विदर्भ राज्य पदरात पाडून घेतील.कारण त्यांना समजले आहे...

**विदर्भ राज्य हक्काचं।**
**नाही कुणाच्या बापाचं।।**

आता एकच ठरवायचे. 'खुदीको कर बुलंद ईतना,के खुदा बंदेसे पुछे बतां तेरी रजा क्या है?

**लोक त्रस्त,नेते मस्त!**

विदर्भाचेच असलेले वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक आणि आता देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होऊनही त्यांनी विदर्भाच्या तोंडाला पानेच पुसली.त्यांनी विदर्भाच्या मागणीचा खुर्ची पर्यंत पोचण्यासाठी उपयोग जरुर केला.परंतु खुर्ची गाठताच,'रोग सरो नि वैद्य मरो' या उक्तीनुसार त्यांना विदर्भ मागणीचा सोयीस्कर विसर पडला.कदाचीत पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी नेत्यांसोबत त्यांना जुळवून घेण्यासाठी तडजोड करावी लागली असेल.

**-प्रा.शरद पुसदकर**
अमरावती
मो.९४२३६०८६५१

## शंखनाद महोत्सव

दिल्ली येथील भारत मंडपम् येथे १३ आणि १४ डिसेंबर या दिवशी 'सेव्ह कल्चर सेव भारत फाउंडेशन'आणि 'सनातन संस्था' यांच्या विद्यमाने भव्य सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव होणार आहे. भाषावाद, प्रांतवाद, जातीयवाद यांनी अंतर्गत सुरक्षितता आणि एकसंघता यांना धोका निर्माण झालाआहे.

यासाठी युवा पिढीला योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. म्हणून या कार्यक्रमात शौर्य जागरण होण्यासाठी शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन आणि उद्बोधन सत्र होणार आहे.अशावेळी विश्वगुरु आणि देवभूमी असलेला भारतच जगाचे नेतृत्व करू शकतो. विनाशकाळात विश्वाला वाचवण्याचे सामर्थ्य केवळ सनातन हिंदुधर्मात आहे हे सत्य प्रसारित करण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन आहे.

**संध्या काटदरे**

## राष्ट्ररक्षण - प्रत्येक नागरिकाचा धर्म

गेल्या काही वर्षांत देशात घुसखोरीची समस्या झपाट्याने वाढली असून त्यातून भारतातील नागरिकांवर आर्थिक समस्या, रोजगारातील असंतुलन, संसाधनांवरील ताण, आरोग्य सुविधा, सामाजिक आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोके अशा गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.राष्ट्र रक्षण करणे केवळ सरकार आणि सेनेचे दायित्व नाही, तर ते प्रत्येक नागरिकाचे प्रथम कर्तव्यच नव्हे तर तोच नागरिक धर्म आहे. ही जागृती निर्माण करणारा 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' दिल्ली येथे १३ आणि १४ डिसेंबरला होणार आहे. हा कार्यक्रम घरी बसून ऑनलाईन बघता येणार ही आनंदाची बाब आहे.

**प्रांजली ब्रम्हे**
नागपूर

## शौर्याचा खजिना दिल्लीकरांसाठी होणार खुला!

मे महिन्यात गोव्यात सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव यशस्वीरीत्या पार पाडल्यानंतर येत्या १३ आणि १४ डिसेंबरला 'सनातन संस्था' आणि 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत' या दोन्ही संघटना मिळून आंतरराष्ट्रीय पातळीवर ख्याती असलेल्या दिल्लीतील भव्य भारत मंडपममध्ये पुन्हा एकदा सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे आयोजन केले. महोत्सवादरम्यान गोव्यामध्ये ज्याप्रकारे इतिहासकालीन अस्त्र आणि शस्त्र यांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते तशाच स्वरूपाचे किंबहुना त्याहून भव्य दिव्य असे पुरातन अस्त्र-शस्त्र प्रदर्शन लोकांना पाहायला मिळणार आहे. या प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील सुमारे २५० हून अधिक दुर्मिळ आणि ऐतिहासिक शस्त्रे ठेवण्यात येणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी हाताळलेल्या अनेक शस्त्रांचे साक्षात दर्शनही याठिकाणी घेता येणार आहे. त्यासमवेतच अन्य मराठा साम्राज्यातील सेनापतींनी चालवलेली शस्त्रे प्रदर्शनात असणार आहेत. महाराणा प्रताप यांच्या काळातील शस्त्रांसह कर्नाटकातील विजयनगर साम्राज्यकालीन तलवारी, शिवकालीन युद्धपरंपरा, धातूशास्त्र, 'लोखंड ते शस्त्र' या संकल्पनेवर आधारित मराठा शस्त्रनिर्मिती प्रक्रिया या ठिकाणी समजावली जाणार आहे. इतिहासकालीन हिंदू स्त्रियांनी आत्मरक्षणासाठी वापरलेल्या शस्त्रांचाही या प्रदर्शनात समावेश असणार आहे. अशा प्रकारचे भव्य शस्त्रप्रदर्शन दिल्लीत पहिल्यांदाच आयोजित केले जात असल्याने ते पाहणे नक्कीच रोमांचकारी असणार आहे.

**ज्योती रावराणे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

# अवधूतवाडी पोलीस ठाण्याचा भोंगळ कारभार उघड

## नरेश रणधिर यांना १ लाखाची लाच घेताना एसीबीकडून रंगेहात अटक




**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : काहीच दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत दिमाखात उद्घाटन झालेल्या अवधूत वाडी पोलीस स्टेशनची प्रतिष्ठा आज अक्षरशः धुळीस मिळाली. पारदर्शक व निष्ठावंत कामकाजाचे आश्वासन देणारे याच ठाण्याचे पोलीस निरीक्षक नरेश रमेशराव रणधीर (वर्ग-१) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) अमरावतीने एक लाखांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडून अटक केली. असून त्यांच्या घराची शुद्ध झाडाझडती करण्यात आली असल्याची विश्वसनीय सूत्रांकडून माहिती मिळाली आहे.

तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, त्याने आपल्या ओळखीच्या व्यक्तीस दहा लाख रुपये सहा महिन्यांच्या अवधीत परत करण्याच्या अटीवर दिले होते. मात्र मुदत उलटूनही पैसे न मिळाल्याने तक्रारदाराने १० डिसेंबर रोजी अवधूत वाडी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. यावेळी ठाणेदार रणधीर यांनी पैसे परत मिळवून देण्याच्या मोबदल्यात तब्बल ५ लाख रुपये लाचेची मागणी केली होती.त्या अनुषंगाने तक्ररदार यांनी एसीबी अमरावती येथे तक्रार दाखल करून घेतली.त्या प्रकरणी एसीबी अमरावतीने १२ डिसेंबर रोजी पडताळणी केली असता आरोपी निरीक्षकाने ३ लाखांवर सौदा पक्का केल्याचे स्पष्ट झाले. यानंतर रचलेल्या सापळा कारवाईदरम्यान रणधीर यांनी तक्रारदाराकडून १ लाख रुपये स्वीकारताच ACB पथकाने त्यांना प्रत्यक्ष गुन्ह्याच्या ठिकाणीच जेरबंद केले. आरोपीवर अवधूतवाडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून या कारवाईमुळे नुकत्याच उद्घाटन झालेल्या पोलीस स्टेशनच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'न्याय देणारेच लाच मागत असतील तर सामान्य नागरिकांनी कुणावर विश्वास ठेवावा?' असा संतप्त सवाल स्थानिक पातळीवर उपस्थित केला जात आहे. ही कारवाई अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे व पोलीस उपअधीक्षक सुनिल किनगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत निरीक्षक चित्रा मेसरे, स्वप्निल निराळे, पोलीस शिपाई शैलेश कडू, उपेंद्र थोरात, वैभव जायले, चालक सतीश किटूकले व राजेश बहिरट यांनी सहभाग घेतला. दरम्यान एसीबी ने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी लाचेची मागणी करत असल्यास तत्काळ संपर्क साधावा. एसीबी संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले.

# गुरु तेग बहादुर यांचे बलिदान सदैव स्मरणात राहील : भूपिंदर कौर



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - गुरु तेग बहादुर यांनी अहिंसा,सत्य आणि मानवी स्वातंत्र्याचा संदेश आपल्या शिकवणीतून दिला ते शिख संप्रदायाचे नववे गुरु होते. मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी औरंगजेबाच्या आदेशाने अन्याय व अत्याचाराविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी बलिदान दिले म्हणूनच त्यांना हिंद की चादर अर्थात हिंदुस्थानची ढाल म्हणून ओळखले जाते असे प्रतिपादन भूपिंदर कौर यांनी केले.

मातोश्री सुभद्राबाई जिल्हेवार माध्यमिक विद्यालय श्रीरामपूर येथे गुरु तेग बहादुर यांचा ३५० वा शहीदी समागम कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक गणेश धर्माळे, प्रमुख अतिथी भूपिंदर कौर जसपाल सिंग भाटिया, विशेष अतिथी विनोद पडघने उपस्थित होते.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते गुरू तेग बहादुर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रास्ताविकातून बाळकृष्ण मंदाडे यांनी गुरू तेग बहाद्दूर यांच्या संपूर्ण जिवन चरित्रावर प्रकाश टाकला. भूपिंदर कौर पुढे म्हणाल्या की गुरू तेग बहाद्दूर यांच्या बलिदानाने शिख धर्माची एक नवी अस्मिता निर्माण झाली त्यांची ११५ पदे पवित्र गुरू ग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट आहेत यावेळी त्यांच्या भावना अनावर झाल्या व अश्रू ओघळले.यावेळी चंचल राठोड, कल्याणी जाधव,चांदणी आडे, कार्तिक जाधव, शिवदत्त चव्हान, प्रज्वल मस्के व विशेष अतिथी विनोद पडघने यांनी गुरु तेग बहादुर यांच्या कार्याची माहिती दिली.अध्यक्षिय भाषणात मुख्याध्यापक गणेश धर्माळे यांनी विद्यालयात शिक्षणासह मानवी मूल्ये व देशभक्तीची बीजे रुजविण्याचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. विद्यार्थी व शिक्षकांच्या कार्याची स्तुती केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल अस्वार यांनी तर आभारप्रदर्शन विष्णू मंदाडे यांनी केले.

# भाजीपाल्याच्या आड गुटखा तस्करी..!

## यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई, 19.53 लाखांचा मुद्देमाल जप्त

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला सुगंधित पानमसाला व गुटखा अदीलाबाद येथून खरेदी करून पांढरकवडा, घाटंजी मार्गे अमरावती कडे नेत असताना यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पहाटेच्या धाडीत 19,53,700 रुपयांचा मुद्देमाल जप्त करून चार आरोपींना ताब्यात घेतले. भाजीपाला वाहतुकीच्या आडून सुरू असलेला हा गुटखा तस्करीचा प्रकार उघडकीस आणला.

१२ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ४ ते ५ वाजण्याच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेला प्राप्त झालेल्या खात्रीशीर गुप्त माहितीनुसार, घाटंजी टी-पॉईंटजवळ नागपूर रोडवर सापळा रचण्यात आला. दरम्यान वर्णनात सांगितलेल्या बोलेरो पिकअप (MH 27 BX 9444) तसेच पायलटिंग करणारी Hyundai Xcent (MH 04 HN 4589) संशयास्पद स्थितीत दिसून आल्याने ती वाहने थांबवून पंचासमक्ष तपासणी करण्यात आली. Hyundai Xcent मधील शेख अझजर शेख करिम (२५), अयाज खान अख्तर खान (३७) तसेच बोलेरो पिकअप मधील शेख शोएब शेख इसाक (२९), हमीद खान हबीब खान (५३), अब्दुल मुकीम अब्दुल फारुक (३६) अशी आरोपींची नावे असून, दोन्ही वाहनांमध्ये भाजीपाला नेण्यासाठी ठेवलेल्या रिकाम्या क्रेटच्या आड 20 पोत्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुटखा साठवलेला आढळला. तपासणीअंती HOT Premium Pan Masala व H-5 Premium Chewing Tobacco या प्रतिबंधित व आरोग्यास हानीकारक उत्पादनांचा 7,12,700 रुपयांचा साठा, वाहनांसह एकूण 19,53,700 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात प्रतिबंधित गुटखा 7 लाख12 हजार 700 रिकामे प्लॅस्टिक कॅरेट 11 नग 5,500, बोलेरो पिकअप वाहन 7,लाख रुपये, Hyundai Xcent वाहन 5,लाख रुपये, 5 मोबाईल 41हजार रुपये स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे अदीलाबाद–यवतमाळ–अमरावती मार्गावरील गुटखा तस्करीला मोठा धक्का बसला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, पोलीस निरीक्षक सतिष चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनिष गावंडे, पोउपनि गजानन राजमलु तसेच पथकातील साजिद, योगेश गटलेवार, रुपेश पाली, योगेश डगवार, प्रशांत हेडाऊ, रितुराज मेडवे, सचिन घुगे, सुनिल पैठणे, आकाश सहारे, आकाश सुर्यवंशी, देवेंद्र होले यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# वेचक

## हरवलेले १० मोबाईल शोधून यवतमाळ पोलिसांकडून तक्रारदारांना सुपूर्द



यवतमाळ - नागरिकांच्या तक्रारींवर तत्परतेने प्रतिसाद देत यवतमाळ शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने एकूण १० हरवलेले मोबाईल शोधून त्यांच्या मालकांना परत केले. या मोबाईलची एकूण किंमत अंदाजे १,८७,००० इतकी आहे.पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या 'पोलीस समन्वय' उपक्रमांतर्गत आणि 'ऑपरेशन प्रस्थान' मोहिमेचा भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली. नागरिक आणि पोलीस यांच्यातील विश्वाससंबंध अधिक दृढ व्हावा, तसेच तक्रारदारांना दिलासा मिळावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी पोलीस स्टेशन स्तरावर CEIR पोर्टलचा परिणामकारक वापर करण्यात आला. तक्रारदारांकडून मिळालेल्या तक्रारींच्या आधारे पोलीस पथकाने सातत्याने माहिती तपासून मोबाईल शोध काढला. त्यानंतर पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या हस्ते मोबाईलची परतफेड करण्यात आली. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता,अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात,उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या मार्गदर्शनाखाली,तर प्रत्यक्ष अंमलबजावणी पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव आणि पोलीस अंमलदार रविंद्र नेवारे व अंकुश फेंडर यांनी केली. नागरिकांच्या हरवलेल्या वस्तू सुरक्षितपणे परत मिळाल्याने तक्रारदारांनी समाधान व्यक्त केले असून, पोलीसांच्या या उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## नागपूर अधिवेशन गाजवणाऱ्या बिबट्याचा आर्णीतही धुमाकूळ

आर्णी - महाराष्ट्रभर बिबट्याचे किस्से गाजत असताना, काल रात्री बिबट्याने आर्णीतील हाफिजबेग नगर मध्ये धुमाकूळ घातला. राज्यभरात अनेक ठिकाणी नागरिकांवर हल्ले करून लोकांना जखमी केल्यामुळे, ठिकठिकाणच्या आमदारांनी प्रश्न उपस्थित केल्याने नागपूर येथील अधिवेशन बिबट या हिंस्त्र पशु मुळे खूप गाजत आहे. अशातच काल बुधवारी 11डिसेंबर च्या रात्री बिबट्याचा शिरकाव आर्णी शहरात झाला. शहरातील बोरगाव रोड शेजारी असलेल्या हाफिज बेग नगर मधील काही नागरिक रात्री शतपावली करतांना, वस्ती शेजारी लागून असलेल्या पांदण रस्त्यावर फेरफटका मारत होते. अश्यातच अचानक समोरून बिबट हा वाघ दिसल्याने नागरिकांची घाबरगुंडी उडाली. उपस्थितांची पळापळ होत असताना बिबट्याने एका तरुणाला टार्गेट केले. तरुणाने बिबट्याच्या तावडीतून स्वतःची कशीबशी सुटका करून पळ काढला. तसेच नागरीकांचा कल्लोळ उडाल्याने बिबटही जवळच्या शेतात पसार झाला. ही वार्ता शहरभर पसरल्याने नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच वन विभागाने बिबटला जेरबंद करावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## बँकेच्या जप्त मालमत्तेवर बळजबरीने ताबा ; विविध कलमान्वये गुन्हे दाखल!



पुसद - शहरामधील देशमुख नगर बंजारा कॉलनी येथील मालमत्ता न्यायालयाच्या आदेशाने इंडियन ओव्हरसीज बँकेने जप्त केली. या मालमत्तेचा बळजबरीने ताबा घेण्यात आला. याबाबत बँकेचे शाखा व्यवस्थापक प्रवीण मावळकर यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरून बुधवारी पुसद शहर पोलिसांनी संजय अभय देशमुख यांच्यासह १२ जणांवर कलम ३२९(२), १८९(१), १८९(२), ३५१ (२) (३) बीएनएसनुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस स्टेशन पुसद शहर ठाणेदार हे करिता आहेत.

## भरधाव कारच्या धडकेत तिघे जखमी

बाभूळगाव : भरधाव जाणाऱ्या कारने अचानक ब्रेक लावल्यामुळे दुचाकीला धडक बसली. या अपघातात दुचाकीवरील महिलेचा तिच्या दोन मुली जखमी झाल्या. ही घटना १० डिसेंबर रोजी स्वामी विवेकानंद विद्यालय, बाबुळगाव येथे घडली. रवींद्र सुधाकर वाघमारे (३५) रा. वडगाव गाढवे जि. यवतमाळ असे फिर्यादीचे नाव आहे. फिर्यादी हे आपल्या दुचाकी क्रमांक एमएच २९ एसी ७३३६ यवतमाळ बाबुळगाव येत होते-दरम्यान, भरधाव जाणाऱ्या एम एच ३६ एएच ०३६२ क्रमांकाच्या कार चालकाने आपल्या वाहनाचा अचानक ब्रेक दाबला.

# आर्णी कृषी विभागातील भ्रष्टाचाराचा आरोप..!

## शेतकरी थेट नागपूर अधिवेशनात रोहित पवारांनी घेतला एलेक्यू

**जनमाध्यम प्रतिनिधी**

आर्णी - आर्णी तालुका कृषी विभागातील गंभीर गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांची तक्रार ब्राम्हणवाडा (ता. आर्णी) येथील शेतकरी विजय नरसिंग राठोड यांनी थेट महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. ही तक्रार तालुका कृषी अधिकारी, आर्णी यांच्या माध्यमातून सादर करण्यात आली.

विशेष म्हणजे आपला आवाज सरकारपर्यंत पोहोचावा म्हणून शेतकरी विजय राठोड थेट नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात पोहोचले. या प्रकरणी आमदार रोहित पवार यांनी विधानसभेत एलेक्यू करून मुद्दा उपस्थित केल्याची माहिती स्वतः राठोड यांनी दूरध्वनीवरून दिली. तक्रारीत २०२०–२१ पासून आर्णी तालुक्यात राबविण्यात आलेल्या कृषी यांत्रिकीकरण योजनेतील



कृषी अवजारांच्या वाटपात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे नमूद केले आहे. अवजारे पात्र शेतकऱ्यांना न देता इतरांच्या नावावर वितरित केल्याचा आरोप ज्यांच्याकडे ट्रॅक्टर नाही, अशांना ट्रॅक्टर आवश्यक असलेल्या योजनेचा लाभ देण्यात आल्याचे नमूद पैसे दिल्याशिवाय अनुदान खात्यात जमा होत नाही" असा गंभीर आरोप तक्रारीतून याच कालावधीत जलयुक्त शिवार योजनेत आर्णी तालुक्यात झालेल्या विविध कामांची तांत्रिक आणि गुणवत्तानियंत्रण कक्षामार्फत चौकशी करावी, अशी मागणी राठोड यांनी केली आहे.

### "सखोल चौकशी झाली तर अनेक गोष्टी उघडकीस येतील" : शेतकरी राठोड

कृषी विभागातील अनुदान वाटपात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. सखोल चौकशी केल्यास अनेक गैरव्यवहार प्रकाशात येतील असे मत शेतकरी विजय राठोड यांनी व्यक्त केले. सदर शेतकरी विजय नरसिंग राठोड हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी असून, त्यांच्या तक्रारीला आमदार रोहित पवार यांनी तातडीने प्रतिसाद देत नागपूर अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला आहे. या तक्रारीनंतर आर्णी कृषी विभागातील प्रक्रिया, पात्रता निकष आणि अनुदान वितरण पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, सरकारकडून चौकशी सुरू होण्याची अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

# गौण खणीज चोरी होणार नाही याची दक्षता घ्या : जिल्हाधिकारी विकास मिना

## बाभुळगाव येथे विवीध ठिकाणी भेटी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



बाभुळगाव : बाभुळगाव, आर्णी, महागाव, उमरखेड या ठिकाणहुन गौण खणीजाच्या जास्त तक्रारी असतात गौण खणीज चोरी व उत्खनन होणार नाही याची दक्षता घ्या नदीवरील सर्व रस्ते जेसीबीच्या सह्याने खड्डे करुन बंद करा, जेथुन गौण खणीजांची वाहतुक होते त्या रस्त्यावर पथक बसवा महिन्यातुन एक केसेस करणे म्हणजे कारवाई करणे नव्हे,गौण खणीज चोरी रोखल्या गेली पाहिजे, तसेच, विना नंबरच्या टॅक्टर, ट्रक वर कारवाई करा अशा सुचना जिल्हाधिकारी विकास मिना यांनी तहसीलदारांना दिल्या दिनांक 10 डिसेंबर रोजी बाभुळगाव येथे भेटी दिल्या.

पोलिस निरीक्षक तावरे यांना गौण खणीज चोरी रोखण्यासाठी महसुल प्रशासनाला वेळी मदत करा, गोण खणीज चोरी होत असतांना पथकासोबत पोलिसांना पाठवा,गौण खणीज चोरी करणारे तेच असतात त्यामुळे दुस-या दिवसी पकडा असे बैठकीत सांगीतले तालुकास्तरीय विभाग प्रमुखांचा आढावा घेतला. त्या त्या विभागाच्या योजना व त्यासंबंधी झालेली प्रगती, याचा आढावा घेतला व त्या संदर्भात आपल्या विभागाकडून कशा पद्धतीने नागरिकांना चांगल्या सेवा सुविधा देऊन, चांगल्या प्रकारे काम करता येईल.व प्रत्येक विभागात यशोगाथा तयार होतील याबाबत सूचना केल्या. नैसर्गिक आपत्तीचे अनुदान वाटपाचे माहिती घेतली.बाभुळगाव येथील नगर पंचायत,पंचायत समिती, ग्रामीण रुग्णालय , तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय,पोलीस स्टेशनला भेट देऊन त्यांचा आढावा घेतला. तसेच कोपरा2येथील जानकर कुटुंबाच्या ड्रगन फ्रुट,केळी फळबाग लागवडीची माहिती घेतली. तसेच हातगाव येथील उपसा सिंचन मध्यम प्रकल्प ची पाहणी केली.जिल्हाधिकारी विकास मिना यांनी तहसील कार्यालयात आलेल्या नागरीकांचे म्हणने ऐकुण घेतले. यावेळी तहसीलदार मिरा पागोरे, निवासी नायब तहसीलदार दिलीप बदकी,नायब तहसीलदार सैय्यद यामिण, पोलिस निरीक्षक ,एल डी तावरे, गटविकास अधिकारी उज्वला ढोले, रुतीका डेरे तालुका कृषी अधिकारी,डॉ संघर्ष राठोड तालुका आरोग्य अधिकारी, प्रिती मस्केअभियंता बांधकाम विभाग ,राजेद्र मदारे सहाय्यक निबंधक,पल्लवी सोटे मुख्यकार्यकारी अधिकारी नगरपंचायत ,राजेश दहिकर विज वितरण कंपणी,जी बी मैधने गटशिक्षणाधिकारी ,आशिष जयसिंगपुरे,संदिप केळतकर,उपस्थित होते.

# माऊली पार्क मॉर्निंग ग्रुपतर्फे नक्षीने सरांचा वाढदिवस उत्साहात

## समूहातील मैत्रभाव, एकोप्याचे अनोखे उदाहरण

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - शहरातील वर्धा रोडलगत असलेल्या माऊली पार्क परिसरात दररोज सकाळी एकत्र फिरणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, युवक, शिक्षक, डॉक्टर, व्यावसायिक, शेतकरी अशा विविध क्षेत्रातील नागरिकांनी मिळून तयार केलेला 'माऊली पार्क मॉर्निंग ग्रुप' हा सदैव एकोप्याचा आणि मैत्रीभावाचा आदर्श मानला जातो.

दररोजच्या मॉर्निंग वॉकदरम्यान "गुड मॉर्निंग, नमस्कार, जय श्रीराम" अशा प्रेमळ अभिवादनातून या ग्रुपची सकाळ सुरू होते. शांत, निसर्गमय वातावरणात योगा, व्यायाम आणि चालण्यामुळे मनःशांती व आरोग्य संतुलन हीच या समूहाची खास ओळख आहे. या ग्रुपमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांपासून ते निवृत्त नागरिक, युवक वर्गापर्यंत सर्वांचा समावेश असल्याने आपुलकीचा, एकमेकांशी जोडून ठेवणारा बंध अधिक दृढ झाला आहे. त्याच भावनेतून ग्रुपमधील प्रत्येक सदस्याचा वाढदिवस साजरा करण्याची सुंदर परंपरा येथे पाळली जाते. नक्षीने सरांचा वाढदिवस शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन साजरा १२ डिसेंबर २०२५ रोजी संस्कृती संवर्धन विद्यालय, राळेगाव येथे कार्यरत असलेले शिक्षक राकेश नक्षीने सर यांचा वाढदिवस ग्रुपतर्फे अतिशय आनंदी आणि स्नेहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. छोटेखानी कार्यक्रमात नक्षीने सरांना शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी कुबडे सर आणि शेरकी सरांनी नक्षीने सरांच्या अभ्यासू, मनमिळाऊ आणि होतकरू स्वभावाविषयी मनोगत व्यक्त केले. ग्रुपमधील सर्व सदस्यांनी शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांचा वाढदिवस अधिक खास बनवला. ग्रुपचे मान्यवर सदस्य उत्स्फूर्त उपस्थित या वाढदिवस कार्यक्रमाला दोडीवार सर, वैद्य साहेब, माकोडे सर, यादव, विठ्ठलराव माकोडे, बोडीवार, बोरकुटे, पाटील, खेरडे, तिजारे, वाकडे, कुबडे, ठाकरे, डॉ. कोकरे, शेरकी, सातारकर, उपासे, मडावी, महल्ले, झोपये, तेलंगे, गवळी, राऊत, कुठे, शेडमाके, उगवे सर आदी सदस्य उपस्थित होते. माऊली पार्क मॉर्निंग ग्रुपची एकमेकांशी जोडणारी ही सकारात्मक परंपरा समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# अनधिकृत मोटर ड्रायव्हिंग स्कूलवर कारवाईची मागणी

## महागाव तालुक्यातील जनतेची फसवणूक ; आरटीओकडे तक्रार

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव : महागाव तालुक्यात "महाराष्ट्र मोटर ड्रायव्हिंग स्कूल" या नावाने अनाधिकृतरीत्या ड्रायव्हिंग स्कूल चालवून नागरिकांची फसवणूक होत असल्याचा गंभीर आरोप करत संबंधित ड्रायव्हिंग स्कूलची तात्काळ चौकशी करून बंद करण्याची मागणी माननीय उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ यांच्याकडे करण्यात आली आहे.

या संदर्भात शे. रजीक शे. युनुस व वसीम खॉ. हाफीत खॉं पठाण (रा. वाकोडी, ता. महागाव, जि. यवतमाळ) यांनी लेखी तक्रार सादर केली आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, महाराष्ट्र मोटर ड्रायव्हिंग स्कूल या नावाचे बॅनर व फलक लावून कोणतेही अधिकृत नोंदणी नसताना खोटे प्रशिक्षण दिले जात असून, प्रशिक्षणासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांवर देखील ड्रायव्हिंग स्कूलचे नाव लावून खुलेआम शासनाची दिशाभूल केली जात आहे. हा प्रकार गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असून, त्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप आहे. तक्रारीत पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, एस.सी. व एस.टी. प्रवर्गासाठी शासनाने राबविलेल्या मोफत प्रशिक्षण व ड्रायव्हिंग लायसन्स योजनेचा गैरफायदा घेण्यात आला. सिव्हिल ठेकेदार गुट्टे पाटील यांच्या नावाने टेंडर दाखवून बोगस प्रवेश (ॲडमिशन) दाखवण्यात आले असून, ड्रायव्हिंग स्कूलचे कोणतेही अधिकृत रजिस्ट्रेशन नसताना "नॅशनल ड्रायव्हिंग स्कूल" या नावाने प्रशिक्षणार्थी व लायसन्ससाठी बिल काढून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय, सध्या महागाव तालुक्यात आजम खान आयुब खान पठाण हे महाराष्ट्र मोटर ड्रायव्हिंग स्कूलचे बॅनर व पोस्टर लावून गोरगरीब जनतेची आर्थिक लूट करत असल्याचा आरोप तक्रारीत आहे. तसेच "किसान मोटर ड्रायव्हिंग स्कूल, श्रीरामपूर" या नावाने परवानगी घेतलेल्या संस्थेनेही नोंदणीसाठी बोगस कागदपत्रे सादर केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या स्कूलमध्ये प्रशिक्षक म्हणून दाखविण्यात आलेल्या आजहर खा अहमद खान पठाण याच्यावर तेलंगणातील बेला पोस्ट येथे विविध गुन्हे दाखल असल्याचे नमूद करत, त्याचे कॅरेक्टर सर्टिफिकेट बोगस पद्धतीने तयार करून परवानगी मिळविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधित अनधिकृत मोटर ड्रायव्हिंग स्कूल तात्काळ बंद करण्यात यावीत व दोषींवर भारतीय दंड संहितेच्या कलम 420 अन्वये गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी जोरदार मागणी अर्जदारांनी केली आहे.

# रेमंड युको डेनिम प्रा. ली. यवतमाळ येथे भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : रेमंड युको डेनिम प्रायव्हेट लिमिटेड, यवतमाळ येथे दिनांक 11 डिसेंबर 2025 रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक दायित्वाची जाण ठेवत आयोजित या शिबिरामध्ये तब्बल 129 रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मानवसेवेत मोलाचे योगदान दिले.

रेमंड युको डेनिम हे उद्योगसंस्थान यवतमाळ जिल्ह्यातील हजारो नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देत असून, सामाजिक उत्तरदायित्वाच्या उपक्रमांतही अग्रणी आहे. दर चार महिन्यांनी आयोजित होणाऱ्या रक्तदान शिबिरातून येथील शासकीय रुग्णालयातील थॅलेसेमिया, सिकलसेल, प्रसूती तसेच अपघातग्रस्त रुग्णांसाठी अपेक्षित रक्ताची गरज मोठ्या प्रमाणात भागवली जाते. या शिबिराचे उद्घाटन कंपनीचे सीईओ समीर गरडे आणि डब्ल्यू.डी. नितीन श्रीवास्तव यांच्या हस्ते करण्यात आले. निस्वार्थ सेवा फाऊंडेशन, एचडीएफसी बँक आणि रेमंड युको डेनिम यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. शिबिराच्या यशस्वीतेसाठी रेमंड युको डेनिमचे श्री. चांडक सर, बिपीन मोहने, सारंग ठाकरे, जयवीर राठोड, मयूर काळे, नीलेश कोरे, निलेश जगताप यांसह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. निस्वार्थ सेवा फाउंडेशनतर्फे परशुराम कडू, अनिकेत नवरे, ईश्वर एरके, आस्तेश गावंडे आणि संपूर्ण टीमचे मोलाचे योगदान लाभले. तसेच मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षाचे जिल्हा समन्वयक अनिल पिसे यांनीही विशेष परिश्रम घेतले. रक्तसंकलनासाठी वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयाचे रक्तसंकलन पथक आणि रक्तपेढीतील समाजसेवक आशिष दहापुते यांचे योगदान उल्लेखनीय ठरले. या उपक्रमामुळे समाजात रक्तदानाबाबत जागृती निर्माण झाली असून, गरजू रुग्णांना दिलासा मिळणार आहे.

# मोकाट जनावरे व भटक्या कुत्र्यांचा धुमाकूळ नागरिकांनी मुख्याधिका-यांकडे धाव घेतली

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - प्रभाग क्र. 27 मधील रेनबो इंग्लिश मिडियम स्कूल परिसर, गुरुदेव नगर, आनंद नगर, लक्ष्मी नगर, महानंदा नगर, प्रेरणा नगर, शिरे लेआऊट तसेच इतर वसाहतींमध्ये मोकाट जनावरे आणि भटक्या कुत्र्यांच्या संख्येत झालेल्या वाढीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. परिसरातील पालक वर्ग आणि रहिवाशांनी या गंभीर समस्येबाबत नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवली आहे.

अलीकडेच मोकाट जनावरांच्या टक्करामुळे एक गंभीर अपघात घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक यांना रस्त्यारस्त्यावर हालचाल करणे कठीण झाले आहे. अनेक ठिकाणी ही जनावरे रस्त्यात झोपून वाहतूकही विस्कळीत होत असल्याची तक्रार आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते दिनेश हरणे यांनी परिसरातील नागरिकांसह नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन परिस्थितीची सविस्तर माहिती दिली. गंभीर स्थितीची दखल घेत मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित विभागाला तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले असून लवकरच परिस्थिती सुधारेल, असे आश्वासन दिले. या भेटीदरम्यान रेनबो इंग्लिश मिडीयम स्कूलच्या संस्थापक जयश्री गोळे, प्राचार्या स्वीटी अमर दावडा, वैभव रामचंद्रराव पेठकर, मंजुषा राहुल पांडे, रश्मीता राहुल पांडे तसेच विविध वॉर्डमधील नागरिक उपस्थित होते.

# राळेगाव नगरपंचायतीच्या करवाढी विरोधात शिवसेनेचा आक्षेप ; आंदोलनाची चेतावणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव – नगरपंचायत राळेगावने सन 2025-26 ते 2028-29 या कालावधीसाठी प्रस्तावित केलेल्या करवाढीविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने तीव्र आक्षेप नोंदविला आहे. शहर प्रमुख शंकर गायधने यांच्या नेतृत्वाखाली महिला आघाडी व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत मुख्याधिकारी शिरीष पारेकर यांना निवेदन देण्यात आले. नगरपंचायतीने चतुर्थ वार्षिक कर मूल्यांकनात महाराष्ट्र शिक्षण कर, उपयोगिता कर, वृक्ष कर, अग्निशमन कर, रोजगार हमी उपकर आदी करांमध्ये मोठी वाढ प्रस्तावित केली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कष्टकरी कुटुंबांची संख्या मोठी असताना ही करवाढ अन्यायकारक असल्याचा आरोप शिवसेनेने केला. उपयोगिता शुल्काच्या वाढीत टिन पत्र्यात सरकारी जागेवर राहणारे आणि कोटी रुपयांच्या घरात राहणारे नागरिक यांना समान श्रेणीत शुल्क लावण्यात आल्याचेही निवेदनात नमूद आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी नगरपंचायतीकडे आवश्यक साधने व मनुष्यबळ असतानाही कोट्यवधी रुपये कंत्राटदारांवर खर्च का केला जातो, असा प्रश्न शिवसेनेकडून उपस्थित करण्यात आला. शिक्षण कर व उपयोगिता शुल्कातील प्रस्तावित वाढ तत्काळ मागे घ्यावी, अन्यथा मोठ्या आंदोलनाचा इशारा देण्यात आला. या निवेदनावर मीना गायधने, मारुती राऊत, महादेव लांबाडे, प्रभाकर धोटे, तातेश्वर पिसे, देवानंद पांडव, लक्ष्मण डाखोरे, नरेंद्र आटे, दिलीपराव दुधे, सुनील वागदे, नामदेव शेलवटे, ईश्वर कावळे यांसह अनेक शिवसैनिकांनी स्वाक्षऱ्या केल्या.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### डॉ.नीता कचवे यांना राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार



**अमरावती-**अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री शिवाजी मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार यांच्या वतीने प्रदान केले जाणाऱ्या मानाच्या छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार-२०२५ मध्ये ॲड. डॉ. नीता प्रफुल्ल कचवे यांच्या 'छोट्या छोट्या गोष्टी जगण्याची देते दृष्टी' या बालसाहित्यकृतीची निवड विशेष राज्य साहित्य पुरस्कारासाठी करण्यात आली आहे.छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त २५ डिसेंबर रोजी आयोजित पुरस्कार सोहळ्यात हा मानाचा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. या पुरस्काराची घोषणा पुरस्कार निवड समितीचे कार्यकारी समन्वयक प्रा. गणेश भगत यांनी केली.बालमानस, मूल्यशिक्षण आणि जीवनदृष्टी या तिन्हींचा संतुलित संगम साधत समाजात संवेदनशीलता जागवणारे साहित्य निर्माण केल्याबद्दल ॲड. डॉ. कचवे यांच्या कार्याला हा पुरस्कार बहाल करण्यात आला असून त्यांच्या साहित्यकृतीतील आशय, भाषिक सौष्ठव आणि जीवनस्पर्शी कथनशैलीचे निवड समितीने विशेष कौतुक केले.

### 'फुलमाळ' परिचय पुस्तिकेचे विमोचन




**अमरावती-**येथील माळी समाज बहुउदेशीय संस्था महाराष्ट्र व सावता परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने माळी समाजाचे १३ वे राज्यस्तरीय परिचय संमेलन रविवार १४ डिसेंबर रोजी माळी बोर्डिंग मुधोळकर पेठ अमरावती येथे सकाळी ११ ते ४ पर्यंत आयोजित करण्यात आले आहे. सदरील परिचय संमेलनात उपस्थित मान्यवर यांचे हस्ते 'फुलमाळ' या परिचय पुस्तिकेचे विमोचन होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक सागर बनकर,उदघाटक म्हणून कल्याण आखाडे, स्वागताध्यक्ष म्हणून माळी समाज बहू.संस्थेचे उपाध्यक्ष गणेश काटवले,तर विशेष अतिथी म्हणून आमदार सुलभा खोडके,आमदार संजय खोडके, आमदार रवि राणा, जेष्ठ विधीतज्ञ प्रशांत देशपांडे उपस्थित राहतील.सदरील परिचय संमेलनात उप वर युवक युवती यांचे परिचय सत्र होणार असून माळी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या समाज बांधव यांचा सत्कार व सन्मान होईल.



### चंद्रदीप सोनटक्के यांचा सत्कार

**मोर्शी-**महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून परीक्षेत येथील रेल्वे वसाहतीतील चंद्रदीप सोनटक्के हा उत्तीर्ण झाला असून मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी म्हणून चंद्रदीप सोनटक्के वर्णी लागणार आहे. चंद्रदीपने मोठे यश संपादन केल्यामुळे मोर्शी येथील पत्रकार बांधवांच्या वतीने रेल्वे स्टेशन येथील त्यांच्या कार्यालयात जाऊन पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला होता. यावेळी येथील ज्येष्ठ पत्रकार अजय पाटील, संजय गारपवार, गजानन हिरुळकर, देवल कुरवाडे, स्टेशन मास्तर विजय गुप्ता तसेच पवन कुमार प्रामुख्याने शेतकऱ्याच्या वेळी उपस्थित होते.



### आरोग्य तपासणी शिबीर

**अमरावती-**विद्यानिकेतन शिक्षण संस्थेद्वारा संचालित, विद्यानिकेतन प्राथमिक शाळा,रामनगर येथे विद्यार्थी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉ. हेडगेवार हॉस्पिटल यांच्या सौजन्याने आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले.शाळेतील नर्सरी ते वर्ग सातवी पर्यंतच्या एकूण ३१५ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. प्रसंगी बालरोग तज्ञ डॉ. बनसोड व डॉ. घोडेस्वार यांनी आरोग्य तपासणी केली. यावेळी आ.अनिता कुलकर्णी व त्यांच्या संपूर्ण टीमने सहकार्य केले.जेष्ठ कार्यकर्त्या कुलकर्णी यांना शाळेतील विद्यार्थ्यांशी, आरोग्याच्या संदर्भात प्रभावी संवाद साधला.मुख्या.देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या. शाळेतर्फे हॉस्पिटलला देणगी व तज्ञांना ग्रामगीता भेट दिली.शाळेतील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक वर्ग व विद्यार्थी यांच्या सहकार्याने शिबीर यशस्वीरित्या पार पडले.

# कवायतीच्या सरावाची कसरत

## शिक्षण विभागाच्या आदेशातील विद्यार्थी-शिक्षक प्रमाणावर प्रश्न

**अमरावती/का.प्र.**

प्रजासत्ताक दिनासाठी (२६ जानेवारी) करायच्या कवायतीच्या सरावासाठी दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक नेमण्याची सूचना शिक्षण विभागाने केली आहे. मात्र, मात्र, संचमान्यतेमध्ये क्रीडा शिक्षकाचे पद नाही, तसेच ६० विद्यार्थ्यांपर्यंत दोनच शिक्षक मंजूर असल्याने दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक कसा देता येणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मात्र, दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक हे केवळ उदाहरणादाखल नमूद केले असल्याचे स्पष्टीकरण शिक्षण विभागाने दिले आहे.

राज्यातील शासकीय आणि खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत संचलन कार्यक्रम करण्याचा आदेश शिक्षण विभागाने दिला आहे. त्यात कवायत संचलनाच्या विद्यार्थी सरावासाठी दर दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक मार्गदर्शनासाठी नेमण्याची सूचना देण्यात आली आहे. 'विद्यार्थ्यांचा दर शुक्रवारी आणि शनिवारी सराव करण्यासाठी शाळेतील कवायत निर्देशकाची (शारीरिक शिक्षण शिक्षक, क्रीडा शिक्षक, एनसीसीचे विद्यार्थी किंवा इतर शिक्षक) मदत घ्यावी, प्रत्येक दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक मार्गदर्शनासाठी नेमावा,' असे या संदर्भातील परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे म्हणाले,'जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये संचमान्यतेनुसार ६० विद्यार्थ्यांमागे दोन, त्यानंतर २० विद्यार्थ्यांना अधिक एक असे शिक्षकांचे प्रमाण आहे,



तर उच्च प्राथमिक वर्गात सहावी, सातवीसाठी ७० विद्यार्थ्यांपर्यंत दोन शिक्षक आहेत. राज्यात स्वातंत्र्यदिनी सामूहिक कवायत संचलनाचा उपक्रम राबवण्यात आला होता. त्यानंतर आता प्रजासत्ताकदिनीही हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. त्याबाबत प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी संयुक्त परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त, आरोग्य-व्यायामाबाबत प्रेरित करण्याच्या उद्देशाने सामूहिक कवायत संचलनाचा उपक्रम राबवण्यात येणार असल्याचे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

> विद्यार्थ्यांची सुरक्षितता, कवायत संचलनामध्ये एकवाक्यता राहण्यासाठी शिक्षक नियुक्त करणे आवश्यक आहे. दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक हे उदाहरणादाखल आहे. कवायत संचलनासाठी मोठ्या विद्यार्थ्यांचीही मदत घेता येऊ शकते.
>
> **शरद गोसावी,** प्राथमिक शिक्षण संचालक

## 'स्वाधार' योजनेतील त्रृटी पूर्ण करण्यासाठी १९ डिसेंबरपर्यंत मुदत

**अमरावती-**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२३-२४ आणि २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या, परंतु कागदपत्रांतील त्रुटींमुळे कार्यालयाच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी १९ डिसेंबरपर्यंत त्रृटी पूर्ण कराव्यात असे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे. या प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित आहेत, त्यांनी आवश्यक कागदपत्रे कार्यालयात संबंधित शाखेकडे जमा करावीत. या मुदतीत त्रुटी पूर्ण न केल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी, विद्यार्थ्यांची राहील. याबाबत अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालयाशी किंवा दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१२६१ वर संपर्क साधावा, असे आवाहन समाज केले आहे.

## टाकळी येथिल जिवघेणे गतीरोधक त्वरित हटवा



**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूर शहरापासून १० किमी अंतरावर असणाऱ्या टाकळी येथिल जिवघेणे गतीरोधक त्वरित हटविण्यात यावे अन्यथा जनआंदोलन करण्यात येईल असा इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नागरिक हक्क संरक्षण समितीने निवेदनाद्वारे दिला आहे. दर्यापूर मूर्तिजापूर सिमेवरील शेवटचे गाव असलेले टाकळी हे सार्वजनिक बांधकाम विभाग दर्यापूरच्या अखत्यारित येत असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे टाकळी येथिल गतीरोधक हे भविष्यात अपघात प्रणव स्थळ ठरणार आहे. अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिवघेणे गतीरोधक त्वरित हटविण्यात येऊन समतोल गतीरोधक बसविण्यात यावे अशा मागणीचे निवेदन नागरिक हक्क संरक्षण समितीच्या वतीने उपविभागिय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग दर्यापूर यांना देण्यात आले. निवेदन देतेवेळी नागरिक हक्क समितीचे अध्यक्ष तथा जेष्ठ विधिज्ञ ॲड. संतोष कोल्हे सचिव, जेष्ठ पत्रकार शरद रोहनकर व समितीचे सदस्य पंकज अनासाने, धम्मशिव मेश्राम, राजेश विल्हेकर, उत्तम हरसुलकर आणि टाकळी येथिल नागरिक उपस्थित होते.

## साईबाबा विद्यालयात क्रीडा महोत्सव

**अमरावती/का.प्र.**




श्री साईबाबा विद्यालय, साईनगर येथे क्रीडा उत्सव पार पडला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजेश टावरी होते. त्यांनी यावेळी मार्गदर्शन केले. उद्घाटन डॉ. नितीन चवाळे हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापिका नायगावकर, इंदिराबाई पालेकर शाळेचे मुख्याध्यापक सांगोळकर, शाळेचे पर्यवेक्षक आशिष पसारकर, तसेच शाळेचे माजी शिक्षक उताणे आणि भगत उपस्थित होते.प्रास्ताविक क्रीडा शिक्षक मानकर यांनी केले. त्यांनी क्रीडा उत्सवाचे महत्त्व, उद्दिष्टे आणि स्पर्धांचे स्वरूप उपस्थितांना सविस्तर समजावून सांगितले. क्रीडाज्योत प्रज्वलन झाल्यानंतर महोत्सवाची सुरुवात झाली. यामध्ये-क्रिकेट, कबड्डी, हॉलीबॉल, बॅडमिंटन, बुद्धिबळ, टनिक्काईट लंगडी, खो-खो, यांसारख्या अनेक रोमांचक क्रीडा स्पर्धांचा समावेश होता. दुसऱ्या दिवशी विविध स्पर्धांचे अंतिम सामने पार पडले. विद्यार्थ्यांच्या जयजयकारांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. स्पर्धांचे नियोजन, पंचांची काटेकोरता आणि विद्यार्थ्यांची खेळातील नितीमत्ता हे विशेष उल्लेखनीय राहिले. कार्यक्रमाचा समारोप पारितोषिक वितरण समारंभाने झाला. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे, पदके आणि ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. उत्सवाच्या यशामागे शाळेचे शिक्षकवृंद, क्रीडा शिक्षक मानकर तसेच सर्व विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन आणि सहकार्य करणारे सर्व कर्मचारी यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

# तालुक्यातील पांदण रस्त्यांना भ्रष्टाचाराचे ग्रहण

## १ किलोमीटरचे मातीकाम करून काढले २ किलोमीटर रस्त्याचे बिल

**चांदूरबाजार/वार्ताहर**

जिल्ह्यात अंदाजे ८ वर्षा पूर्वी मोठा गाजावाजा करून , पालकमंत्री पांदण रस्त्यांना सुरुवात करण्यात आली. जिल्हाभरात पांदण रस्त्यांना धडाक्यात सुरुवात करण्यात आली.काही तालुक्यात या योजने अंतर्गत चांगली कामे झालीत. काही तालुक्यात या योजनेला भ्रष्टाचाराचे ग्रहण लागले.सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदाराचे संगनमताने,पांदण रस्त्यांचे काम अर्धवट करून पूर्ण कामाचे बिल काढले. पांदण रस्त्यांचे बाबतीत असा प्रकार , चांदूरबाजार तालुक्यात ही घडला आहे.

२०२२ मध्ये परसोडा - दूर्गवाडा- बेसखेडा, या शिवरस्त्याचे दोन किलोमीटर पांदण रस्त्याला प्रशासकीय मंजूला देण्यात आली होती. सदर कामाला उपविभागीय अधिकारी अचलपूर यांनी प्रशासकीय मंजूरात दिली होती.या दोन किलोमीटर रस्त्याचे माती कामासाठी, रोजगार हमी योजने अंतर्गत अंदाजे २ लाख ३४ हजार रुपये मंजूर करण्यात आले होते.२०२३ मध्ये या शिव रस्त्याचे मातीकाम करण्यात आले. मात्र या रस्त्याचे १ किलोमीटर मातीकाम करून, उर्वरीत १ किलोमीटर मातीकाम रस्ता अडविल्याची सबब सांगून बांधकाम विभागाने सोडून दिले.याच ठिकाणी रस्त्याचे बांधकामात खारे पाणी मुरले.कारण लगेच पावसाळा सुरू होणार होता.शिव रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत शेतकऱ्यांना बांधकाम विभागाला विनंती केली. पावसाळा सुरू होत असल्या काम पूर्ण होणार नाही. तेव्हा पावसाळ्यानंतर काम पूर्ण करू.असे आश्वासन शेतकऱ्यांना देण्यात आले.पावसाळ्याचे चार महिन्यांचे कालावधीत, सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित कंत्राटदाराने आपले चांगभले करून घेतले.कागदोपत्री या रस्त्याचे मातीकाम २ किलोमीटर पूर्ण झाल्याचे दाखवून,अर्धवट माती कामाचे कंत्राटदाराचे नावे पूर्ण बिल काढले.प्राप्त माहिता नुसार या रस्त्याचे कामात,२ लाख ३० हजार रूपयांचे बिल काढण्यात आले आहे.सध्या या रस्त्याचे १ किलोमीटर माती कामासाठी,फक्त चार हजार रुपये एवढाच निधी शिल्लक आहे.त्यामुळे १ किलोमीटर रस्त्याचे माती कामाचा निधी, पावसाळ्यात वाहून गेल्याचे स्पष्ट होते.

मागिल दिड वर्षापासून माहितीच्या अधिकारात माहिती देण्यास, स्थानिक सार्वजनिक बांधकाम विभाग व त्यांचे वरिष्ठ कार्यालय अचलपूर येथून ही टाळाटाळ करण्यात येत आहे.या दरम्यान शेतकऱ्यांनी खा.डॉ.अनिल बोंडे व स्थानिक आमदार प्रवीण तायडे,यांचे कडे ही लेखी तक्रारी केल्या.मात्र अद्यापही सदर शिव रस्ता पूर्ण झाला नाही.

> या शिव रस्त्याचे कामाची पूर्ण माहिती घेतो. त्यानंतर महसूल विभागाने शिव रस्त्याची आखणी करून दिल्यास, रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल.
>
> **अभयकुमार बारब्दे,** प्रभारी उपविभागीय अभियंता, सा.बा.विभाग चांदूरबाजार

> सदर शिव रस्त्याची आखणी महसूल व भूमीलेख विभागाने, संयुक्त रित्या दोन वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाला करून दिली आहे.त्यानुसार काम पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांचेवर आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत पुन्हा पत्र दिल्यास,त्यांना कामासाठी शिव रस्त्याची आखणी करून देण्यात येईल.
>
> **सोनल सुर्यवंशी,** तहसीलदार, चांदूरबाजार

> सदर अपूर्ण रस्ता पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागासह लोकप्रतिनीधी व इतर विभागांनाही अर्ज विनंत्या केल्यात.कोठूनच सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही.तेव्हा आमरण उपोषणाची नोटीस दिली.त्यावेळी रस्त्याचे काम तर सोडाच,उलट पोलिसांचा ससेमीरा लागला.यावरून पांदण रस्त्यांचे बाबतीत,शासनाच्या फक्त वाल्गनाच आहेत.हे स्पष्ट होते.
>
> **सुधीर काकडे,** शेतकरी,बेसखेडा.

> शिव रस्त्याचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, तहसील कार्यालय यांचे कडे वारंवार लेखी निवेदन दिलीत.माहितीच्या अधिकारात माहिती मागितली.मात्र सर्वच ठिकाणी टोलवाटोलवीचीच उत्तरे मिळाली.आता सोमवार १५ डिसेंबरला सर्व शेतकरी तालुक्यातील सर्व पांदण रस्त्याची एस आय टी चौकशी करण्यांत यावी.या बाबतचे निवेदन देणार आहोत.
>
> **सुधीर खुळे,** शेतकरी,बोराळा(दुर्गवाडा)

## विभागीय आयुक्तांची जाणल्या पानपिंपरी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**



विभागीय आयुक्त डॉ.श्वेता सिंघल यांचा शासकीय दौरा अंजनगाव सुर्जी तालुक्यात असतांना स्थानीक पत्रकारांशी संवाद साधतांना शेती वानाविषयी चर्चा केली. यावेळी त्यांना कपाशी,तूर,सोयाबीन या पारंपारीक पीकासह केळी आणि पानपिंपरी पीकांबद्दल माहीती दिली.यावेळी आयुक्त श्वेता सिंघल यांना नेले असता त्यांनी महीला शेतकरी शारदा ताडे यांचेसोबत पानपिंपरी पिकांबद्दल संवाद साधून संपुर्ण माहीती जाणून घेतली. महीला शेतकरी शारदा ताडे यांनी जेव्हा पानपिंपरीची रोगामुळे वाळलेली वेल दाखविली.

यावेळी आयुक्तांनी केळी उत्पादक शेतक-यांचीही व्यथा त्यांनी स्वतः शेतात जाऊन ऐकुन घेतली.यावर्षी केळीला भाव नसल्याने शेतक-याने केळी पाडून गहू पेरल्याचे सांगीतल्यावर त्यांनी खेद व्यक्त केला. यावेळी शेतकरी शारदा ताडे, सुलचना माकोडे,गोपाल माकोडे,गजानन माकोडे,प्रतीक्षा माकोडे,मच्छिद्र येऊल या शेतक-यांना आश्चर्य वाटले आणि त्यांनी जातांना आपल्या शेतातील हेट्याची फुले आयुक्तांना देऊन त्यांचा सन्मान केला हे विषेश.

## अंजनगाव बारी बीटस्तरीय क्रीडा महोत्सव उत्साहात

**अमरावती/का.प्र.**



शिक्षण विभाग अमरावती पंचायत समिती अंतर्गत अंजनगाव बारी बिटस्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सव सुकळी येथील पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या प्रांगणात गुरुवारी उत्साहात झाला. या क्रीडा महोत्सवात चार केंद्रातील सुमारे तीनशे खेळाडूंनी सांघिक व वैक्तिक खेळात सहभाग नोंदविला. निदर्शने व सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला.

महोत्सवाचे उदघाटन गटशिक्षणाधिकारी संदिप बोडखे यांनी केले. अध्यक्षस्थानी सरपंच राजू गजभिये होते. प्रमुख उपस्थिती उपसरपंच मुकुंद लोणारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गुणवंत बोरकर, संजय जवळकर,मंगला खरड,अन्नपूर्णा मोटघरे, सौ. बबली कुशवाहा, अंजु कुशवाहा,संतोष मोटघरे, जयमाला पाटील आदींची होती.यावेळी सर्व मान्यवरांचे रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. यादरम्यान अनेकांची समायोचित भाषणे झाली. यावेळी खेळाडू व पंच, शिक्षक व अधिकारी यांना सारिका शिरपूरे यांनी शपथ दिली. क्रीडा महोत्सवादरम्यान कबड्डी, खो -खो, व्होलीबॉल, लंगडी आदिसाह विविध सांघिक तर, बॅडमिंटन, टेनिकवाईट, लांब उडी, उंच उडी, रिले, धावणे आदी वयक्तिक स्पर्धा उत्साहात झाल्या.उद्घाटनीय कबड्डीचा सामना सुकळी विरुद्ध मोगरा या संघात झाला.यामध्ये सुकळी संघ विजयी झाला.यावेळी आयडॉल शिक्षक तेजश्री निकम यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच आदर्श शिक्षिका इंदिरा रेवस्कर, शीतल देशमुख यांचादेखील सत्कार करण्यात आला.सांस्कृतिक कार्यक्रमात व निदर्शनात सुकळी, अंजनगाव बारी, बोरगाव धर्माळे व मलकापूर केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोगरा, सुकळी, मलकापूर, काटआमला, पिंपळखुटा, भानखेडा, वनारसी, अंजनगाव बारी, बोरगाव धर्माळे या शाळांनी सहभाग नोंदविला. यावेळी चिमुकल्यांच्या कलाविष्काराला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परीक्षक म्हणून रोशनी कडू व अश्विनी देशमुख यांनी काम पाहिले. प्रास्ताविक शिक्षण विस्तार अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी संदिप बोडखे संचालन रुपाली काळे व ज्योत्स्ना गुल्हाने यांनी केले. आभार मुख्याध्यापक निखिल सवाई यांनी मानले. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी केंद्रप्रमुख मोहन जाधव, संजय कोकाटे, सुमती देखणे, स्मृती बाबरेकर यांच्या मार्गदर्शनात मुख्याध्यापक निखिल सवाई, गणेश ठाकरे, विनायक लकडे, संजय थोरात, शकीला कुरेशी पटेल,सविता शिरभाते, सारिका शिरपूरे, रुपाली काळे, रश्मी खाडे यांच्यासह दिंगाबर ठाकरे, सतीश डोंगरे, नईम खान, शापोआच्या जया राऊत, शिला बाहेकर, आशा बोरकर आदिनी परिश्रम घेतले.महोत्सवाला विविध शाळेतील विद्यार्थी-खेळाडू व शिक्षक, मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख उपस्थित होते.

# कोट्यवधींचा खर्च करूनही आदिवासी भागात कुपोषण ‘जैसे थे’

## मेळघाटातील बाल-मातमृत्यू,कुपोषणमुक्तीवर आ.संजय खोडके यांची हिवाळी अधिवेशनात चर्चा

**नागपूर/वार्ताहर**

राज्यातील कुपोषणग्रस्त जिल्ह्यांमध्ये बालमृत्यू,मातामृत्यू रोखण्यासाठी व हे जिल्हे कुपोषण मुक्त करण्यासाठी शासनाच्या वतीने कोट्यावधींचा निधी खर्च करूनही कुपोषणाची समस्या ‘जैसे थे’आहे. जिल्ह्यातील मेळघाट भागात तर कुपोषणाचा वाढता आलेख चिंतेची बाब असून तेथे कार्यरत यंत्रणा कुचकामी ठरतांना दिसत आहे. शासनानेही याबाबत चिंता व्यक्त केली असली तरी मेळघाटात जो काही अनागोंदी कारभार सुरु आहे,याला आळा बसण्यासाठी शासनाने लक्ष



घालण्याची नितांत गरज असून आरोग्य विभाग,महिला व बालविकास विभाग तसेच आदिवासी विभागाने संयुक्त बैठक घेऊन उपाययोजना राबविण्याची सुचना आ. संजय खोडके यांनी केली.

नागपूर हिवाळी अधिवेशनात विधान परिषदेच्या कामकाजामध्ये कुपोषण निर्मूलनाच्या संदर्भातील अर्धातास चर्चेमध्ये आ. संजय खोडके यांनी सहभागी होऊन अमरावती जिल्ह्यातील मेळघाटमधील कुपोषण तसेच बालमृत्यू व मातामृत्यू संदर्भातील विदारक परिस्थिती संदर्भात शासनाचे लक्ष वेधले.यासाठी एका माहितीचा अधिकारातून आलेल्या अहवालाचा हवाला देत आ.संजय खोडके म्हणाले की, राज्यात वर्ष २०२० पासून बालमृत्यू हे ८४ हजार ३०४ एवढे झाले. गर्भामध्ये मृत्यू ७० हजार ४५४ तसेच माता मृत्यू ६,५७४ इतके झाले आहेत.जिल्ह्यातील मेळघाट भागात यावर्षी एप्रिल ते ऑक्टोबर महिन्याच्या कालावधीमध्ये बालमृत्यू ९७, गर्भातील मृत्यू ३० तसेच मातामृत्यू ३ इतके झाले आहेत.

मेळघाटातील कुपोषणमुक्तीसाठी प्रभावी उपयोजना करण्यासाठी आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग तसेच आदिवासी विकास विभाग यांनी खऱ्या अर्थाने एकत्रितपणे प्रभावी काम करण्याची गरज आहे. यासाठी शासनाने सर्व यंत्रणांची संयुक्त बैठक लावून कुपोषण मुक्ती संदर्भात ठोस पाऊले उचलण्याची नितांत गरज असल्याचे आ. संजय खोडके यांनी अधिवेशनात म्हटले आहे.कुपोषण निर्मुलनासाठी शासनाने आतापर्यंत १३ ते १५ समित्या नेमल्या. त्यामुळे आयपीएस अधिकारी असेलेले डोरजे यांची जी समिती होती, त्या समितीने चांगला अभ्यास करून एक हजार पानांचा अहवाल दिला होता. त्याची अंमलबजावणी जर आज खऱ्या अर्थाने झाली असती तर आपण बऱ्यापैकी कुपोषणावर मात करू शकलो,असल्याचे सुद्धा आमदार संजय खोडके यांनी विधान परिषदेत बोलतांना सांगितले.

# कुपोषणामुळे एकाही बालकाचा मृत्यू होऊ नये यासाठी शासन प्रयत्नशील-अदिती तटकरे

**नागपूर**-राज्यात तीव्र कुपोषित बालकांची संख्या २०१९-२० मधील २४६ वरून २०२५-२६ मध्ये ९७ पर्यंत खाली आले आहे. एकाही बालकाचा कुपोषणामुळे मृत्यू होऊ नये यासाठी शासन प्रयत्नशील असून महिला व बालविकास, आरोग्य, आदिवासी विकास या संबंधित विभागांची टीम तयार करण्यात येईल, असे महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधान परिषदेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात सांगितले.



सदस्य उमा खापरे यांनी कुपोषणामुळे बालकांच्या होणाऱ्या मृत्यूसंदर्भात चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य सर्वश्री संजय खोपडे, प्रवीण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ यांनी सहभाग घेतला.मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या, तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण २०२४ मधील ०.७९ टक्क्यांच्या तुलनेत २०२५ मध्ये ०.४१ इतके कमी झाले आहे. मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमामध्ये देखील कुपोषण मुक्तीला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.या चर्चेला उत्तर देताना राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर म्हणाल्या, स्वस्थ माता, सशक्त बालक जन्माला यावेत यासाठी शासनामार्फत विविध प्रयत्न करण्यात येतात. दुर्गम भागात विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. रुग्णालयांमध्ये चांगल्या सुविधा दिल्या जातात. स्वच्छतागृहे चांगली केली जात आहेत. सर्व प्रसूती रुग्णालयातच व्हाव्यात यासाठी समुपदेशन करण्यात येत आहे. आयसीडीएस मार्फत राज्यात ४२,६०२ गरोदर माता आणि बालकांना पोषण आहाराचा लाभ दिला जातो. तथापि, राज्यात बालकांचे मृत्यू केवळ कुपोषणामुळे होत नसून त्यासाठी विविध कारणे असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

# आज प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा विधान भवनावर धडक महामोर्चा

**अमरावती/का.प्र.**

प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा विधान भवनावर धडक महामोर्चा शनिवार १३ डिसेंबर रोजी बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेने आयोजित केला आहे.

महाराष्ट्रील हजारो प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र धारक सुशिक्षित बेरोजगार व सर्व सामान्य प्रकल्पग्रस्त शेतकरी नागपूरच्या हिवाळी अधिवेशना दरम्यान विधानभवनावर धडकणार आहेत. प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र धारकांचे नोकरीतील समांतर आरक्षण ५टक्केवरून १५ टक्के करण्यात यावे, मृद व जलसंधारण विभागाने सरळ खरेदीधारक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच लाख रुपये सानुग्रह अनुदान मंजूर करून तसे परिपत्रक निर्गमित करावे, कृषी विद्यापीठांप्रमाणे जलसंपदा मृद व जलसंधारण विभागात प्रकल्पग्रस्तांसाठी उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ५०टक्के जागा राखीव ठेवून त्यांची विशेष भरती काढण्यात यावी. सरळ खरेदीधारक शेतकऱ्यांना मंजूर झालेले हेक्टरी पाच लाख रुपये सानुग्रह अनुदानाचे वाटप तातडीने करण्यात यावे, अशा अनेक महत्त्वपूर्ण मागण्या पूर्णत्वास नेण्यासाठी बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्यावतीने मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वातील धडक महामोर्चात लाखोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संघटनेचे प्रा निलेश ठाकरे, गौतम खंडारे, संजय गिद, राजाभाऊ काळे, अजय भोयर, राजू लोणकर, मधुकर निस्ताने, प्रशांत मुरादे, नितीन मलमकार, प्रा मनिष, मानकर, डॉ भगवान पंडित, अभय जैन मनोज तंबाखे, मोहन गहूले दिलीप कदम, निकीता ताई शेंडे, अनिल मुंढे, गणेश चौरागडे, रोषण धवल, अरुण तायडे, श्रीकृष्ण बैलमारे, शुभम डोणालकर यांनी केले आहे.

# राज्यात १० उमेद मॉल उभारण्यासाठी २०० कोटीचा निधी उपलब्ध

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

**नागपूर**-राज्यातील महिला स्वयंसाहाय्यता गटांना (एप्डे) कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी ‘उमेद मॉल’ या महत्त्वाकांक्षी संकल्पनेला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून पहिल्या टप्प्यात राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल उभारण्याचे लक्ष्य असून, त्यासाठी सरकारने २०० कोटींची तरतूद केल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

विधानसभा सदस्य राणाजगजितसिंह पाटील, सुनील प्रभू, योगेश सागर, संजय कुटे, नारायण कुचे, सुधीर मुनगंटीवार, सत्यजित देशमुख, मुरजी पटेल, समीर मेघे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात उमेद मॉल संदर्भात प्रश्न विचारला असता, मंत्री गोरे यांनी माहिती दिली.

महिला स्वयंसाहाय्यता गटांना मोठा आधार देण्यात येत असून मंत्री श्री.गोरे म्हणाले की, राज्यात ६,५३,१९२ बचत गट कार्यरत असून, त्यांना आतापर्यंत ८७२ कोटींचा फिरता निधी वितरित केला आहे. तर ३,७०,३५० गटांना २२२ कोटींचा समुदाय निधी देण्यात आला आहे. बँकांकडूनही मोठ्या प्रमाणात अर्थसाहाय्य मिळत असल्याने महिला उपजीविकेसाठी लघुउद्योजकता मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील महिला बचत गटाने तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळावी म्हणून ‘महालक्ष्मी सरस’, जिल्हा आणि मिनी सरस अशा प्रदर्शनांचे आयोजन राज्यभर करण्यात येते. मात्र ही केंद्रे तात्पुरती असल्याने महिलांसाठी १२ महिने उपलब्ध असलेली कायमची बाजारपेठ तयार करण्याचा निर्णय म्हणजे ‘उमेद मॉल’(जिल्हा विक्री केंद्र) असल्याचे त्यांनी सांगितले.प्रत्येक जिल्ह्यात किमान २०,००० चौ.फुटांचे मॉल उभारण्याचा विचार असून जिल्हा परिषदांकडून योग्य जागांची निवड सुरू असल्याचे मंत्री गोरे यांनी सांगितले.

## पहिल्या टप्प्यात दहा जिल्ह्यात उमेद मॉल

**नागपूर**-महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बारमाही बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उमेद मॉल संकल्पना सुरू झाली असून पहिल्या टप्प्यात १० जिल्ह्यात उमेद मॉल उभारले जाईल. पुढील टप्प्यात तालुका स्तरावरही मॉल सुरू करण्याचा विचार आहे, अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. विधानसभेत सदस्य संतोष बांगर, सुधीर मुनगंटीवार, नमिता मुंदडा, बाबासाहेब देशमुख, नानाभाऊ पटोले, देवराव भोंगळे, किशोर पाटील, सत्यजित देशमुख, गोपीचंद पडळकर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे उमेद (शएँथ्श) अभियानातील महिला बचत गट, समुदाय संसाधन व्यक्ती आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्यांवर प्रश्न उपस्थित केले.या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री गोरे म्हणाले की, राज्यातील उमेद अभियान बंद होणार नाही. सन २०२६ नंतरही ही योजना सातत्याने सुरू राहणार आहे. उमेद अभियानात कार्यरत असलेल्या समुदाय संसाधन व्यक्तींना ‘ग्रामसखी’ हे पदनाम देण्याची मागणी मान्य करण्यात आली असून या संदर्भातील शासन निर्णय आजच जारी होणार असल्याचे त्यांनी सभागृहात जाहीर केले. कर्मचाऱ्यांना गणवेश देण्याचा निर्णयही शासनाने घेतला असून गणवेशाचा प्रकार स्वतः कर्मचारी ठरवतील. कर्मचाऱ्यांनी सुचवलेला गणवेश शासन मान्य करेल, असेही मंत्री गोरे यांनी सांगितले.देशातील कुठल्याही राज्यात उमेद संबंधित कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आलेले नाही. महाराष्ट्रातही ते शक्य नसल्याचे मंत्री गोरे यांनी सांगितले. तथापि, बिहार राज्याने लागू केलेले काही सवलतींचे मॉडेल उपयुक्त असल्यास त्याचा अभ्यास करून महाराष्ट्रात लागू करण्याचा शासन नक्की विचार करेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.यासंदर्भात, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याशी चर्चा सुरू असून पुढील १५ दिवसांत संघटनांसोबत बैठक घेण्यात येईल, असेही मंत्री गोरे यांनी सांगितले.

# धामणगाव मतदार संघातील ३९ प्रश्नांकडे आ.अडसड यांनी वेधले सरकारचे लक्ष

## सीसीआय कापूस खरेदीत जिल्हा बंदीचा अडथळा, गोंडगोवारीच्या सवलती,घरकुल घोटाळ्याचे मांडले मुद्दे

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

सोयाबीन खरेदीतील मॉइश्चरमुळे येणाऱ्या अडचणी, सीसीआय कापूस खरेदीत जिल्हा बंदीचा अडथळा, वीज कनेक्शन, माकड पकडताना प्रशासनाची होणारी चूक, क्रिटिकल झोन मधील गावे, पानंद रस्त्यासाठी निधी ,घरकुल योजनेतील घोटाळा ,आशा स्वयंसेविका खिचडी शिजवीणाऱ्या महिलाचे वाढीव मानधन, संगणक परिचारक बचत गट प्रवर्तिकांच्या समस्या, आदिवासी गोडगोवारी समाजाच्या सवलती, उर्दू कनिष्ठ महाविद्यालय अश्या धामणगाव मतदार संघातील ३९ प्रश्नांकडे आ प्रतापदादा अडसड यांनी गुरुवारी सरकारचे लक्ष वेधले

नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात कलम २९३ अन्वये सत्ताधारी पक्षाच्या ठरावाबद्दल बोलताना आ.प्रताप अडसड यांनी मतदार संघातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी च्या मदतीत सुटलेल्या तालुक्याला समावेश करणे व आजपर्यंत कधीही रक्कम मिळाली नाही एवढी रक्कम त्यांच्या खात्यापर्यंत पोहोचल्याने सरकारचे त्यांनी कौतुक केले.सोयाबीनची हमीभावाने खरेदी सुरू आहे परंतु मॉइश्चरमुळे बऱ्याच अडचणी येत आहे १२ % च्या वर जर गेले तर शेतकऱ्याचा भरलेला शेत माल त्यांना पुन्हा तिथून परत न्यावा लागतो रिजेक्शनमुळे आणि मग चढाई उतराई,पुन्हा शेत माल परत नेणे,त्याचा गाडीचा भाडे हा सगळा खर्च त्यांच्या खांद्यावर बसतो कापसाचे ग्रेडेशन प्रमाणे निर्णय घ्यावा.सीसीआयचे



माध्यमातून कापसाची खरेदी सुरू झाली मात्र जिल्हा बंदी आहे उठवावी.समृद्धी ,रेल्वे मार्ग व सर्व सोयीअसल्याने सरकारने येथे उद्योग आणावा, रोहयोअंतर्गत झालेल्या विहिरी, घरकुल यांचे हप्ते थकीत आहे ते त्वरित मिळावे, सोलरमुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा होत आहे मात्र काही कंपन्या सोलर पंप इन्स्टॉल करून न देता नागरिकांची लूट करीत आहे या गंभीर बाबीकडे लक्ष द्यावे अशी मागणी आ प्रताप अडसड यांनी विधानसभेत केली.

**गोडगोवारी समाजाला सवलती द्याव्यात**

युतीच्या शासनात गोवारी समाजांना संविधानिक हक्काप्रमाणे गोंडगोवारीच्या सवलती मिळत होत्या मात्र महा विकास आघाडीचे सरकार कोर्टात गेल्याने या सवलती बंद झाल्या होत्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्या सवलती पुन्हा देण्यात याव्यात अशी आग्रही मागणी आमदार प्रतापदादा अडसड यांनी केली. माकड पकडण्या संदर्भात वनमंत्र्यांनी सकारात्मक निर्णय घेतला जीआरही काढला परंतु काही अधिकाऱ्यांनी त्यामध्ये घोळ करून ठेवला, सहाशे रुपये प्रति माकड तर मान्य केले परंतु मर्यादा दहा हजार रुपये पर्यंत ठेवली. यामध्ये फक्त १६ माकड पकडता येतात आणि या एका कळपामध्ये ३० ते ४० माकड असतात आणि त्याला ते आणणे गाडी पिंजरा भरणे ते पुन्हा नेऊन सोडण्याची दहा हजार रुपये परवडत नाही त्यामुळे मर्यादा काढून टाकून सरसकट तो जेवढे पकडून नेईल त्या सहाशे रुपये प्रति माकडा प्रमाणे देण्याबाबत परिपत्रक काढावे असा मुद्दा आ अडसड यांनी विधानसभेत मांडला

**क्रिटिकल झोन मधील गावांना हवा न्याय**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यामध्ये क्रिटिकल झोनमध्ये काही गाव आहेत जलयुक्त शिवार योजनेनंतर पाण्याची पातळी वाढलेली आहे पुन्हा सर्वेक्षण करून ही गावे काढावी पशुवैद्यकीय अधिकारी, वीज मंडळातील सहाय्यक अभियंता कनिष्ठ अभियंता यांच्या रिक्त जागा भरण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेण्याची मागणी त्यांनी केली.

**संस्थान व मंदिराच्या शेतीला अतिवृष्टीची मदत द्यावी**

संस्थान मंदिराच्या असलेल्या शेतीला अतिवृष्टीची मदत मिळत होती मात्र ती बंद करण्यात आली अनेक मंदिरे संस्थान यांना उत्पन्नाचे साधन नाही त्याचा मेंटेनन्स याच उत्पन्नातून होतो त्यामुळे शासनाने निर्णय घेऊन संस्थांन व मंदिरांच्या शेतीचा यामध्ये समाविष्ट करून उर्वरित हप्ता देण्याची मागणी आ.अडसड यांनी विधानसभेत केली.

**तळेगाव दशासरचा घरकुल घोटाळा गाजला विधानसभेत**

तळेगाव दशासर येथील अनेकांना घरकुलचे हप्ते देऊनही कामे झालेच नाही काहींना ५० टक्के अनुदान देण्यात आले साठ हजार , व एक लाख वीस हजार दिले मात्र काम कुठेच दिसत नाही असा घरकुल घोटाळा तळेगाव दशासर येथे घडला असताना यावर त्वरित कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली .चांदुर रेल्वे, धामणगाव रेल्वे येथे उर्दू कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात यावे अशी मागणी आमदार प्रताप अडसड यांनी विधानसभेत केली.

# कांद्याच्या नुकसानीबाबत मदतीसाठी केंद्राकडे प्रस्ताव

**नागपूर**-चाळीत सडलेल्या किंवा खराब झालेल्या कांद्याच्या नुकसानीबाबत मदत देण्याची तरतूद ‘एनडीआरएफ’च्या नियमात नाही. मात्र कांदा उत्पादकांची परिस्थिती लक्षात घेता याबाबतचा विशेष प्रस्ताव ‘एनडीआरएफ’कडे पाठवून अतिरिक्त मदतीसाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

पावसामुळे कांदा पिकाच्या झालेल्या नुकसान भरपाई संदर्भात सदस्य विक्रम पाचपुते यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना मकरंद जाधव-पाटील म्हणाले की, राज्यातील तब्बल २.४९ लाख हेक्टर क्षेत्रातील कांदा पिकाच्या नुकसानीवर शासनाने बागायतीप्रमाणे हेक्टरी १७,००० रु. मदत दिली आहे. तसेच अतिरिक्त एक हेक्टरसाठी विशेष मदत देत तीन हेक्टरपर्यंत नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला असून बहुतेक शेतकऱ्यांना ही मदत वितरितही झाली आहे. त्याचप्रमाणे रब्बी हंगामातील नुकसानीसाठीही शासनाने हेक्टरी १०,००० रुपये प्रमाणे मदत जाहीर केली आहे.

काही शेतकऱ्यांचा काढलेला आणि शेतातच पडून राहिलेला कांदा अद्याप पंचनामे न झाल्याने नुकसान भरपाईपासून वंचित असल्याची तक्रार आहे. यावर शेतात बांधावर किंवा बाजूला ठेवलेल्या कांद्यालाही पंचनाम्यानुसार मदत देण्याचा निर्णय शासनाने आधीच घेतला आहे. त्यामुळे ज्या प्रकरणांचे पंचनामे राहिले असतील त्यांनी माहिती सादर करावी. संबंधित तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्याकडून चौकशी करून उर्वरित शेतकऱ्यांना मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच विहिरीच्या नुकसानीपोटी यंदा पहिल्यांदाच प्रति विहीर ३० हजार रुपये मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत ११ हजार विहिरींना ३५ कोटींची मदत देण्यात आली आहे, असे मंत्री पाटील यांनी सांगितले. कांदा पिकाचे धोरण ठरविण्यासाठी पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून या समितीचा अहवाल आल्यानंतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळेल असे त्यांनी यावेळी सांगितले.

# तपोवन अन् निवडणुकांचे पडघम

नाशिक महापालिका निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. महायुती राज्यस्तरावर एकत्र लढण्याचे संकेत देत असली, तरी नाशिकच्या पोटात अन् वेगवेगळ्या गोटांत नवी राजकीय समीकरणे उदयाला आल्यास आश्चर्य वाटायला नको.

नाशिक महापालिका निवडणुकीची घोषणा अवघ्या काही दिवसांत होणे अपेक्षित आहे. २० डिसेंबरनंतर केव्हाही आचारसंहिता लागू होऊ शकते आणि त्यानंतर महिनाभरात निवडणुका पार पडतील. या पार्श्वभूमीवर नाशिक मनपाच्या राजकारणात अस्वस्थता, अनिश्चितता आणि सूक्ष्म गणितांची लगबग स्पष्टपणे जाणवू लागली आहे. भाजपने नाशिक महापालिकेसाठी ‘शंभर प्लस’चा नारा दिला असला, तरी त्यांच्याकडे विद्यमान नगरसेवकांची संख्या ७०च्या आसपास आहे. हे ध्येय गाठण्यासाठी भाजपला स्वबळावर लढणे अनिवार्य ठरेल. परंतु, त्याचवेळी शिवसेना शिंदे गटाचे अस्तित्व आणि संघटनशक्ती शहरात सक्षम असल्याने भाजपसाठी ठरवलेले आव्हान पेलणे वाटते तितके सोपे नक्कीच नाही. शिवसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) हे दोन्ही पक्ष तपोवनातील पर्यावरणविषयक मुद्द्यावर आक्रमक झाले आहेत. दोन्ही पक्ष राज्यात भाजपसोबत सत्तेत असले, तरी येथे मात्र दोन्ही पक्षांनी भाजपला कोंडीत पकडण्याची मोहीम आखल्याचे स्पष्टपणे दिसते. तपोवनातील वृक्षतोड, नदीकाठच्या वृद्ध झाडांचे संरक्षण आणि निसर्गासंबंधी प्रश्न शहरवासीयांच्या मनाचा ठाव घेणारे आहेत. त्यामुळे या मुद्द्याचा राजकीय फायद्यासाठी वापर होणे सध्याच्या परिस्थितीत अपरिहार्यच!

नाशिक शहरातील भाजपचे आमदार मात्र या मुद्द्यावर मौन धारण करून बसले आहेत. त्यांची ही बोटचेपी भूमिका विरोधकांना पूरक ठरत आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवारांनी स्पष्टपणे तपोवनातील वृक्षतोडीला विरोध नोंदवला. त्यानंतर शिवसेनेने नाशिकमध्ये आंदोलन करून या प्रश्नाला भावनिक आणि सामाजिक स्वरूप प्रदान केले. पर्यावरण प्रेमी, स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी आणि युवक यांच्याकडून मिळणारा पाठिंबा पाहता निवडणुकीत तपोवन हा ‘निर्णायक मुद्दा’ ठरू शकतो, अशी चिन्हे आहेत. या सर्व घडामोडींचा महायुतीच्या एकत्र लढण्यावर थेट परिणाम होऊ शकतो. सत्ताधारी मित्रपक्षांतील तणाव वाढत असल्याने भाजपला आपला ‘शंभर प्लस’चा नारा मवाळ करावा लागू शकतो. जर स्वबळाचा आग्रह कायम राहिला, तर शिवसेना आणि राष्ट्रवादी एकत्र येऊन भाजपविरोधी फ्रंट उभारू शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात गती घेत आहे.

नगरपरिषदांच्या अलीकडील निवडणुकांनी एक वेगळा पॅटर्न दाखवला. ११ नगरपरिषदांमध्ये महायुतीचेच उमेदवार एकमेकांसमोर उभे ठाकले आणि संपूर्ण चर्चा महायुतीभोवतीच फिरत राहिली. याचा थेट फायदा असा झाला की, महाविकास आघाडीचे अस्तित्व, त्यांचे नेतृत्व, त्यांची ताकद यावर कोणतीही ठोस चर्चा झालीच नाही. माध्यमांपासून सोशल मीडियापर्यंत महायुतीतील अंतर्गत संघर्षच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिला. या धोरणाची मनपा निवडणुकांतही पुनरावृत्ती होण्याची शक्यता जाणकार व्यक्त करत आहेत.

महानगरपालिका निवडणुकांमध्ये तर प्रभागनिहाय वेगवेगळी समीकरणे तयार होऊ शकतात. एखाद्या प्रभागात महायुती एकत्र, तर दुसऱ्या प्रभागात एकमेकांसमोर असे अनपेक्षित चित्र निर्माण होणे काही नवीन ठरणार नाही. मात्र, येथे खरी जबाबदारी महाविकास आघाडीवर येते. भक्कम उमेदवार उभे करून महायुतीच्या अंतर्गत संघर्षाचा फायदा घेण्याची त्यांची रणनीती किती प्रभावी ठरेल, हा आगामी निवडणुकांचा निर्णायक प्रश्न ठरणार आहे. नाशिकचे राजकारण, तपोवनचे आंदोलन आणि आगामी निवडणुकीची धग हे सर्व पाहता पुढील काही आठवडे नाशिकसाठी राजकीयदृष्ट्या अत्यंत रोचक ठरणार हे निश्चित. पुढील सत्ता कोणाची, हे ठरवताना ‘तपोवनातील झाडे’ मतदानाच्या यंत्रणेला कोणत्या दिशेने वळवतील, हे पाहणे अधिक महत्त्वाचे ठरेल.

**डॉ. राहुल रनाळकर**

# विदर्भात १००० एकर आयटी पार्कची उभारणी करावी

## आमदार अमोल मिटकरींची विधिमंडळात अभ्यासपूर्ण मांडणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

*विदर्भातील विकास, रोजगारनिर्मिती आणि शिवछत्रपतींच्या इतिहासाच्या संरक्षणासंबंधी अत्यंत महत्त्वाचे मुद्दे आमदार अमोल मिटकरी यांनी विधिमंडळातील चर्चेत प्रभावीपणे मांडले. अमरावती–अकोला–यवतमाळ आणि नागपूर जिल्ह्यात दरवर्षी हजारोंच्या संख्येने इंजिनिअरिंग पदवीधर तयार होत असतानाही त्यांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळत नसल्याने बाहेरगावी स्थलांतर करावे लागते. ही स्थिती बदलण्यासाठी विदर्भात किमान ५०० ते १००० एकरवर भव्य आयटी पार्क उभारणीची तातडीची गरज असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.*



दरवर्षी विदर्भातील संस्थांतून १८ ते २२ हजार विद्यार्थी इंजिनिअरिंग पूर्ण करतात, त्यापैकी आठ ते दहा हजार विद्यार्थी आयटी आणि कॉम्प्युटर शाखेतील असतात. रोजगाराच्या शोधात हे विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर पुणे आणि मुंबईकडे वळतात. या स्थलांतरामुळे महानगरांतील गर्दी चिंताजनक पातळीवर पोहोचली आहे.

विदर्भात स्वतंत्र आयटी पार्क निर्माण झाले, तर किमान ५० हजार थेट आणि १ लाख अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होऊ शकतात, असा अंदाज मिटकरी यांनी व्यक्त केला. शासनाने या संदर्भात तातडीने प्रक्रिया सुरू करून मोठ्या क्षमतेच्या आयटी पार्कला मंजुरी द्यावी, अशी त्यांची आग्रही मागणी होती.

**तूर–उडीद उत्पादकांसाठीही ठोस मागणी :** कापसाप्रमाणेच तूर आणि उडीद डाळींवरील आयात शुल्क माफ करून उत्पादकांना हमीभावापेक्षा कमी दर मिळणार नाही, याची शासनाने शाश्वती द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

**'छत्रपती शिवाजी महाराजांवर अस्सल चरित्र साधन खंड' निर्मिती करा :** विधिमंडळातील एका वेगळ्याच चर्चेत मिटकरी यांनी शालेय शिक्षण विभागाला धारेवर धरत छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातील गंभीर त्रुटींकडे लक्ष वेधले.

**सीबीएसई च्या आठवीत शिवछत्रपतींबाबत फक्त ६८ शब्द!:** इतिहासाच्या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या विश्वविख्यात व्यक्तिमत्त्वाची फक्त ६८ शब्दांत उरकलेली नोंद अत्यंत अन्यायकारक आणि अपमानास्पद असल्याचे मत मिटकरी यांनी मांडले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, महात्मा फुले किंवा अण्णाभाऊ साठे यांच्याप्रमाणेच शिवछत्रपतींच्या 'अस्सल चरित्र साधन खंड' तयार करून ते शासकीय मुद्रणालयातून उपलब्ध करावेत, अशी त्यांनी प्रभावी मागणी केली. जयसिंगराव पवार यांसारखे ज्येष्ठ संशोधक राज्यात हयात असताना, त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधनकार्य तातडीने सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.संभाजी महाराजांवरील बदनामीकारक साहित्य कायमस्वरूपी बाद करा मिटकरी यांनी महापुरुषांच्या अवमानासंदर्भातील मुद्दाही जोरदारपणे उपस्थित केला. 'राजसंन्यास' हे संभाजी महाराजांवर आक्षेपार्ह लिखाण करणारे पुस्तक शासनाने मागे घेतल्याबद्दल त्यांनी अभिनंदन केले. पण— यूट्यूबवरील बदनामीकारक नाटके, चित्रपट, कथानके, चुकीचा अभ्यासक्रम, सोशल मीडियावरील दिशाभूल करणारी सामग्री हे सर्व कायमस्वरूपी हटवावे, अशी मागणी त्यांनी पुन्हा अधोरेखित केली. 'संभाजी महाराजांचा वास्तव इतिहास तरुण पिढीपर्यंत पोहोचला नाही, तर बदनामीची ही चक्रे पुन्हा फिरत राहतील,' अशी जिव्हाळ्याची चिंता यावेळी त्यांनी व्यक्त केली.आमदार अमोल मिटकरी यांनी अधिवेशन काळात लागोआठ एकामागून एक अभ्यासपूर्ण पद्धतीने रोजगार, शेती, शिक्षण आणि इतिहास या चारही क्षेत्रांवरील तातडीच्या आणि जनहिताच्या प्रश्नांनी विधिमंडळात राज्य सरकारला चांगलेच उत्तराला लावले. त्यांच्या या मागण्या अमलात आल्यास विदर्भाच्या विकासाला गती मिळून महाराष्ट्राच्या इतिहासाचेही योग्य प्रकारे संवर्धन होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## चतारी–शेगाव पायदळ वारीला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



### गजानन भक्तांची भक्तिमय दिंडी शेगावात दाखल

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील चतारी येथून मार्गशीर्ष महिन्यानिमित्त दरवर्षी आयोजित केली जाणारी पारंपरिक चतारी–शेगाव पायदळ वारी यंदाही अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न झाली. नवयुवकांच्या पुढाकारातून निघालेल्या या दिंडीने 'गण गण गणात बोते'च्या गजरात परिसर दुमदुमून गेला. विविध जातिधर्मातील गजानन भक्तांनी उत्साहाने सहभागी होत सामंजस्य, ऐक्य आणि श्रद्धेचे सुंदर दर्शन घडवले. वाऱ्यादरम्यान विकास किर्तने, शुभम पवार, आनंद फाळके, निलेश हिरळकर, प्रमोद ढोरे, विजय पोटखेडे, महादेव किर्तने, अक्षय किर्तने, संजय किर्तने, राधे येनकर, रोशन पवार, राम फाळके आदींची विशेष उपस्थिती होती. भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने पायदळ प्रवास करत गजानन महाराजांचे दर्शन घेत शेगाव येथे दिंडीची संगता साधत वारीचा समारोप केला.

## माळराजुरा येथील युवकाचा गिट्टी खदानात बुडून मृत्यू



■ प्रतिनिधी | पातूर ■

माळराजुरा येथील २५ वर्षीय युवक ज्ञानेश्वर उत्तम अंभोरे हा दोन दिवसांपासून बेपत्ता असून, त्याबाबतची तक्रार पातुर पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आली होती. मात्र आज सकाळी त्याचा मृतदेह कोसगाव शेतशिवारातील गिट्टी खदानातील पाण्यात तरंगत आढळल्याने खळबळ उडाली आहे.

ज्ञानेश्वर अंभोरे हा परवा रात्री शेतावर रखवालीसाठी गेला होता. मात्र तो घरी परत न आल्यानंतर ग्रामस्थांनी परिसरात सर्वत्र शोध घेतला, परंतु त्याचा काहीही मागोवा लागला नाही. यानंतर कुटुंबीयांनी आणि गावकऱ्यांनी पोलिसात तक्रार दिली होती.

आज, १२ डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास कोसगाव शिवारातील गिट्टी खदानात पाण्यावर एक मृतदेह तरंगताना दिसल्यानंतर गावकऱ्यांनी याची माहिती तात्काळ पातुर पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह बाहेर काढला. ओळख पटवल्यानंतर तो ज्ञानेश्वर अंभोरे याचाच असल्याची खात्री झाली. सदर मृतदेह अकोला येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी रवाना करण्यात आला असून, या घटनेचा पुढील तपास पातुर पोलीस करीत आहेत. गावात या दुर्घटनेने हळहळ व्यक्त केली जात आहे.

## नागरीकांना विहित वेळेत सेवा प्रदान कराव्यात

**अकोला :** राज्य अन्न आयोगाच्या सदस्या माया इरतकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पुरवठा कार्यालय येथे आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी सार्वजनिक वितरण व्यवस्था या विषयाच्या अनुषंगाने ऑनलाईन धान्य वितरणबाबत आढावा घेतला व मार्गदर्शन केले.पुरवठा विभाग हा लोकाभिमुख असल्याने नागरीकांचे कामकाज वेळेत पूर्ण करून विहित वेळेत सेवा पुरवण्यात याव्यात असे सांगितले.तसेच कार्यालयीन कामकाजामध्ये येणा-या वअडचणी सोडविण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

## बाभूळगाव–आलेगाव रस्त्याच्या दुरुस्तीसाठी २४ डिसेंबरला पीडब्ल्यूडी कार्यालयावर मोर्चा



### ग्रामस्थांच्या समस्या मार्गी न लागल्याने नाराजी; सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील बाभूळगाव–आलेगाव–नवेगाव–डोणगाव हा जीववाहिनी मानला जाणारा महत्त्वाचा मार्ग गेल्या अनेक महिन्यांपासून दुरवस्थेत आहे. रस्त्याची तातडीची दुरुस्ती, आंबाशी ग्रामपंचायत हद्दीतील अनावश्यक गतिरोधक हटविणे, बाभूळगाव मुख्य चौकातील सांडपाणी व्यवस्थापनाची दुरुस्ती, तसेच उंबरवाडी चौफुलीजवळील नाल्यावर पूल बांधकाम या प्रलंबित कामांची मागणी ग्रामस्थांकडून सातत्याने केली जात आहे.

या मागण्यांकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांनी २४ डिसेंबर रोजी पीडब्ल्यूडी कार्यालयावर प्रतिकात्मक मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे. काही दिवसांपूर्वी कापकर यांनी विभागाकडे निवेदन देत तातडीने दुरुस्तीची मागणी केली होती. त्यावर विभागाने आठ दिवसांत समस्या सोडवण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र ठरलेल्या कालावधीत कोणत्याही कामाला सुरुवात न झाल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर ९ डिसेंबर रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंत्यास देण्यात आलेल्या निवेदनात २४ डिसेंबरला मोर्चा काढण्यात येणार असल्याची स्पष्ट सूचना देण्यात आली. नागरिक व ग्रामस्थांनीही मोर्चाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**Change In Name**

I Have Change My Name
OLD NAME
**DURGA MANOHARLAL BATHEJA**
NEW NAME
**MUSKAN ASHOK RAJPAL**
My Residential Address is :- Samta Nagar Murtizapur Akola Maharashtra 444107.

**Change In Name**

I Have Change My Name
OLD NAME
**ANANTKUMAR SURESHRAO ANJIKAR**
NEW NAME
**ANANT SURESH ANJIKAR**
My Residential Address is :-Ambika Nagar Gaurakshan Road Near Gajanan Maharaj Mandir Malkapur Akola 444004

**Change In Name**

I Have Change My Name
OLD NAME
**RAVIKUMAR SADASHIV WADEKAR**
NEW NAME
**RAVI SADASHIV WADEKAR**
My Residential Address is :- Sai Nagar Panchmukhi Chowk Dabki Road Old City Akola Maharashtra 444002.

**Change In Name**

I Have Change My Name
OLD NAME
**FARHEEN TABASSUM MOHD AFSAR**
NEW NAME
**FARHEEN TABASSUM ASIF KHAN**
My Residential Address is :-Ashok Nagar Sabriya Chowk Near Sabriya Masjid Akot File Akola MH 444003.

**Change In Name**

I Have Change My Name
OLD NAME
**SHAIKH AJAJ SHAIKH BISMILLA**
NEW NAME
**AJAJ BISMILLA SHAIKH**
My Residential Address is :-At Post Pusda Amravati MH 444801

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२३३/२०२५ — प्रोसेस नं.२०३२३/२०२५
चौ.ता. १७/०१/२०२६ — दिनांक : ०९/१२/२०२५

**अर्जदार :** मंदा चंद्रभान सरकटे रा. बौद्ध विहार समोर, भिम नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शांताबाई चंद्रभान सरकटे
**पत्ता :-** रा. भिम नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शांताबाई चंद्रभान सरकटे यांचे दि. १३/०२/२०२४ रोजी राहते घरी भिम नगर, जुने शहर, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२०१/२०२५ — प्रोसेस नं.२०१९५/२०२५
चौ.ता. २०/०१/२०२६ — दिनांक : ०८/१२/२०२५

**अर्जदार :** १. अजय चंद्रकांत अटकरे रा. फत्तेपूरवाडी, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. प्रिया चंद्रकांत अटकरे रा. विलास टेलर्स, मेन रोड, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शिला चंद्रकांत अटकरे
**पत्ता :-** रा. विलास टेलर्स, मेन रोड, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शिला चंद्रकांत अटकरे यांचे दि. ०७/०९/२०२४ रोजी नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. ओज दिनांक ०८/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२२८/२०२५ — प्रोसेस नं.२०२६३/२०२५
चौ.ता. २१/०१/२०२६ — दिनांक : ०९/१२/२०२५

**अर्जदार :** १. लिलाबाई रामराव इधोळ रा. कसुरा, अकोला. ता. जि. अकोला. २. सरिता संजय इधोळ ३. आशिष संजय इधोळ ४. तृप्ती संजय इधोळ अर्जदार क. २ ते ४ रा. न्यू गोडबोले प्लॉट, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : संजय रामराव इधोळ
**पत्ता :-** रा. न्यू गोडबोले प्लॉट, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संजय रामराव इधोळ यांचे दि. १५/११/२०२४ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२१८/२०२५ — प्रोसेस नं.२०२६४/२०२५
चौ.ता. २१/०१/२०२६ — दिनांक : ०९/१२/२०२५

**अर्जदार :** हसमुख लालजी देडीया रा. २/१३, व्ही. एच. बी. कॉलनी, आय टी आय कॉलेज जवळ, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लालजी लखमशी देडीया
**पत्ता :-** रा.२/१३, व्ही. एच. बी. कॉलनी, आय टी आय कॉलेज जवळ, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लालजी लखमशी देडीया यांचे दि. १२/०८/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२४४/२०२५ — प्रोसेस नं.२०३२५/२०२५
चौ.ता. २४/०१/२०२६ — दिनांक : ०९/१२/२०२५

**अर्जदार :** १. योगेश कांतीलाल सोनवणे रा. खटाउ जीन, पी. के. ऑइल मिल कंपाउंड, लक्ष्मी नगर, खोलेश्वरच्या मागे, अकोला, ता. जि. अकोला. २. देवेंद्र कांतीलाल सोनवणे रा. दिपलक्ष्मी रेसिडेन्सी, बिल्डींग डी-१, रूम नं. १०१. काल्हेर, भिवंडी, ठाणे, ३. भाग्यश्री मिन्नथ सोनार रा. चावडी चौक, गणपती मंदिर जवळ, शाहदा, ता. शाहदा, जि. नंदुरबार ४. निता कांतीलाल सोनवणे रा. निवारा कॉलनी, गौरक्षण रोड जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कुसूम कांतीलाल सोनवणे
**पत्ता :-** रा. खटाउ जीन, पी. के. ऑइल मिल कंपाउंड, लक्ष्मी नगर, खोलेश्वरच्या मागे, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कुसूम कांतीलाल सोनवणे यांचे दि. २४/०१/२०२२ रोजी खोलश्वर अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४ २४/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२४५/२०२५ — प्रोसेस नं.२०२५९/२०२५
चौ.ता. १९/०१/२०२६ — दिनांक : ०९/१२/२०२५

**अर्जदार :** १. शिला यादवराव वक्ते २. शंतनू यादवराव वक्ते दोघेही रा. निवारा कॉलनी, गौरक्षण रोड जवळ, अकोला. ता. जि. अकोला. ३. प्लास्मा विक्रम जानोरकर रा. जानोरकर मंगल कार्यालयाच्या मागे, केशव नगर, अकोला. ता. जि. अकोला. ४. पल्लवी यादवराव वक्ते रा. के. के. वाघ शाळेच्या मागे, रविशंकर मार्ग, वडाळा शिवर, गांधी नगर, नाशिक. ५. गीता संजय बशानी रा. न्यु दिंडोशी, संकल्प सिद्धी, मालाड वेस्ट, न्यु म्हाडा कॉलनी, मुंबई.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : यादवराव बालाबकास वक्ते
**पत्ता :-** रा. निवारा कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत यादवराव बालाबकास वक्ते यांचे दि. ३०/१०/२०२५ रोजी निवारा कॉलनी, माधव नगर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१९०/२०२५ — प्रोसेस नं.१९९५७/२०२५
चौ.ता. १७/०१/२०२६ — दिनांक : ०५/१२/२०२५

**अर्जदार :** १. निखिल नंदकुमार कामले रा. गोखले भवन जवळ, पोळा चौक, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. २. नेहा कौशिक गुप्ता रा. कौशिक गुप्ता, १९/१, जमातखाना गल्ली, वार्ड नं. २४, चंद्रकला वार्ड, बुऱ्हानपुर, मध्यप्रदेश ३. निधी रिंकेश शाह रा. रिंकेश शाह, मकान नं. ३३, दिवान नवल मार्ग, बुऱ्हानपुर, मध्यप्रदेश

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. नंदकुमार मुरलीधर कामले २. लता नंदकुमार कामले
**पत्ता :-** रा. गोखले भवन जवळ, पोळा चौक, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नंदकुमार मुरलीधर कामले यांचे दि. ०९/०४/२०२१ रोजी व तसेच मयत लता नंदकुमार कामले यांचे दि. २६/०५/२०१७ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, बार्शिटाकळी यांचे कार्यालय जि.अकोला.

क्र. कक्ष जन्म/म.स. कावि- २९१/२०२५ — दिनांक: ५/१२/२०२५

**जाहीरनामा**

हया नोटीस व्दारे सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, याव्दारे जाहिरनामा प्रसिध्द करण्यात येतो की, अर्जदार इमरान खान रहिम खान रा. महान ता बार्शिटाकळी जि अकोला यांनी त्यांचा स्वतःचा जन्म दिनांक १९ एप्रिल १९९८ रोजी महान ता बार्शिटाकळी येथे झाला असल्याचे अर्जात नमुद केले आहे सदर जन्माची नोंद ग्रामपंचायत चे अभिलेखाला नसल्याने त्यांनी जन्माची नोंद ग्रामपंचायतचे अभिलेखाला होण्याचा आदेश व्हावा म्हणून संदर्भीय शासन निर्णय दिनांक १२ मार्च २०२५ अन्वये सचिव ग्रामपंयायंत महान यांचेकडे अर्ज सादर केला होता. त्यास अनुसरून ग्रामसेवकांनी सदर अर्ज शासन निर्णयांप्रमाणे योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर इकडील कार्यालयास सादर केला आहे.

त्यास अनुसरून सर्वांना सुचित करण्यांत येते की या जन्माचे दाखल्याबददल कोणास काही हरकत कींवा आक्षेप घ्यावयाचा असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत या कार्यालयास सदर हरकती आक्षेप लेखी स्वरुपात माझेसमक्ष सादर करावे. सदर मुदतीत हरकत किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो निर्णय पारीत करेल.

**(राजेश वझीरे)**
तहसिलदार, तथा तालुका
दंडाधिकारी बार्शिटाकळी

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२२३/२०२५ — प्रोसेस नं.२०२६५/२०२५
चौ.ता. २१/०१/२०२६ — दिनांक : ०९/१२/२०२५

**अर्जदार :** १. हसमुख लालजी देडीया रा. २/१३, व्ही. एच. बी. कॉलनी, आय टी आय कॉलेज जवळ, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. २. जलपा दिप्तेश सावला रा. पीएच-३ डी-४०९,प्रथम यश रेसिडेन्सी, पोरवाल रोड, लोहेगाव, पुणे सिटी, पुणे ४११०४७, ३. बैलुल हसमुख देडीया, रा. बिल्डिंग नं. २, व्हीएचबी कॉलनी, आयटीआय कॉलेज समोर, रतनलाल प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भावना हसमुख देडीया
**पत्ता :-** रा.२/१३, व्ही. एच. बी. कॉलनी, आय टी आय कॉलेज जवळ, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भावना हसमुख देडीया यांचे दि. ०६/१०/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ११ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२००/२०२५ — प्रोसेस नं.२०१८०/२०२५
चौ.ता. २८/०१/२०२६ — दिनांक : ०८/१२/२०२५

**अर्जदार :** 1. Smt. Alka Wd/o Dilip Kolhatkar 2. Uday S/o Dilip Kolhatkar 3. Amit S/o Dilip Kolhatkar All R/o Jyoti Chemporium Raymond, Showroom laine, Alsi Plot Akola Tq Dist Akola

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही
**मयताचा पत्ता :-** मयत : दिलीप गोविंद कोल्हटकर
**पत्ता :-** रा. ज्योती चेंम्पोरियम रेमंड शोरूम लेन, आलसी प्लॅट अकोला ता. जि. अकोला.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत १. दिलीप गोविंद कोल्हटकर, यांचे दि. ०४/०९/२०२२ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, सदरहू दिलीप गोविंद कोल्हटकर यांचे नावे एचडीएफसी बँक शाखा अकोला येथे अकाउंट नं चे ५०२०००५३८८४७५६ खाते असुन त्यात रू. १११३२९०.१३ इतकी रककम जमा आहे.

सदर लाभ मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, वरील अर्जदार यांच्या शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004


**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# ‘आयबीएफसी’ ला मायक्रो इन्क्युबेशन सेंटरचा दर्जा द्यावा

## पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची कौशल्य विकास मंत्र्याकडे अधिकृत मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात आयआयएम नागपूरच्या तांत्रिक मार्गदर्शना खाली कार्यरत असलेल्या ‘इनक्युबेशन कम बिझनेस फॅसिलिटेशन सेंटर’ ला राज्य सरकारच्या ‘मायक्रो इन्क्युबेशन सेंटर’ म्हणून मान्यता मिळावी, अशी अधिकृत मागणी जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोन्मेष विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडे केली आहे. महाराष्ट्र स्टार्टअप पॉलिसी २०२५ तसेच ‘मॅट्रिक्स’ या नव्या योजनेच्या माध्यमातून राज्य सरकार स्टार्टअप क्षेत्राला जो नवा वेग देत आहे, त्याचे कौतुक करत ही संधी ग्रामीण तरुणांपर्यंत पोहोचवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.



डॉ. भोयर म्हणाले की, वर्ध्यात गेल्या काही महिन्यांपासून ध्ँइण केंद्र जिल्हा प्रशासन आणि आयआयएम नागपूरच्या इनफेड यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यरत आहे. ग्रामीण भागातील तरुण उद्योजकांना दिशा देणे, त्यांच्या कल्पनांना प्रत्यक्ष व्यवसायरूप देणे आणि नव्या स्टार्टअप संधी उपलब्ध करणे हे या केंद्राचे मुख्य उद्दिष्ट आहे. शासनाची अधिकृत मान्यता नसल्यामुळे अनेक प्रकल्प मर्यादित साधनांवर चालत आहेत, त्यामुळे मायक्रो इन्क्युबेशन सेंटरचा दर्जा अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. ध्ँइण केंद्रात सध्या अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू आहेत. वर्धिनी क्लस्टर डेव्हलपमेंट अंतर्गत महिलांच्या बचत गटांना तसेच स्थानिक कारागिरांना टेराकोटा, डेअरी फार्मिंग, हातकलेशी संबंधित उद्योग यांची कौशल्यवृद्धी, प्रशिक्षण, बाजारपेठ उपलब्धता आणि उत्पादने विक्रीविषयक मार्गदर्शन दिले जात आहे. ॅAMP प्रकल्पांतर्गत जागतिक बँक आणि MSSIDC यांच्या सहकार्याने एमएसएमई क्षेत्राला डिजिटल साधनांचा वापर, क्षमता बांधणी आणि उद्योगवृद्धीची दिशा देण्याचे कार्य सुरू आहे.

तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आयआयएम नागपूरच्या तज्ज्ञ प्राध्यापकांकडून उद्योजकतेचे मार्गदर्शन दिले जाते, ज्यातून अनेक तरुण स्टार्टअप संकल्पना विकसित करू लागले आहेत. वर्धा शहराचे भौगोलिक स्थानही स्टार्टअपसाठी अनुकूल आहे. नागपूरपासून अल्प अंतरावर असणे आणि समृद्धी महामार्गामुळे निर्माण झालेली दळणवळण सुविधा यामुळे वर्धा एक संभाव्य उद्योजकता केंद्र बनत आहे. मात्र केंद्राला शासनाकडून मान्यता मिळाल्यास आर्थिक अनुदान, सीड फंड, तांत्रिक सहाय्य आणि अधिकृत पायाभूत सुविधा उपलब्ध होतील.

यामुळे वर्धा जिल्हा ‘विदर्भातील मॉडेल स्टार्टअप जिल्हा’ म्हणून विकसित करण्याचा मार्ग अधिक सुकर होईल, असा विश्वास पालकमंत्री डॉ. भोयर यांनी व्यक्त केला.

डॉ. भोयर यांच्या मागणीवर तत्पर प्रतिसाद देत कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी विभागाच्या मुख्य कार्याधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

वर्ध्यात स्टार्टअप संस्कृतीला नवे बळ मिळण्याची अपेक्षा जिल्ह्यात व्यक्त होत आहे.

# नैतिकची प्रतिकृती ठरली सुपरहिट

## तालुका विज्ञान प्रदर्शनात हुतात्मा स्कूलचा झेंडा उंच

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टीतील हुतात्मा नॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात दणदणीत कामगिरी करत अव्वल स्थान पटकावले. विशेषतः विद्यार्थी नैतिक संजय भार्गव याने सादर केलेली विज्ञान प्रतिकृती प्रदर्शनात सुपरहिट ठरत प्रेक्षकांची मनं जिंकून गेली.

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या विज्ञान प्रदर्शनीत जिल्ह्यातील विविध शाळांकडून आधुनिक तंत्रज्ञानावर, पर्यावरणावर व भविष्यातील युगावर आधारित प्रतिकृती सादर करण्यात आल्या. बाहेरगावातूनही पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत होते. मात्र, लक्ष वेधून घेतलं ते नैतिकच्या भविष्योन्मुख प्रतिकृतीने.



आगामी दहा वर्षांतील मानवी जीवनातील बदल या संकल्पनेवर आधारित प्रतिकृतीतून नैतिकने ऊर्जा बचत, कमी खर्चातील तंत्रज्ञान, वीजेचा सुयोग्य वापर आणि त्यातून होणारे सामाजिक-आर्थिक फायदे याचे प्रभावी सादरीकरण केले. पाहणाऱ्यांच्या प्रश्नांना तो दिलेली प्रांजळ व वैज्ञानिक उत्तरे पाहून निरीक्षकही प्रभावित झाले. प्रतिकृतीची चर्चा शहरभर पोहोचताच प्रदर्शनात नैतिकला पाहण्यासाठी अलोट गर्दी झाली. निरीक्षकांच्या परीक्षेनंतर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक गटात नैतिक संजय भार्गव प्रथम पारितोषिकाचा मानकरी ठरला. उच्च प्राथमिक गटात कुमारी हुरेन फातिमा हिने तृतीय पारितोषिक पटकावत कौतुकाची थाप मिळवली. तर विशेष श्रेणीत कुमारी संबोधी निकाळजे हिने उत्कृष्ट कामगिरी करून प्रथम पारितोषिक आपल्या नावावर केले. या विद्यार्थ्यांचे वर्धा उपशिक्षणाधिकारी कांबळे, गटशिक्षणाधिकारी तायडे, विस्तार अधिकारी बोरवाल, केंद्रप्रमुख भुरे, पुरी , तसेच संस्थेचे अध्यक्ष भरतभाऊ वांझरा यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.

नैतिकचे अभिनंदन करण्यासाठी माजी नगरसेवक अजय लेकुरवाडे, अॅड. जयंत जाणे, अॅड. मनिष ठोंबरे, दयानंद महाराज हिरुडकर, तालुका अध्यक्ष सोनू भार्गव, अन्याय निवारण समितीचे प्रा. बी. टी. उरकुडे यांनी पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. हुतात्मा स्कूलच्या या यशामुळे आष्टी तालुक्यात उत्साहाचे वातावरण असून आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# संक्षिप्त

## रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्याने अंकित हिवरे सन्मानित

**वर्धा-** कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग तसेच इतर विभागासोबत करार करून जिल्ह्यातील युवकांना नवतंत्रज्ञानावर आधारित रोजगारक्षम अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देऊन पात्रतेनुसार युवक व युवतींना रोजगार उपलब्ध करून दिल्याने ईला हायरींग टेक्नालॉजीचे संचालक अंकीत हिवरे यांचा मंत्री मंगलप्रभात लोढा व पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. देश व परदेशात उच्च शिक्षण घेऊन भरघोष पगाराची नोकरी उपलब्ध झाली असताना जिल्ह्यामध्ये युवकांसाठी रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्टार्टअपअंतर्गत ईला हायरींग टेक्नालॉजीची स्थापना केली. जिल्ह्यातील युवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या पात्रतेनुसार विविध कंपन्यांसोबत सामंजस्य करार करून व रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून युवकांना रोजगार उपलब्ध करून दिल्याने अंकीत हिवरे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी., जि.प.चे मुख्य कार्यपालन अधिकारी पराग सोमण, सहसंचालक पुरुषोत्तम देवतळे, उपायुक्त प्रकाश देशमाने, सहाय्यक आयुक्त निता औघड आदी उपस्थित होते.

## आज अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा विधानसभेवर मोर्चा

**वर्धा-** अंगणवाडी कर्मचारी संघटना सिटूच्या वतीने राज्यव्यापी सेविका व मदतनिसांच्या प्रमुख मागण्या निकाली काढण्यासाठी आज शनिवार, १३ डिसेंबर रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनावर मोर्चा आयोजित आहे. बालभवन, शुक्रवारी तलाव, नागपूर येथून दुपारी १ वाजता मोर्चा निघणार आहे. यामध्ये अंगणवाडी सेविका व मदनिसांना १०० टक्के प्रोत्साहन भत्ता, ऑक्टोबर २०२४ पासून ऑक्टोबर २०२५ पर्यंत थकबाकीसह त्वरीत लागू करावा, सेविका व मदतनिसांना ग्रॅच्युईटी व मासिक पेन्शन लागू करा, मातृत्व वंदना योजनेच्या कामाचा मोबदला जाहीर करा व इतर प्रलंबित मागण्यांचा समावेश आहे. या मोर्चात जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनिसांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सिटूचे भैय्याजी देशकर, पांडुरंग राऊत, संघटनेच्या अध्यक्ष अर्चना मोकाशी, सचिव गुंफा कटारे, ममता खडतकर, संगीता कोहळे, उषा रामटेके, सविता जगताप, करूणा शंभरकर, जया इंगोले, कांता भोंडे, ललिता पुणेवार आदींनी केले आहे.

## किराणा दुकानावर पोलिसांचा छापा

**सिंदी (रेल्वे)** - बंदी असलेल्या नायलॉन मांजाच्या विक्रीवर पोलिसांनी मोठी कारवाई करत गणपत दाते (७०) यांच्या किराणा दुकानावर छापा टाकला. न्यू इंडिया कलर कॉटन थर्ड कंपनीच्या ३९ चक्री आणि मोनो कंपनीची १ चक्री असा एकूण १२,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शासनाने मांजा विक्रीवर बंदी घातली असतानाही विक्री सुरू असल्याची माहिती मिळून ही कारवाई करण्यात आली. प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून तपास सुरू आहे.

## जिन्यावरून पडून इसमाचा मृत्यू

**सेलू** - बोरखेडी कला येथील नरेश चापडे (४८) यांचा जिन्यावरून पडून मृत्यू झाल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे. घराजवळ श्वान हाकलत असताना ते जिन्यावरून खाली कोसळले आणि गंभीर जखमी झाले. तातडीने उपचारार्थ हलविण्यात आले; मात्र प्रकृती खालावल्याने त्यांचा मृत्यू झाला. सेलू पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## बस वाहकास प्रवाशांकडून मारहाण

**कारंजा (घाडगे)** - सार्वजनिक वाहतुकीतून प्रवास करणाऱ्या लोकांच्या अनुशासित वर्तनाबाबत सूचना करणे बस वाहकाला महागात पडले. धर्ती (हेटी) बस स्टॅण्डवर वाहक संदीप मोहोड (४४), रा. काटोल यांना दोन प्रवाशांनी बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले. बसमधील नववीतील विद्यार्थ्याने मध्येच उभे राहून इतर प्रवाशांना अडथळा निर्माण केला.

त्याला हटकल्यानंतर प्रज्वल वाघधरे याने शिवीगाळ केली. बस स्टॅण्डवर पोहोचताच सूरज मंडलवार हा देखील बसमध्ये घुसून दोघांनी मिळून वाहक मोहोड यांना मारहाण केली. शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी कारंजा पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

# पवनूरमध्ये संत पुंजाराम महाराज पुण्यतिथी महोत्सव

**वर्धा/जनमाध्यम**

तालुक्यातील धार्मिक दृष्ट्या मान्यताप्राप्त पवनूर गावात संत पुंजाराम महाराज पुण्यतिथी महोत्सवाचे भव्य आयोजन १५ आणि १६ डिसेंबरला करण्यात आले आहे. या दोन दिवसीय सोहळ्यासाठी गावात उत्साहाचे वातावरण आहे आणि पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

१५ डिसेंबर रोजी सकाळी ५ वाजता हभप अरुण वडनेरकर यांच्या हस्ते श्रींचा महाअभिषेक, तीर्थस्थापना व कलशस्थापना होणार आहे. दिवसभर रामधून, हरिपाठ, भजन, ग्रामसफाई, कीर्तन आणि नामसंकीर्तन यासारख्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १६ डिसेंबर रोजी



दुपारी हभप किसन कोंडलकर यांच्या हस्ते गोपाल काल्याचे कीर्तन व दहीहंडी उत्सव पार पडणार आहे. त्यानंतर श्रींची भव्य मिरवणूक व पालखी सोहळा निघणार असून सत्संग भजन मंडळ, शारदा महिला भजन मंडळ पवनूर, श्री गजानन महिला भजन मंडळ खैरी, गुरुदेव भजन मंडळ नर्सुला, आंजी मोठी व पुलई येथील भजन मंडळी, सरस्वती महिला भजन मंडळ तुळजापूर, शुभलक्ष्मी महिला भजन मंडळ मंडळांचा सहभाग राहणार आहे.

# मंत्री जयकुमार गोरे यांची तातडीने चौकशीची आदेश यंत्रणा सक्रिय

*बांधकाम कामगारांना ग्रामसेवकांकडून प्रमाणपत्र नाकारल्याचे गंभीर प्रकरण*

**नागपूर / वर्धा जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यातील बांधकाम व असंघटित कामगारांना ग्रामसेवकांकडून प्रमाणपत्र न देणे, अनावश्यक कागदपत्रांची मागणी करणे आणि कामात उडवाउडवीची भूमिका घेणे या गंभीर तक्रारी हिवाळी अधिवेशनादरम्यान राज्य सरकारसमोर मांडल्या गेल्या. या प्रकरणाची शासनाने तातडीने दखल घेत ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले आहेत.

स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांनी देवळी-पुलगाव मतदारसंघाचे आमदार राजेश बकाणे यांच्या उपस्थितीत नागपूर येथे मंत्री गोरे यांना सविस्तर निवेदन सादर केले. संघटनेचे कार्यकर्ते विक्की लसूणते, जयंत कावळे, जयंत येरावार, माधव वानखेडे, गिरीष कांबळे आदी यावेळी उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले की वर्धा जिल्ह्यातील अनेक ग्रामसेवक बांधकाम कामगारांना ओळख व वास्तवाच्या आधारावर दिले जाणारे प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करत आहेत. या प्रमाणपत्रांशिवाय कामगारांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही, त्यामुळे त्यांच्या उपजीविकेवर मोठा परिणाम होत आहे. काही ग्रामसेवकांकडून नियमबाह्य कागदपत्रांची मागणी केली जात असल्या चा आरोपही संघटनेने यावेळी केला. निवेदनाचा



आढावा घेत मंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निर्देश दिले की सर्व तक्रारींची तातडीने चौकशी करून सविस्तर अहवाल शासनाकडे सादर करावा. या आदेशामुळे जिल्हा प्रशासनावर आता कठोर तपासणीची जबाबदारी येऊन ठेपली आहे. संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर झालेली ही कारवाई कामगारांच्या संघर्षाचे महत्त्वपूर्ण यश ठरत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. उमेश अग्निहोत्री यांनी सांगितले की, बांधकाम कामगारांना महिनोमहिने प्रमाणपत्रांसाठी भटकंती करावी लागत होती. शासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने आता प्रशासनाला कारवाई अपरिहार्य होणार आहे. अधिवेशनात आमदार राजेशभाऊ बकाणे यांनीही या प्रश्नाला ठाम पाठींबा देत शासनाचे लक्ष वेधले.

त्यांच्या उपस्थितीमुळे प्रश्नाला अधिक बळ मिळाल्याचे संघटनात्मक सूत्रांनी नमूद केले. स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेने वर्धा जिल्ह्यातील सर्व कामगारांना आवाहन केले आहे की प्रमाणपत्र नाकारले जात आहे त्यांनी तत्काळ संघटनेशी संपर्क साधावा. संघटना कामगारांच्या पाठीशी नेहमीप्रमाणे भक्कमपणे उभी राहील.

# हिंगणघाट घरफोडी प्रकरण उघड

**वर्धा/जनमाध्यम**

हिंगणघाट येथील घरफोडी प्रकरणाचा वेगवान तपास करत स्थानिक गुन्हे शाखा वर्धाने चोरट्याला पकडत ५२,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. निकीता रवि भांगे (रा. डांगरी वार्ड) यांनी १८ नोव्हेंबर रोजी बाहेरगावी गेल्यानंतर त्यांच्या बंद घरातून सोन्याचे टॉप्स व १०,००० रोख रक्कम चोरीला गेल्याची तक्रार ५ डिसेंबर रोजी पोलीस स्टेशनमध्ये नोंद झाली. गुन्हा अज्ञात असल्याने थ्ँ ने समांतर तपास सुरू केला. गुप्त माहितीच्या आधारे नंदू राजू बोडे (वय २३) याला आठवडी



बाजारातून ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्या ताब्यातून सोन्याचे टॉप्स आणि रोख रक्कम मिळून एकूण ५२,५०० किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. आरोपी व मुद्देमाल पुढील तपासासाठी हिंगणघाट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.

# गावकऱ्यांचा संताप शिगेला मांडवा रोडची दुर्दशा

**वर्धा/जनमाध्यम**

झाडगाव परिसरातील ग्रामस्थांचा संयम अखेर तुटला असून मांडवा रोडची दशकभराची दुर्दशा लक्षात घेऊन नागरिकांनी आज प्रशासनाविरुद्ध आक्रमक पवित्रा घेत रास्ता रोको आंदोलन छेडणार असल्याचा इशारा दिला. अवैध वाहतूक, मोठे दगडी ट्रक आणि सततच्या भारवाहतूकीने डिग्रज-झाडगाव-बेळगाव-मांडवा हा संपूर्ण मार्ग खड्डेमय झाला आहे. रस्त्यावरील धोकादायक स्थितीचा नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून अपघातांची मालिका वाढण्याची भीती निर्माण झाली आहे.

गावकऱ्यांनी प्रशासनाला थेट सवाल केला, दहा वर्षांपासून रस्ता खराब, तक्रारी अन् मागण्या कितीही केल्या तरी प्रतिसाद शून्य आम्ही किती दिवस जीव धोक्यात ठेवायचा? विद्यार्थी, महिलावर्ग, रुग्णवाहिका आणि शेतकरी या रस्त्यावरून सुरक्षितपणे प्रवास करू शकत नसल्याने आज ग्रामस्थ मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. यावेळी नागरिकांनी स्पष्ट इशारा दिला की, जोपर्यंत रस्त्याचे काम तत्काल सुरू होत नाही, तोपर्यंत या मार्गावरून कोणत्याही प्रकारची वाहतूक होणार नाही, ग्रामस्थांच्या या ठाम भूमिकेमुळे प्रशासनावर तातडीने निर्णय घेण्याचा दबाव वाढला असून पुढील काही दिवसांत या मुद्द्यावर मोठी हालचाल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सुजातपूर ग्रामपंचायत अधिकाऱ्याच्या बदलीची ग्रामस्थांकडून मागणी

## तंटामुक्ती अध्यक्षांचा इशारा : बदली न झाल्यास ग्रामपंचायतीला कुलूप

**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**

सुजातपूर ग्रामपंचायतीतील वाढत्या गैरव्यवहारांवर संताप लेल्या ग्रामस्थांनी ग्रामपंचायत अधिकारी प्रफुल ठाकरे यांच्या तात्काळ बदलीसाठी गटविकास अधिकारी नागेश ढोरे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर केले आहे. गेल्या दोन वर्षांपासून ग्रामपंचायतीचे प्रमुख उपक्रम ठप्प असून ग्रामविकासाशी संबंधित अनेक मूलभूत कामांकडे अधिकारी ठाकरे यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सविस्तर वृत्त असे, की ग्रामपंचायत सुजातपूर तसेच सिरकुटणी या दोन गावांच्या





पंचायतीचा कारभार पाहणारे अधिकारी प्रफुल ठाकरे हे दोन वर्षांपासून प्रत्यक्ष कार्यालयात न येता आष्टी येथूनच काम पाहतात. ग्रामस्थांशी वारंवार उद्धट व अवमानकारक भाषेत वागणे, महिलांना योग्य प्रतिसाद न देणे, ग्रामपंचायत कार्यालयात सतत गैरहजर राहणे, यामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. दोन वर्षांपासून गावात एकाही ग्रामसभेचे आयोजन झाले नाही. महिलांची सभा घेतली गेली नाही. नाल्यांची साफसफाई न केल्याने सुजातपूरात घाणीचे साम्राज्य पसरले असून आरोग्यविषयक समस्या वाढल्या आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार १५व्या वित्त आयोग निधीचा योग्य उपयोग झाला नसून खर्चाबाबत विचारणा केली असता अधिकारी ग्रामस्थांना शिवीगाळ करतात. गावातील पाणी नायट्रेटमुळे पिण्यायोग्य नसल्याचे गेल्या अनेक चाचण्यांतून स्पष्ट झाले असून, यावर उपाय म्हणून आरओ योजनेच्या नावाखाली अनधिकृतरीत्या पैसे वसूल केल्याचा आरोप तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष प्रशांत ठाकरे यांनी केला. अधिकाऱ्याची बदली झाली नाही तर ग्रामपंचायतीला कुलूप ठोकण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला. या सर्व तक्रारींसह ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. ग्रामपंचायत अधिकारी बदलणे, वित्त आयोग निधीची तपासणी करणे तसेच गावातील पाणी गुणवत्तेची नव्याने चाचणी घेणे, या मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. निवेदन देताना प्रशांत ठाकरे, रवींद्र मिरगे, सुभाष हजारे, मंगेश नारंगे, रुपराव धोटे, अतुल मुडे, शरद उईके, तेजस उईके, संजय बोन्दरकर, पंडित धोटे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामस्थांनी दाखवलेला आक्रोश आणि अधिकाऱ्यावरील गंभीर आरोप यामुळे आता प्रशासन कोणती पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# आदर्श प्राथमिक शाळेसमोरील रुग्णवाहिकेमुळे विद्यार्थ्यांना त्रास

## शाळेच्या समोर कचऱ्याचे ढीग

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील आदर्श प्राथमिक शाळा ही अकोट रोडवरील मुख्य रोडवर असून नेहमी या परिसरात वाहनांची वर्दळ असते. अशातच विद्यार्थ्यांना सोडण्याकरीता आलेल्या पालकांच्या दुचाकीमुळे खूप मोठ्या प्रमाणात अडचणी येतात. पालकांच्या गाड्या लावण्याकरता जागा नाहीये. एकता हॉस्पिटल रुग्णालय नाव असलेली रुग्णवाहीका आदर्श प्राथमिक शाळेसमोर गेल्या कित्येक महिन्यांपासून उभी करून ठेवली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पालकांना व शाळेला नाहक त्रास होत आहे. याची जाणीव असून सुद्धा त्यांनी ही रुग्णवाहीका अजून



पर्यंत काढली नाही. कित्येक वेळा शाळा व्यवस्थापन च्या वतीने सदर रुग्णालयाला सुद्धा रुग्णवाहीका काढण्याबाबत कळविले मात्र त्यावर त्यांनी काही प्रत्युत्तर न देता मनमानी कारभार चालवला आहे. आता मात्र शाळेला रुग्णवाहिका काढण्यासाठी पोलिस स्टेशन मध्ये अर्ज देण्यात येणार असल्याचे बोलल्या जात आहे. शहरात शाळाचा जर अतिक्रमणाच्या विळख्यात असतील तर रस्त्यावरील



अपघात कसे कमी होणार, किती वेळा किरकोळ अपघात या शाळेसमोर घडले मात्र अजूनही अतिक्रमण असल्याचे चित्र दिसत आहे. यावर आता दर्यापूर पोलिस प्रशासन काय कारवाई करणार हे पाहणे योग्य ठरणार आहे.


> शाळेतर्फे सदर रुग्णालयाला बरेचदा निवेदन देऊन सुद्धा ती रुग्णवाहिका त्याठिकाणीच उभी आहे. परत त्यांना पत्र देण्यात येणार आहे.
>
> **-प्रतिभा शरद पांडव,**
> मुख्याध्यापिका, आदर्श प्राथमिक शाळा, दर्यापूर

# खामगाव अर्बन बँकेची ३.५४ कोटीने फसवणूक

## -दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

### गोदामात ठेवलेल्या मालाची केली विक्री

**अमरावती/प्रतिनिधीः-** खामगाव अर्बन को ऑपरेटिव बँकेत गहाण ठेवलेला मुद्देमाल ऋण न चुकवता परस्पर खरेदी-विक्री करून बँकेला ३ कोटी ५४ लाख ९० हजार ७६३ रुपयांनी फसविण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात बँकेकडून दीपक बाबाराव बांबल (वय ५२, दत्तविहार, अकोली रोड) यांच्या तक्रारी वरून बडनेरा पोलीस ठाण्यात आरोपी गौरव विजयकुमार मुंधडा (वय ३७, प्राईम अपारमेंट, शंकर नगर) व सुमित कांतीलाल भन्साली (वय ३७) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. तक्रारीनुसार गौरव मुंधडा यांनी बडनेरा मार्गावरील नेमानी गोदाम येथील वेगवेगळ्या वेअर हाऊस मध्ये ठेवलेले कृषी साहित्य यांची पावती दाखवून खामगाव अर्बन बँकेतून १ कोटी ४० लाख रुपयांचे ऋण घेतले होते. तसेच सुमित भन्साली यांनी नेमानी गोदाम येथे सोयाबीन आणि ढेप मोठ्या प्रमाणात ठेवले आहे, अशी पावती दाखवून २ कोटी ६२ लाख ८५ हजार ९२२ रुपयाचे ऋण बँकेकडून घेतले. कर्जाची परतफेड न करता गौरव मुंधडा यांनी गहाण ठेवलेल्या मुद्देमाला मधून ९२ लाख ४ हजार ७८१ रुपयांचे माल विक्री केला, तर सुमित भन्साली यांनी सुद्धा संगमनत करून परस्पर माल विकून टाकला. या संदर्भात माहिती मिळाल्यानंतर बँकेने दोन्ही आरोपींविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल केली.पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.




# कुलूप तोडून घरफोडी; शिराळ्यात १.७७ लाखांचा ऐवज लंपास

## -सोन्या-चांदीसह रोख रक्कम गायब

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिराळा परिसरात घरफोड्यांची मालिका सुरुच असताना आणखी एका गंभीर चोरीची घटना उघड झाली आहे. घराला कुलूप लावून बाहेर गेलेल्या दांपत्याच्या अनुपस्थितीत अज्ञात चोरट्यांनी घर फोडत सुमारे १,७७,५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

मारवाडीपुरा येथील रहिवासी रमन भागीरथ नावंदर (वय ६३) यांनी वलगाव पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार, ३ डिसेंबर रोजी रात्रीपासून १० डिसेंबर रात्रीपर्यंत ते दोघेही घराबाहेर होते. या काळात चोरट्यांनी संधी साधत घराच्या किचनच्या दारावरील कडी-कुलूप तोडून आत प्रवेश केला. १० डिसेंबर रोजी दांपत्य घरी परतताच त्यांच्या निदर्शनास कडी फुटलेली दिसली. घरात आत गेले असता सर्व सामान अस्ताव्यस्त, कपाटे उचकापाचक आणि लॉकर जबरदस्तीने फोडलेले दिसले. तपासात सोन्याचे व चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण १.७७ लाखांचा माल चोरीला गेल्याची खात्री झाली. वलगाव पोलिसांनी गुन्हा नोंद करून अज्ञात आरोपींचा शोध सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फूटेज तपासून चोरट्यांचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**FLAT SALE**
2 B.H.K.
सेमी फर्निचर
ग्राउंड फ्लोअर
श्री.रविराणा साहब के घर के पास
शंकर नगर रोड,
अमरावती
मो.नं.९०४९३२५४२०

# आदर्श शाळेतील विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः-** ११ डिसेंबर गुरुवार रोजी बाल शिक्षण मंडळ अंतर्गत आदर्श पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा खापर्डे बगीचा अमरावती शाळेतील विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन झाले. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या भारत देशात असणाऱ्या अनेक राज्यांमधील भाषेतून नृत्य सादर केले. बंगाल, दक्षिण भारत, गुजरात, महाराष्ट्र आसाम, पंजाब, काश्मीर या प्रांतांची वेशभूषा करून विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नृत्य सादर केलेत.

हिंद देश के निवासी सभी जन एक है
रंग रूप वेश भाषा चाहे अनेक है...



कार्यक्रमाच्या मध्यंतरात आदर्श शाळेतील शिक्षिका आकांक्षा कुणटरे हिचा कवयित्री म्हणून सत्कार करण्यात आला तसेच डॉ.कीर्ती पिंजरकर मॅडम यांच्या कौटिल्य प्रणित सुशासन आणि प्रशासन तंत्र पुस्तक प्रकाशन सोहळ्यानिमित्त त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. अहिल्याबाई होळकर पुरस्कार मिळविणाऱ्या मंजिरी महाजन यांचा देखील बाल शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ,सचिव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. इयत्ता पाचवी ते नववी तील अव्वल गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मंगेश सरांच्या मेहनतीमुळे विद्यार्थ्यांनीनी योगा प्रात्यक्षिक सादर केले.

योगा पाहताना प्रेक्षक वर्ग भारावून गेले होते.

मिले सुर मेरा तुम्हारा या देशभक्ती गीताने कार्यक्रमाचे सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमा पुंडलिक मॅडम तसेच रूपाली जोशी मॅडम यांनी केले. आभार प्रदर्शन आळशी मॅडम यांनी केले. कार्यक्रमासाठी मार्गदर्शन करणाऱ्या बाल शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष मनिषा आष्टीकर मॅडम ,सचिव एडवोकेट रचना पिंपळगावकर मॅडम ,शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच शिक्षक वृंद आवर्जून उपस्थित होते.

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्रीमती एस.एस.भिंगरदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - २७०२ /२०२५
श्री त्रंबक अधिक दोन विरुध्द निरंक
पुढील तारीख ०८.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Tryambak Malkarjun Lamdhade**, Age 78 yrs., Occu.- Nil R/o. Near Krushak Colony, Ram Nagar, Parag Township, Amravati, Tq. & Dist. Amravati
2) **Sadhana Ramappa Fitwe,** Age 46 yrs., Occu.- Household R/o. Om Shivgauri, Pundlik Nagar, Ward No.16, Chikhali Buldana
3) **Gajanan Tryambakappa Lamdhade** Age 49 yrs., Occu.- Pvt. Work R/o. Near Krushak Colony, Ram Nagar, Parag Township Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की,**मयत सुशिला त्रंबक लामधाडे हया दि.१४.०३.२०२५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार त्रंबक अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री त्रंबक अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २८.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - २४४५ /२०२५
पुष्पा व इतर विरुध्द निरंक
पुढील तारीख १२.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Pushpa Kishor Wasnik**, Age 54 yrs., Occu.- Household R/o. Congress Nagar Road, Near Bhandarkar STD Hamalpura , Amravati
2) **Sachin Kishor Vasnik ,** Age 30 yrs., Occu.- Labour R/o. Near Harihar Mangal Hamalpura, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत किशोर रामदास वासनिक व रामदास डोमाजी वासिक हे अनुक्रमे दि.१२.०२.२०२० व ३०.०९.२००३** रोजी अमरावती येथे मयत झाले.**अर्जदार पुष्पा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार पुष्पा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०६.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-१ यांचे न्यायालय**

मोटार अपघात दावा क्र.३७३/२०२२ — ने.ता. १६.१२.२०२५

पिटीशनर :- गिरीष अशोकराव वरघट

-- विरुध्द --

रिस्पाडंट :- ज्ञानेश्वर शामरावजी इंगोले व इतर

गैरअर्जदार :- १. डॉ.अनिल प्रेमचंद हरवाणी
२. संजय प्रेमचंद हरवाणी
सिंध गारमेंट, सिटी लॅण्ड, बोरगाव धर्माळे, अमरावती

**APPLICATION U/SEC/ 166 OF MOTOR VEHICLE ACT 1988 FOR GRANT OF COMPENSATON**

ज्याअर्थी वरील पिटीशनर **गिरीष अशोकराव वरघट,** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०१, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरिता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरिल अर्जदार १.डॉ.अनिल प्रेमचंद हरवाणी व २.संजय प्रेमचंद हरवाणी रा.अमरावती यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटिस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक **१६/१२/२०२५** रोजी सकाळी ११.०० वाजता **वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०१, अमरावती** यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे, वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक १०/१२/२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

अमरावती
दिनांक १०/१२/२०२५

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक (न्यायिक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

## -जाहीर नोटीस-

सर्वत्र जनतेस सुचित करण्यांत येते की, माझे पक्षकार श्रीमती लक्ष्मीबाई दिवाकर वानखडे, रा.चिंचोली गवळी, ता.मोर्शी, जि.अमरावती हिने विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी न्यायालयात रे.दि.मु.नं.१००/२०२५, श्रीमती लक्ष्मीबाई वानखडे - वि- दयानंद उत्तमराव शेंडे व इतर यांचे विरुध्द घोषणा व त्या अनुषंगाने कायम मनाई हुकूम मिळण्याकरिता वादग्रस्त मौजा चिंचोली गवळी ग्रामपंचायत हददीतील वार्ड नं.२ मधील घर क्रमांक १४४ (नविन घर क्रमांक १५९, नविन वार्ड क्र.१) या वादीच्या घराच्या पश्चिमेस असलेल्या सरकारी रस्त्यावर प्रतिवादीनी अनाधिकृतरित्या बेकायदेशिर बांधकाम केल्यामुळे व सदरचा रस्ता हा वादीचे व ईतर नागरिकांचे दैनंदिन वापरातील असल्याने प्रतिवादींनी सदरच्या रहदारीच्या रस्त्यावर अडथळा निर्माण केलेला आहे. तेव्हा सदर रहदारीच्या रस्त्याबाबत इतर नागरिकांचा किंवा लोकांचा हितसंबधं असल्यांस त्यांनी दिनांक १६/१२/२०२५ रोजी विद्यमान दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) मोर्शी येथील कोर्ट नं.१ मध्ये स्वतःहा किंवा त्यांचे वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे. सदर तारखेला आपण आपले म्हणणे सादर न केल्यास मग त्यानंतर आपला कोणताही उजर चालणार नाही किंवा आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतल्या जाणार नाही.

**दिनांक १२/१२/२०२५**

**स्वाक्षरी/-**
**ॲड.एन.एस.इंगळे**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, मोर्शी**
**ता.मोर्शी,जि. अमरावती,**
**मो.-९५०३९०५७२८**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२५४०/२०२५
**बेबी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१९.१२.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Bebi Golandas Pande, Age 57 Yrs. Occu.: Household R/o Rohankheda, Po.Nandgaon Peth, Tq.Dist.Amravati.
2. Amardip Golandas Pande, Age 32 Yrs. Occu.: Labour R/o Devra, Tq. Dist. Amravati.
3. Sidharth Golandas Pande, Age 38 Yrs. Occu.: Labour R/o Rohankheda, Devra, Tq. Dist. Amravati.
4. Vanita Sudhakar, Age 39 Yrs. Occu.: Household R/o A-442A/H-166, T-huts, Kathputli Colony, Pandav Nagar, Patel Nagar, Central Delhi.
5. Nikita Cheran More, Age 36 Yrs. Occu.: Household R/o Near Bhodha Vihar, Vitta Bhatti Parisar, Rahul Nagar, Amravati.
6. Rupika Mukesh Thorat, Age 35 Yrs. Occu.: Household R/o Rambari Ambedkar Nagar, V.M.V.Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गोलनदास आकोशी पांडे** हे दिनांक 22.01.2019 रोजी Amravati येथे मयत झाले. अर्जदार **बेबी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **बेबी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११.११.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **बबनराव भिमरावजी गावंडे,** रा.अचलपूर, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी दि.२९/०३/२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र. ११६५ नुसार मौजे -परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील नझुल शिट नं.१९-डी मधील नझुल प्लॉट नं. १७०/१ भाग ज्याचे क्षेत्रफळ २६५.७९ चौ.मि. व त्यावरील बांधकाम सह हा मनोजकुमार गुलाबचंदजी जोशी यांचे कडून विकत घेतला आहे.

हयाप्रमाणे सदर खरेदी दि.२९/०३/२०१० रोजीचे दस्त क्र.११६५ चे **मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकार बबनराव भिमरावजी गावंडे यांचे जवळ आहे. परंतु सदर मालमत्तेचे पूर्वीचे मुळ खरेदी दस्त जसे दि.२५/०४/२००६ रोजी दस्त अ.क्र.१२०५ चे दस्त **अ.क्र.१२०५ चे दस्त, हे या जाहीर सुचनेचा विषय असुन** सदर दस्ताचे मुळ खरेदीखत व त्याची पावती माझे पक्षकार यांचे कडून गहाळ झालेली आहे.

सदर हरविलेल्या दस्ताची रितसर दि.११/१२/२०२५ पोलीस स्टेशन परतवाडा येथे तक्रार दाखल केलेली आहे.

तरी सदर प्लॉट बाबत कोणाचोही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक १२/१२/२०२५
अमरावती.

ॲडव्होकेट
**राहुल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०

## जाहीर सुचना

आम जनतेस या जाहीर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **सय्यद जुनेद सय्यद साबीर,** रा.अमरावती यांच्या मालकीची मौजा - गंभीरपूर, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.५/१ मधील सब-डिव्हायडेड प्लॉट नं.३६/अ-१, क्षेत्रफळ ८५ चौ.मी. (९१४.६० चौ.फुट) ही मालमत्ता आहे. यासंबंधीत असलेले जुने खरेदीखत जे बुनादी **अब्दुल जब्बार** यांनी **सय्यद मुसा सय्यद गणी** यांच्याकडून दस्त नं.१३/२०१८ दि.०१.०१.२०१८ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय अमरावती शहर-२ मध्ये नोंदलेले मुळ खरेदीखत माझे पक्षकाराकडून हरविले आहे. त्यासंबंधी रितसर तकार सुध्दा माझे पक्षकार यांनी पोलीस स्टेशन राजापेठ येथे दिलेली आहे. तरी ज्या कुणाला सदर खरेदीखत सापडले असेल त्यांनी मला खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर किंवा पत्त्यावर संपर्क साधावा.

**कार्यालय - श्री** भागत नगर, यशवंत लॉनच्या मागे
साईनगर, अमरावती
मो.नं.९६६५७८६६७६

अमरावती
दिनांक १२.१२.२०२५

स्वाक्षरी/-
**(ॲड.पंकज एन.ठाकरे)**
साईनगर, अमरावती
मो.नं.९६६५७८६६७६

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७८६/२०२५
**सुनिल -वि- निरंक**
पुढील ता.१५.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Sunil Prahaladrao Kelkar, Age 60 Yrs. Occu.: Labour
2. Sanjay Prahaladrao Kelkar, Age 57 Yrs. Occu.: Service
3. Ravindra Prahaladrao Kelkar, Age 55 Yrs. Occu.: Service 1 to 3 R/o Mahavir Nagar, Amravati.
4. Sau.Jayashree Sushil Samundrawar, Age 49 Yrs. Occu.: Service R/o Datta Nagar, Parbhani, Dist.Parbhani.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **नामदेवराव रामुजी पिंजारकर व तुळसाबाई नामदेवराव पिंजारकर** हे अनुकमे दिनांक 16.11.2011 & 11.11.2017 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुनिल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनिल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०८.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७६६/२०२५
**सुनिल व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१४.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Sunil Prahaladrao Kelkar, Age 60 Yrs. Occu.: Labour
2. Sanjay Prahaladrao Kelkar, Age 57 Yrs. Occu.: Service
3. Ravindra Prahaladrao Kelkar, Age 55 Yrs. Occu.: Service 1 to 3 R/o Mahavir Nagar, Amravati.
4. Sau.Jayashree Sushil Samundrawar, Age 49 Yrs. Occu.: Service R/o Datta Nagar, Parbhani, Dist.Parbhani.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **प्रल्हादराव माधवराव केळकर आणि वनमाला प्रल्हादराव केळकर** हे अनुकमे दिनांक 12.01.2023 & 09.01.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुनिल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनिल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२६४२/२०२५
**शंकरराव -वि- निरंक**
पुढील ता.१९.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : १. शंकरराव सूर्यभानजी वासनिक
वय ५१ वर्षे, व्यवसाय - शेतकरी
रा.सुशील नगर, हनुमान मंदिराजवळ झोपडपट्टी, जि. अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रामकृष्ण सूर्यभानजी वासनिक** यांचे दिनांक **०२.०४.२००९** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार शंकरराव व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शंकरराव व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२६.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२७४५/२०२५
**पुष्पा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१२.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Pushpa Kishor Wasnik, Age 54 Yrs. Occu.: Household R/o Congress Nagar Road, Near Bhandarkar STD, Hamalpura, Amravati
2. Sachin Kishor Wasnik, Age 30 Yrs. Occu.: Labour R/o Near Harihar Mangal Karyalaya, Hamalpura, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत किशोर रामदास वासनिक व रामदास डोमाजी वासनिक** हे अनुकमे यांचे दिनांक **१२.०२.२०२० व ३०.०९.२००३** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार पुष्पा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पुष्पा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०६.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ९६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

प्रशासनाविरुद्ध करणार आंदोलन


# अतिवृष्टीनंतर आता चोरट्यांचा डल्ला; शेतातून कापूस नेला चोरून

## शेतकरी त्रस्त - आसेगाव शिवारातील घटना

**आसेगाव पूर्णा/ वार्ताहर**

दुष्काळ, अतिवृष्टी संकटांनी हैराण झालेल्या शेतकऱ्यांच्या माथी आता चोरट्यांचे संकट ओढावले आहे. तालुक्यातील आसेगाव पूर्णा शिवारात घडलेल्या घटनेत चोरट्यांनी रात्रीच्या वेळी शेतातील वेचणीला आलेला कापूस वेचून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या चोरीमुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

येथील शेतकरी मधुकर नामदेवराव पाटील यांनी गोविंदपुर फाट्यावरील त्यांच्या शेतजमिनीवर कापसाची लागवड केली होती. शेतातील कापूस वेचण्यायोग्य स्थितीत आला होता. मात्र, बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी शेतात प्रवेश करून रस्त्याच्या भागातील कापूस वेचून गायब केल्याचे उघड झाले. गुरुवारी सकाळी शेतकरी पाटील शेतात गेले असता रस्त्या जवळील भागातील कापूस पीक



ओसाड दिसले. झाडांवरचा कापूस चोरट्यांनी वेचून नेल्याचे लक्षात येताच त्यांनी आसेगाव पोलिसात तक्रार दिली. या घटनेमुळे शेतकरी पाटील याचे जवळपास १० ते १५ हजार रुपयांचे नुकसान झाले असल्याचा अंदाज आहे. आधीच दुष्काळ, अतिवृष्टी आणि कापसाच्या भावातील चढउतारामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आता या चोरीने आणखी फटका बसला आहे. या घटनेनंतर शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

चोरट्यांचा बंदोबस्त लावण्याची मागणी- परिसरात रात्रीतून शेतकऱ्यांच्या शेतात उभ्या असलेल्या पांढऱ्या सोन्यावर अर्थात कपाशीवर भुरटे चोर डल्ला मारला.

अवकाळी पावसातून वाचवलेल्या पिकांचा हाता तोंडी आलेला घास चोरीला जात असल्यामुळे शेतकरी हवालदील झाला आहेत. या भुरट्या चोरांचा पोलिसानी बंदोबस्त करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.


# चांदूर रेल्वे-नांदगाव खंडेश्वर रस्त्याची दुर्दशा

## 'रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता ?' धुळी मुळे दुचाकी चालक

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

चांदूर रेल्वे ते नांदगाव खंडेश्वर या महत्त्वाच्या मार्गाची दुरवस्था दिवसेंदिवस भीषण होत चालली आहे. 'रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता?' असा संभ्रम निर्माण करणाऱ्या या मार्गाने आता नागरिकांचा संयम संपुष्टात आणला आहे.

या रस्त्यावरून दिवसेंदिवस हजारो दुचाकी, चारचाकी आणि मालवाहू वाहने धावतात. परंतु रस्त्यामध्ये ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे, तर काही ठिकाणी पाईप बसवण्यासाठी खणलेल्या जागी उंचवटे तयार झाल्याने वाहनचालकांची अक्षरशः सर्कस



सुरू आहे. धुळीमुळे दुचाकीस्वारांचे डोळे मोठे त्रासले जात आहेत. वाहनांचे ब्रेक, सस्पेन्शन, टायरही जास्त प्रमाणात खराब होत असल्याने नागरिकांच्या खिशावरही मोठा आर्थिक बोजा पडत आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठे पाईप टाकण्यासाठी रस्ता उकरला, पण नंतर मुरुम टाकून काम उडवले. जेथे पाईप पाडले तेथेच डोंगराएवढे उंचवटे तयार झाले. मोठी वाहने गेल्यानंतर उडणारी धूळ तर इतकी की समोरचे वाहन दिसेनासे. या उंचवट्यांवरून जाणे म्हणजे गाडीची कसरत आणि चालकाची परीक्षा! कुऱ्हा – चांदूर रेल्वे – नांदगाव खंडेश्वर हा रस्ता नव्याने बनणार असल्याची माहिती मिळाली असली तरी त्याची निश्चित वेळमर्यादा मात्र शून्य. 'नवीन रस्ता होईल तेव्हा होईल, पण तोपर्यंत आम्ही खड्ड्यांतूनच प्रवास करायचा का?' असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे.नवीन रस्त्याचा प्रकल्प हा दीर्घकालीन असला तरी, किमान तात्पुरती डांबरीकरण-डागडूजी करावी, जेणेकरून नागरिकांना हा त्रास सहन करावा लागू नये, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ, लहान व्यापारी आणि नियमित प्रवासी यांनी केली आहे.

## आदर्श विद्यार्थी प्रबोधन माला

**अचलपूर-** विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासाच्या आदर्श वेळापत्रकाप्रमाणे अभ्यास करणे आवश्यक आहे.वाचन करताना मनवाचन, मौनवाचन, नेत्रवाचन, चित्रवाचन या वाचनाच्या प्रकारानुसार वाचन केल्यास वाचन केलेल्या प्रश्नांची उत्तरे दीर्घकाळ लक्षात राहतात.

अभ्यासानंतर एका गुणाला ९९ सेकंद याप्रमाणे प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा सराव विद्यार्थ्यांनी करावा.अभ्यास करताना न्यूनगंडाची भावना मनातून काढून आत्मविश्वास जागृत करणे व मनाची एकाग्रता आवश्यक आहे; असे प्रतिपादन विद्यार्थीप्रबोधनकर्ते प्रा.अरुण बुंदेले यांनी केले. श्री जगदंब विणकर शिक्षण संस्था, अचलपूर द्वारा संचालित श्री जगदंब विद्यालय, अचलपूर येथे मैनाबाई बुंदेले स्मृती प्रतिष्ठान द्वारा आयोजित स्वनिर्मित आदर्श विद्यार्थी प्रबोधन माला हा विद्यार्थ्यांच्या गुणवृद्धिचा कार्यक्रम सादर करताना प्रमुख वक्ते पदावरून विचार व्यक्त करीत होते.

प्रबोधनमालेच्या अध्यक्षा मुख्याध्यापिका रजनी हेडाऊ होत्या.प्रमुख वक्ते अभंगकार व साहित्यिक प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले तर प्रमुख अतिथी पर्यवेक्षक हितेंद्र नाकिल होते. विद्यार्थी प्रबोधन मालेच्या ३५ मुद्यातून प्रा.बुंदेले यांनी केले .

## बडनेरा परिसरात मनपाची प्लास्टिक - जप्ती मोहीम

### नियमभंग करणाऱ्या डेअरीवर ५,००० दंड

**अमरावती** - महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव आणि सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे (झोन क्र. ४) यांच्या मार्गदर्शनाखाली आज झोन क्र. ४ अंतर्गत बडनेरा रोड व साईनगर परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी मोहिम राबविण्यात आली.




मोहिमेदरम्यान एकूण २ चौपाटी, २ मंगल कार्यालये आणि ३० आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान श्री राधे राधे दुध डेअरी या आस्थापनात ५० मायक्रोनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पन्नीचे १/२ पॅकेट आढळून आले. पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित आस्थापनावर ५,००० इतका दंड आकारण्यात आला. या मोहिमेत ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक शारदा गुल्हाने, प्लास्टिक निर्मूलन नोडल अधिकारी विनोद टांक, स्वास्थ्य निरीक्षक अनिल गोहर, सोपान माहुलकर, प्रियंका बैस, वैभव खरड, सुमेध मेश्राम आणि यश सावरकर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महानगरपालिकेकडून परिसरातील प्लास्टिक वापर नियंत्रित करण्यासाठी अशाप्रकारच्या मोहिमा पुढेही राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

# उल्लेखनीय कार्याबद्दल शिक्षकांचा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून सन्मान

**अमरावती/ का.प्र.**

अमरावती जिल्हा परीषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रमांतर्गत शिक्षक, शाळा व केंद्रप्रमुखांचा त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सत्कार करण्यात आला.यात अमरावती जिल्हातील २७शिक्षकांचा सहभाग होता.



## जिल्हातील २७शिक्षकांचा गौरव

हा कार्यक्रम जिल्हा परिषद अमरावती व ओपन लिंक्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय शिक्षणात गुणवत्ता, नवोपक्रम आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढविण्याच्या उद्देशाने राबविला जात आहे. कार्यक्रमातील मुख्य आकर्षण म्हणजे शिक्षकांनी आपल्या शाळेत राबविलेल्या नवोपक्रमांचे विनोबा ॲपवर शेअरिंग, तसेच महिन्याला उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा तालुका व जिल्हा स्तरावर सन्मान.याच कार्यक्रमात मिशन १०० अंतर्गत ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती सराव चाचणी २ मधील जिल्ह्यातील टॉप ६ शाळांना देखील गौरविण्यात आले. तसेच विनोबा ॲपवरील लीडरबोर्डमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षक, शाळा, केंद्रे व केंद्रप्रमुखांनाही विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. तसेच त्यांनी आपल्या शाळाभेटीतील अनुभव शेअर करत शिक्षकांना विद्यार्थ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने कार्य करण्याचा संदेश दिलाकार्यक्रमास शिक्षणाधिकारी (प्रा.) सतीश मुगल, उपशिक्षणाधिकारी (परीक्षा विधी) प्रेरक उजगारे, श्वेता गोळे, शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण खांडेकर, जिल्हा प्रकल्प अधिकारी सागर गजभिये, उत्कर्ष मेश्राम तसेच २७ शिक्षक आणि केंद्रप्रमुख उपस्थित होते. हा उपक्रम शिक्षकांमध्ये उत्साह निर्मिती करून शिक्षण क्षेत्रात नव्या शक्यता निर्माण करणारा ठरत आहे.

# नांदगाव पेठमध्ये दोन दशकानंतर शंकरपटाचे धमाकेदार पुनरागमन

**नांदगाव पेठ/ वार्ताहर**

ग्रामदैवत संत श्री काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवा निमित्त नांदगाव पेठ परिसरात दोन तपानंतर पुन्हा एकदा भव्य शंकरपटाचे आयोजन होत असून, या पारंपरिक स्पर्धेच्या भव्य स्वागतासाठी संपूर्ण गाव सज्ज झाले आहे. युवा शेतकरी मित्र परिवार, नांदगाव पेठ व स्व. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने २१ व २२ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या या शंकरपटाच्या तयारीची गुरुवारी विधिवत सुरूवात करण्यात आली.



## संत श्री काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आयोजन

पुसदकर महाविद्यालयासमोरच्या विशाल मैदानात स्व. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व भाजप जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांच्या हस्ते संत काशिनाथ महाराज तसेच संत गजानन महाराज यांच्या प्रतिमेचे तसेच बैलजोडीचे पूजन करून मैदानाचे भूमिपूजन करण्यात आले.

धार्मिकता, परंपरा आणि कृषिसंस्कृतीचा मिलाफ घडवणाऱ्या या सोहळ्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले.यातील विशेष आकर्षण म्हणजे लाखो रुपयांची बक्षिसांची आकर्षक लयलूट, ज्यामुळे जिल्हाभरातील बैलगाडी मालक, शेतकरी आणि रसिक प्रेक्षक शंकरपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. या पूजन सोहळ्याला महाराज सुनील धर्माळे, वीरेंद्र लंगडे, करण मांडवकर, राजेंद्र तुळे, आकाश गुल्हाने, संजय भटकर, हरिदास कापडे, अतुल हटवार, भूषण तुळे, शाम तायडे, अक्षय डाकोरे, अंकुश बोबडे, निलेश कळस्कर, जय सुरजूसे, बाबू बोरकर, वैभव धर्मे, रुपेश इंगळे, ऋषिकेश मुळे यांच्यासह परिसरातील शेतकरी बांधव आणि तरुणाई मोठ्या संख्येने उपस्थित होते.संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने होत असलेला हा ऐतिहासिक आणि भव्य शंकरपट नांदगाव पेठच्या सांस्कृतिक आणि कृषिपरंपरेला नवचैतन्य देणारा ठरणार असून, येत्या २१ व २२ डिसेंबर रोजी होणाऱ्या या शंकरपटात धुरकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीचे रुपेश इंगळे, भूषण तुळे, अक्षय डाखोडे, अंकुश बोबडे, अतुल हटवार, वैभव धर्मे, श्याम तायडे, चरणभाऊ खराटे, ज्ञानेश्वर ढेंगे, भास्कर राजुरकर यांनी केले आहे.

## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ फुटबॉल (पुरुष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

**अमरावती/ का.प्र.**

पारूल युनिर्व्हसिटी, वडोदरा (गुजरात) येथे ०५ ते ११ जानेवारी, २०२६ दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ फुटबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हाचा ऋतिक अतकर, प्रज्योत तायडे व ओम काशिकर, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा राज मिश्रा, दुकीवाकोरही, ओमहांग सुब्बा, झाकीएसटुओ केट्स, राहुल कुमार, पालडेन धोंडुप, अफर्मिंग तलंग व सोनम तमंग, दयाभाई पटेल शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळचा मोर्विन मोसेस, जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा साहिल बेनिवाले, सुफियान अब्दुल व फैझल शेख, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा ओम धारव, मुस्तफा शेख, इंदिरा गांधी महाविद्यालय, राळेगांवचा अभिषेक बुटके व यश यादव, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा रोमान खान, रियाज चौधरी व तुषार लोखंडे, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा रफिक खान, जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळचा कैवल्य राठोड आणि श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा निखिल गोंडे याचा समावेश आहे.निवड झालेल्या संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे दि. २४ डिसेंबर, २०२५ ते ०२ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे.

# संक्षिप्त

## जागतिक मानवाधिकार दिन

**आसेगाव पूर्णा -** छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पूर्णा राज्यशास्त्र विभागाद्वारे आयोजित जागतिक मानवाधिकार दिन झाला, मानवाधिकार म्हणजे जगातील प्रत्येक व्यक्तीचे एक माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे. आज जागतिक मानवी हक्काच्या जाहीरनाम्याला ७७ वर्षे पूर्ण होत आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.रविंद्र इचे यांनी आपले अधिकार व कर्तव्य कोणते आहे यावर प्रकाश टाकला, कार्यक्रमाचे मार्गदर्शक डॉ.आशिष काळे यांनी याप्रसंगी सांगितले की मानवी हक्क कोणत्याही व्यक्तीस राज्याने किंवा समाजाने दिलेले नाही तर प्रत्येक व्यक्तीस हक्क निसर्गतः जन्माबरोबरच प्राप्त झालेले असतात, आजही ग्रामीण भागात आपल्या अधिकाराचा, कर्तव्याचा व शिक्षणाचा अभाव दिसून येतो.आज मानवी हक्क दिवस जगाला सहिष्णुता, बंधुता, आणि एकतेचा संदेश देते असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विराज रेखे, आभार प्रशांत बोरखडे यांनी केले, या कार्यक्रमाला गोपाल पवार, विक्की पवार रासेयो स्वयंसेवक विध्यार्थी गावातील समस्त नागरिक उपस्थित होते.



## जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेत पालक सभा

**लेहेगाव -** सावरखेड. पिंगळाई जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा येथे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांची पालक सभा आयोजित करण्यात आली होती. सभेला शाळेचे मुख्याध्यापक राजीव चव्हाण यांनी जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना मिळणारे लाभ व लाभाच्या योजना, विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती, शाळेचा शैक्षणिक दर्जा, शाळेबाबतचे भविष्यातील असलेले नियोजन, शाळेतून होत असलेला विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, अध्ययन निष्पत्ती नुसार होत असलेले अध्ययन अध्यापन, शाळेतील भौतिक सुविधा, नुकतेच शाळेमध्ये निर्माण होत असलेली कम्प्युटर लॅब, शालेय पोषण आहार इत्यादी विषयांवर पालकांना माहिती देऊन अवगत केले.शाळेतील शिक्षिका संगीता पोहरे यांनी शिक्षणात आईची भूमिका, अभ्यासाचे महत्त्व, स्पर्धेच्या युगात विद्यार्थी टिकावा यासाठीचे प्रयत्न त्यात पालकांची भूमिका यावर माहिती दिली. तसेच सुषमा इसड सहाय्यक शिक्षिका यांनी मराठी शाळेचे महत्त्व विशद करताना जास्तीत जास्त आयएएस अधिकारी हे जिल्हा परिषद शाळेतूनच प्राथमिक शिक्षण घेऊन झाल्याचे निदर्शनास आणून दिले.सोबतच जिल्हा परिषदेच्या शाळा जिवंत ठेवणे तिथली पटसंख्या वाढवणे हे ग्रामीण भागातील जनतेसाठी आजची खरी गरज असल्याचे विशद केले. तसेच शाळेला १००१ रुपये दिले.पालक सभेचे अध्यक्ष स्थान पत्रकार कैलाससिह ठाकुर यांनी भूषविले. सभेला पालकांची विशेष करून महिला पालकांची जास्त उपस्थिती होती.सभेचे संचालन संगीता जयंत पोहरे यांनी तर आभार प्रदर्शन सुषमा इसड यांनी केले. पालक सभेच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक राजीव चव्हाण यांचे मार्गदर्शनात जयंत पोहरे, सविता महल्ले, वंदना पूसदेकर, विजय ठाकूर यांनी सहकार्य केले.



## कोषागाराच्या सात सेवा लोकसेवा हक्क अधिनियमात अधिसुचित

**अमरावती -** संचालनालय लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य मुंबई; अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई व जिल्हा कोषागार कार्यालय यांच्या कार्यालयाने पात्र व्यक्तींना विहित कालमर्यादेत द्यावयाच्या सात सेवांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चे कलम ३ मधील तरतुदी नुसार वित्त विभागाने अधिसूचना क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क.४७/कोषा प्रशा- ५ अन्वये अधिसूचित केलेले आहे. सदर सेवा देण्याऱ्या पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वित्तीय अपिलीय अधिकारी यांचाही तपशिल अधिसूचनेत देण्यात आला आहे. सदर सेवा निवृत्तीवेतन व कुटूंबनिवृत्तीवेतन धारकासंबंधित आहे. सदर अधिसूचना https://sevaarth.mahakosh.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून पात्र व्यक्तींनी त्यांना आवश्यक असलेल्या सेवा संबंधित पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यात याव्यात. प्रथम व द्वितीय अपिल नंतरही अधिसूचित सेवा प्राप्त न झाल्यास तृत्तीय अपिल राज्य सेवा हक्क आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्याकडे दाखल करु शकता असे उपसचिव, राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती यांनी कळविले आहे.

## प्रभाकरराव अकोलकर यांचे निधन

**नांदगाव पेठ -** योगप्रशिक्षक, शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त अधीक्षक आणि शिक्षक कॉलनीच्या स्थापनेत मोलाची भूमिका बजावणारे प्रभाकरराव रामचंद्रजी अकोलकर (वय ८३) यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी निधन झाले. अकोलकर यांनी एकूण ३८ वर्षे शिक्षक ते अधीक्षक पदावर कार्यरत राहून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली. नांदगाव पेठ येथील जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात त्यांनी दीर्घकाळ कर्तव्य बजावले. सन २००० साली अधीक्षक पदावरून ते निवृत्त झाले.त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली असून विविध क्षेत्रांतून त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे.शुक्रवारी सकाळी दहा वाजता स्थानिक मोक्षधाम मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले.



## बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या वतीने महामानवास अभिवादन

**आसेगाव पूर्णा-** राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन रोजी बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या वतीने त्यांना मानवंदना देण्यात आली.मनोजभाऊ चव्हाण यांच्या नेतृत्वातील संघटनेच्या शिष्टमंडळाने असदपूर, शहापूर, सावळापूर, वासनी बोरगांव दुरी, बोरगांव पेठ, बोपापूर अशा अनेक प्रकल्पग्रस्त गावांमध्ये जाऊन महामानवाच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करुन गावातील उपासक बंधू भगिनींना मनोज दादा चव्हाण यांनी बाबासाहेबांचे जिवनचरीत्र व त्यांनी दिलेल्या जागतिक स्तरावर उच्च दर्जाचे महत्त्व प्राप्त अशा राज्य घटनेच्या संदर्भात उपस्थित बंधू भगिनींना मार्गदर्शन केले.यावेळी संघटनेचे राजुभाऊ लोणकर, सचिनभाऊ ढवळे, संतोष भाऊ नितनवरे, गजानन चिमोटे, दिनेश बड, प्रकाश नांदणे, अभिजित गैरवाल, साहेबराव नितनवरे, उषाबाई नवाळे, बार्ला गोदे, साहेबराव थोरात, आशाताई राऊत, संतोष भाऊ वर्धे, गजानन ठाकरे, राहूल अतकरे, तथा शेकडो बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार'

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांची पत्रकार परिषदेत घोषणा

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे दिल्या जाणारा या वर्षीचा 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार २०२५' महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.देवेन्द्र फडणवीस यांना त्यांच्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कार्यासाठी देण्यात येणार आहे. रु.पाच लक्ष रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या दि.२७ डिसेंबर २०२५ ला आयोजित १२७ व्या जयंती उत्सवाच्या मुख्य समारंभात या पुरस्काराने मुख्यमंत्र्यांना सन्मानित करण्यात येणार असून त्यांनी या समारंभाला उपस्थित



राहून पुरस्कार स्वीकारण्याचे मान्य केले आहे, अशी माहिती श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी दिली.

श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात जयंती उत्सवाचा मुख्य समारंभ होणार असून केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव, महाराष्ट्राचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे, शालेय शिक्षण राज्यमंत्री ना.पंकज भोयर, राज्यसभा सदस्य खासदार डॉ.अनिल बोंडे, अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, आमदार सुलभा खोडके, विधान परिषद सदस्य आमदार संजय खोडके, आमदार प्रताप अडसड, आमदार रणधीर सावरकर या सोहळ्याला प्रामुख्याने उपस्थित राहतील, असेही त्यांनी सांगितले.

जयंती उत्सवाच्या मुख्य समारंभात खासदार शरदचंद्र पवार यांनी दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील उत्कृष्ट शेतकरी महिलेला 'शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार २०२५' आणि केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांनी दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील पुरुष शेतकऱ्याला 'स्व.शरद जोशी उत्कृष्ट पुरुष शेतकरी पुरस्कार' हे दोन पुरस्कार देखील वितरीत करण्यात येतील. रोख रु.१,११,१११/- (रुपये एक लक्ष अकरा हजार एकशे ☞(पान २ वर)

# शहरातील विकासकामे पूर्ण करताना उपयुक्ततेवर भर द्या -मुख्यमंत्री

## अमरावती महानगरपालिकेच्या विविध प्रश्नांबाबत आढावा



**नागपूर/प्रतिनिधीः-** शहरातील विविध विकासकामे करताना त्याची भविष्यकालीन उपयुक्तता लक्षात घेऊन प्रकल्पांची निवड करावी. सद्यस्थितीत अपूर्ण असलेल्या प्रकल्पांसाठी जिल्हा नियोजन समिती योजनेतून निधीची तरतूद करून पूर्णत्वास न्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

विधान भवन येथे अमरावती महापालिकेच्या विविध प्रश्नांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आमदार रवी राणा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, ऊर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, अमरावती विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अमरावती शहरातील विविध विकासकामे कार्यान्वित करताना आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन दिला जाईल. परंतु, निवड केलेले प्रकल्प हे भविष्यकालीन परिस्थिती लक्षात घेऊन निवडावे. शहरातील राजकमल रेल्वे ओव्हर ब्रीज ☞(पान २ वर)

# गावतळ्याजवळ मानवी शरीराचे आढळले अवशेष

## -रामागड लाजूरकर परिसरातील घटना

**खल्लार/प्रतिनिधीः-** येवदा पोलिस स्टेशन हद्दीतील रामतीर्थ गावाजवळील रामागड लाजूरकर परिसरात आज (दि. १२) सकाळी सुमारास मानवी स्त्रीची कवटी व हाडे आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी अंदाजे ९ वाजताच्या सुमारास गावातील एक व्यक्ती जनावरे चारण्यासाठी शेततळ्याजवळ गेला असता त्याला मानवी कवटी व हाडे दिसून आली. याची माहिती त्याने गावातील पोलीस पाटलांना दिली. पोलिस पाटलांनी तत्काळ येवदा पोलीस स्टेशनला कळविले.



त्यानंतर येवदा पोलिस स्टेशनचे ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पुढे डी.वाय.एस.पी. सतीश कुलकर्णी तसेच अमरावती येथून एल.सी.बी. पथक आणि फॉरेन्सिक लॅबची टीम घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी सर्व हाडे ताब्यात घेऊन डीएनए परीक्षणासाठी पाठविली. या प्रकरणाचा पुढील तपास डी.वाय.एस.पी. यांच्या मार्गदर्शनाखाली येवदा ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर व त्यांची टीम करीत आहे.

यापूर्वीही जवळपास दीड महिन्यापूर्वी याच पोलिस स्टेशनच्या हद्दीत मानवी सांगाडा आढळला होता व त्याची ओळख पटली होती. आता पुन्हा मानवी अवशेष सापडल्याने हा खून आहे की आत्महत्या, याविषयीचे रहस्य अद्याप कायम आहे.

# भावाने आपली किडनी देऊन वाचविले भावाचे प्राण

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ( सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल अमरावती येथे ६३ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.



सदर रुग्ण हा किडनी आजाराने त्रस्त असल्याने त्यासाठी बाहेर उपचार पद्धती चालू होती व २ वर्षांपासून डायलिसिस करत होता . तेव्हा डॉक्टरांनी रुग्णास व त्याच्या कुटुंबीयास किडनी प्रत्यारोपण विषयी माहिती दिली व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ,अमरावती येथे होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी माहिती दिली. तेव्हा आज रुग्णालयात झालेले ६३ वे किडनी प्रत्यारोपण, हे ३३ वर्षीय शेख नईम शेख रहमान यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. सदर ☞(पान २ वर)

# भाजपा तर्फे मनपा निवडणूककरिता इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपा अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने टप्पा टप्प्याने तयारी सुरू करण्यात आली आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात संपूर्ण प्रभागात निरीक्षकांनी प्रभाग निहाय पदाधिकाऱ्यांचे मत नोंदवून घेतले, दुसऱ्या टप्प्यात इच्छुक उमेदवार अर्ज वितरण दिनांक १० डिसेंबर ते १२ डिसेंबर २०२५ असे सतत ३ दिवस सुरू होते.

यामध्ये एकूण ६४१ इच्छुकांनी भाजपा तर्फे इच्छुक उमेदवार म्हणून इच्छा व्यक्त करत अर्ज उचलले आहेत,आता तसऱ्या व महत्त्वपूर्ण टप्प्यात सर्व इच्छुकांच्या प्रत्यक्ष मुलाखत होणार असून तसा कार्यक्रम भाजपा तर्फे जाहीर करण्यात आलेला आहे. भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण , अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री व स्थानिक स्वराज्य संस्था भाजपा राज्य निवडणूक प्रमुख चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हा निवडणूक प्रभारी संजय कुटे, यांच्या सूचनेनुसार अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष डॉ नितीन धांडे यांच्या अध्यक्षतेमध्ये ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केल्या जाणार आहे.

शनिवार दिनांक १३ डिसेंबर सकाळी १० वाजता पासून स्थानिक लक्ष्मण स्मृती भाजपा कार्यालय राजापेठ अमरावती येथे मुलाखतीला सुरुवात होणार आहे.

वेळापत्रक खालील प्रमाणे.:-

१) शनिवार दिनांक १३ डिसेंबर २०२५, प्रभाग क्रमांक १,२,३,५,६,७,८,९, २) रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५, ☞(पान २ वर)

# १९२ कोटींचे एमडी प्रकरण : वर्धा पोलिसांचा खरा चेहरा केला उघडा

### -पोलीस अधिक्षक अडचणीत; गृहराज्यमंत्र्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात!

**वर्धा रवींद्र लाखे : -** वर्धा जिल्ह्यात १९२ कोटी रुपयांच्या अवैध एमडी (मिथाइल डायलेमिथिलएमेथॅम्फेटामाइन) कारखान्याचा पर्दाफाश झाला आणि संपूर्ण जिल्हा हादरला आहे. दीड वर्षे सुरू असलेला हा भलामोठा ड्रग्ज कारखाना पोलिसांच्या नजरेआड कसा राहिला, ?



जिल्ह्यात दारू विकणाऱ्या ठिकाणापासून छोट्या गावातील बेकायदेशीर धंद्यापर्यंत प्रत्येक हालचालीवर नजर ठेवणारे वर्धा जिल्हा पोलीस. कोणत्या गल्लीमध्ये कोणाचा अड्डा, कोणत्या चौकात कोण रात्री 'डिलिव्हरी' देतो, हे सर्व तोंडपाठ असलेल्या या यंत्रणेला मात्र तब्बल १९२ कोटींचा एमडी कारखाना दीड वर्षे दिसला कसा नाही,

यावरून नागरिकांत संताप उसळला असून, संपूर्ण जिल्हाभर एकच प्रश्न उपस्थित होते ही निष्काळजीपणा की कोणाचे तरी संरक्षण? याचे उत्तर मात्र कोणी देत नाही. पोलीस अधीक्षक आता तपासाच्या भोवऱ्यात गुरफटले असून जिल्ह्यातील पोलिस यंत्रणेवर पुन्हा एकदा अविश्वासाचे ढग दाटू लागले आहेत. गंजलेली गुप्तहेर यंत्रणा दारूबाजांच्या गल्लीपर्यंत दृष्टी, तर १९२ कोटींचा कारखाना अडचणीचा?

वर्ध्यातील पोलिस गुप्तहेरांची जागरूकता म्हणजे प्रसिद्ध विनोदच ☞(पान २ वर)

# 'ऑपरेशन प्रहार'चा डबल धमाका

# अकोला पोलिसांची जीवघेण्या नायलॉन मांजा विक्रेत्यांवर कारवाई

### -एकूण ६.३९ लाखांचा मुद्देमाल जप्त; दोन अटक, एक फरार

**अकोला/प्रतिनिधीः-** शहरात प्रतिबंधित चायनिज नायलॉन मांजाचा वाढता कहर, नागरिकांचे चिरलेले गळे, मृत पक्षी आणि वाढणारे अपघात या सर्वांच्या पार्श्वभूमीवर अकोला पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत सलग दोन अचूक, भेदक आणि टोकदार कारवाया करून काळाबाजाऱ्यांची कंबर मोडली. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या कठोर निर्देशांनुसार दोन पथकांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकत मिळून तब्बल



६.३९ लाख रुपये किंमतीचा प्रतिबंधित मांजाचा खजिना उधळला.

ही केवळ जप्ती नव्हे तर हा जीवाशी खेळणाऱ्यांविरोधात अकोला पोलिसांनी उभारलेला कठोर कायदेशीर बुरुज आहे.

यामध्ये प्रथम कारवाई रामपिर नगर येथे ११ डिसेंबर रोजी



पहिली धाड. या कारवाईत १०० प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या डाबकी रोड, खैर मोहमंद प्लॉट, रामपिर नगर येथे स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार रील्स, किंमत १,००,००० जप्त करण्यात आले.

या धाडीत पीएसआय गोपाल जाधव, माजीद पठाण, सुलतान पठाण, खुशाल नेमाडे, आकाश मानकर, धीरज वानखेडे, मो. आमिर, राज चंदेल मनीष ठाकरे यांनी सहभाग घेत या प्रकरणात अमीर खा आजिज खा (वय ३०) याला अटक करण्यात ☞(पान २ वर)

# दारूसाठी पैसे न दिल्याने तरुणावर चाकूने हल्ला

## -दसरा मैदान परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील दसरा मैदानाच्या मागे आज शुक्रवार १२ डिसेंबरच्या दुपारी समोर आली आहे. या हल्ल्यात प्रेम बळराम जुणी (वय२९, वसंतराव नाईक झोपडपट्टी) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी सचिन सावंत खीची (वय २२,दसरा मैदान ) व संजू सावण खिची (वय २०, दसरा मैदान ) यांच्याविरुद्ध कलम ११८ (१), ३५२ बीएनएस अन्वये गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार प्रेम जुणी चहा विकण्याचे काम करतो. त्याचे परिसरात राहणाऱ्या मुली सोबत लग्न जुळले आहे. तिचे चुलत भाऊ हे विनाकारण काही दिवसापासून सामानाची तोडफोड करत होते. परंतु नातेवाईक असल्याने ☞(पान २ वर)

# देवदर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या कारचा अपघात,२ ठार

### -समृद्धी महामार्गावर अपघात

**कारंजा/प्रतिनिधीः-** यवतमाळवरून शिर्डीला देवदर्शनासाठी जात असताना पीकअप मालवाहू वाहन आणि कारचा भीषण अपघात झाला. कारमधून भाविक देवदर्शनासाठी जात होते. मात्र, शिर्डीला पोहोचण्याआधीच वाशिमच्या कारंजा तालुक्यातील धनज पोलीस स्टेशन हद्दीत हा भीषण अपघात घडला. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला तर, दोन जण जखमी झाले आहेत. मृतका मध्ये मंगेश आणि विक्रम अशोकराव सौरगपते (वय ४०, रा. यवतमाळ ) यांचा समावेश आहे तर अनुकूल मनोज यादव (वय ३५) आणि मयूर दीपक डोनाडकर (वय २९ ,दोघे रा.दत्त चौक यवतमाळ हे गंभीर जखमी झाले. माहिती नुसार यवतमाळहून काही जण कारमधून प्रवास करत होते. ते शिर्डीच्या दिशेनं जात होते. मात्र, शिर्डीला पोहोचण्याआधीच त्यांच्या कारचा भीषण अपघात घडला. समृद्धी



महामार्गावर भरधाव पीकअप वाहनानं अचानक ब्रेक मारला. यामुळे भरधाव वेगात धावणारी कार अनियंत्रित होऊन या पिकअप वर धडकली. या अपघातात कार चालक मंगेश आणि विक्रम अशोकराव सौरगपते ( रा. यवतमाळ ) यांचा जागीच मृत्यू झाला. तर अनुकूल मनोज यादव (वय ३५) आणि मयूर दीपक डोनाडकर (वय २९ ,दोघे रा.दत्त चौक यवतमाळ) हे गंभीर जखमी झाले. अपघात घडल्यानंतर स्थानिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच जखमींना वाचवण्याचा प्रयत्न केला.☞(पान २ वर)

# रस्त्यासह विजेसाठी होमगार्ड बघेल यांचे लोटांगण आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या बंगल्या पासून शुक्रवार बाजार चौकापर्यंत रस्त्यावर मोठ-मोठे गड्डे झालेले आहे आणि स्ट्रीट लाईट सुद्धा बंद पडले आहे. बंद पडलेले लाईट आणि रस्त्यावरील खड्डे त्वरित दुरुस्त करण्याच्या मागणीसाठी होमगार्ड मेजर राजेंद्रसिंह बघेल यांनी मनपा प्रशासनाला निवेदन दिले होते,तसेच मागणी पुर्ण न झाल्यासा लोटांगण आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. तरीपण प्रशासनाने त्यांच्या निवेदनाची दखल घेतली नाही. यामुळे संतापलेल्या होमगार्ड



राजेंद्रसिंह बघेल यांनी आज शुक्रवार १२ डिसेंबर रोजी सकाळी ☞(पान २ वर)

# मनरेगा निधी गिळंकृत प्रकरणात नवे धक्कादायक वळण

## -जिल्हास्तरीय समिती अध्यक्षांचे बयाण नोंदविले

### - मरसकोल्हे यांच्या निलंबनावर अजूनही शिक्कामोर्तब नाही

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी पंचायत समितीतील मनरेगा निधीचा ७० लाखांहून अधिकचा घोटाळा आता नव्या वळणावर पोहोचला आहे. 'अर्धे तुम्ही अर्धे आम्ही' या संशयास्पद सूत्रावर चाललेली कथित फसवणूक समोर आल्यानंतर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी प्रकरणाची गंभीर नोंद घेत चौकशी समिती नेमली. समितीच्या तपासानंतर गुन्हाही दाखल करण्यात आला. मात्र या सर्व घडामोडींमध्ये मुख्य आरोपी मानल्या जाणाऱ्या बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांच्या निलंबनावर अद्यापही शासनाने शिक्कामोर्तब न केल्याने संपूर्ण जिल्ह्यात चर्चांना उधाण आले आहे.

गुरुवार, ११ डिसेंबर रोजी तपास अधिकारींनी जिल्हास्तरीय चौकशी समितीचे अध्यक्ष व कारंजा पं.स.चे गटविकास अधिकारी प्रवीण देशमुख यांचे सविस्तर बयाण नोंदविले. यावेळी काही धक्कादायक माहिती समोर आल्याचे अत्यंत खात्रीलायक सूत्रांकडून समजते.

या प्रकरणातील सुरुवातीची प्राथमिक चौकशी स्वतः बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांनी केली होती. त्यांच्या अहवालात २५ लाखांचा अपहार स्पष्टपणे नोंदला गेला. यानंतर सीईओ सोमण यांनी प्रकरण दडपण्यापेक्षा अधिक तपासासाठी जिल्हास्तरीय समिती गठित केली. प्रथम समुद्रपूरचे गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर सावसागडे यांच्याकडे समिती ☞(पान २ वर)

# पोलीस कर्मचाऱ्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल

## -लग्नाचे आमिष देत तरूणीवर अत्याचार

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एका २८ वर्षीय तरुणीला प्रेम जाळ्यात ओढून तिचे शारीरिक शोषण करण्यात आले. लग्नाचे आश्वासन देऊनही आरोपी उपनिबंधक कार्यालयात पोहोचला नाही. १७ ऑक्टोंबर ते ८ डिसेंबर पर्यंत हे सत्र सुरू होते. लग्नाच्या दिवशी आरोपी उपनिबंधक कार्यालयात न पोहोचल्याने निराश झालेल्या तरुणीने यासंदर्भात त्याच्या विरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी आरोपी पोलीस कॉन्स्टेबल गणेश रामसिंग जांभेकर (वय २७, मांडवा धारणी ह.मु काँग्रेस नगर) याच्याविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

माहितीनुसार पीडित तरुणी स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. या दरम्यान तिची आरोपी पोलीस कर्मचारी गणेश जांभेकर सोबत ओळख झाली. गणेश ग्रामीण पोलीस हेडकॉटर मध्ये कॉन्स्टेबल पदावर कार्यरत आहे. ही ओळख हळूहळू प्रेमात बदलली. आरोपीने तिला लग्नाचे आमीष दिले. १७ ऑक्टोंबर ☞(पान २ वर)

# मराठी हौशी नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी अमरावती येथे होण्याची शक्यता

**अमरावती/प्रतिनिधीः-** शुक्रवार दि. १२ डिसेंबर रोजी आमदार रवी राणा यांचे सह नाट्य परिषद मध्यवर्ती चे नियामक मंडळ सदस्य ॲड. प्रशांत देशपांडे आणि अमरावती नाट्य परिषद अध्यक्ष ॲड. चंद्रशेखर डोरले यांनी अधिवेशनाचे दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांची भेट घेऊन ६४ व्या हौशी मराठी नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी अमरावती येथे देण्याची मागणी केली.

अंतिम फेरी अमरावतीत मिळावी या मागणी करिता आमदार प्रताप अडसड, आमदार राजेश वानखडे, राज्य सभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे तसेच माजी खासदार नवनीत राणा यांनी देखील सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांना पत्र देऊन या मागणीला समर्थन दिले आहे. या प्रसंगी भा. ज. पा. अमरावती शहर - जिल्हा अध्यक्ष डॉ. नितीन धांडे उपस्थित होते. ही अंतिम फेरी अमरावती येथे आयोजित करण्याकरिता ॲड. आशिष शेलार यांनी संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय बिभीषण चवरे यांना लेखी स्वरूपात कळविले सुद्धा आहे. मराठी नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी अमरावती येथे पहिल्यांदाच होणार असून अमरावतीकर रसिकांना संपूर्ण राज्यभरातील पारितोषिक विजेत जवळपास ४० नाटकं पाहण्याची सुवर्ण संधी उपलब्ध होणार आहे.